सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग

# राज्य वेतन सुधारणा समिती २००८

# अहवाल


**श्री. पी. एम. ए. हकीम**

**अध्यक्ष**

**श्री. सतीश त्रिपाठी**

**सदस्य**

**डॉ. प्रदीप व्यास**

**सदस्य**


**मुंबई २००८**

# राज्य वेतन सुधारणा समिती
# २००८

# अहवाल

**श्री.पी.एम.ए.हकीम**
**अध्यक्ष**
**सेवानिवृत्त सचिव, केंद्र शासन**

**श्री. सतीश त्रिपाठी**
**सदस्य**
**अतिरिक्त मुख्य सचिव (सेवा)**
**सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन**

**डॉ. प्रदीप व्यास**
**सदस्य**
**सचिव (व्यय)**
**वित्त विभाग, महाराष्ट्र शासन**

**मुंबई** **२० डिसेंबर २००८**

[ [redacted] ]

[ किंमत रुपये १००.०० ]

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्रमांक |
| --- | --- | --- |
| १ | प्रकरण क्र. १ - प्रस्तावना | १ |
| २ | प्रकरण क्र. २ - सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींचा गोषवारा | ५ |
| ३ | प्रकरण क्र. ३ - राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या सुधारित वेतन संरचनेबाबत शिफारशी | २३ |
| ४ | प्रकरण क्र. ४ - सेवानिवृत्तिवेतन व अनुषंगिक लाभांसंदर्भात शिफारशी | ८९ |
| ५ | प्रकरण क्र. ५ - कार्यक्षम आणि प्रतिसादात्मक प्रशासन | ९५ |
| ६ | प्रकरण क्र. ६ -समितीच्या शिफारीशींमुळे अपेक्षित वित्तीय भार | ९९ |
| ७ | प्रकरण क्र. ७ - समितीच्या शिफारशींचा गोषवारा | १०३ |
| ८ | ऋणनिर्देश | १११ |
| ९ | जोडपत्र १- राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ ची स्थापना | ११२ |
| १० | जोडपत्र २ - वेतन पुनर्रचना कक्षातील अधिकारी/कर्मचारीवृंद | ११५ |
| ११ | जोडपत्र ३ - जाहीर सूचना | ११६ |
| १२ | जोडपत्र ४ - समिती समवेत चर्चेकरीता उपस्थित राहिलेल्या संघटनांची यादी | ११८ |
| १३ | जोडपत्र ५ - समिती समवेत चर्चेकरीता उपस्थित राहिलेल्या मंत्रालयीन/विभागीय अधिकाऱ्यांची यादी. | १३१ |

# प्रकरण १ - प्रस्तावना

## १.१ राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ ची स्थापना :-

१.१.१ सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींना अनुलक्षून केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतल्यानंतर राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्यासाठी राज्य शासनाने शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांकः वेपुर-१२०८/प्र.क्र.७२/सेवा-९, दिनांक २३ सप्टेंबर, २००८ अन्वये (जोडपत्र-१) खालीलप्रमाणे राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ ची स्थापना केली :-

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.पी.एम.ए.हकीम,<br>सेवानिवृत्त सचिव, केंद्र शासन | अध्यक्ष |
| २. | अतिरिक्त मुख्य सचिव (सेवा),<br>सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन | सदस्य |
| ३. | प्रधान सचिव (व्यय),<br>वित्त विभाग, महाराष्ट्र शासन | सदस्य |

### १.१.२ समितीची कार्यकक्षा खालील प्रमाणे होती :-

१. सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींवरील केंद्र शासनाचे निर्णय विचारात घेऊन खाली नमूद केलेल्या पदांना सुधारित वेतनश्रेणींची शिंफारस करणे:-

(अ) राज्य शासकीय पदे (अखिल भारतीय सेवेतील पदांव्यतिरिक्त)

(ब) जिल्हा परिषदांकडील पदे

(क) मंत्रालयातील पदांशी तत्सम नसलेली राज्य विधानमंडळ सचिवालयातील पदे

(ड) उच्च न्यायालयातील राजपत्रित व अराजपत्रित पदे

(इ) अनुदानित शाळांतील शिक्षकीय पदे

(ई) राज्यातील कृषि व कृषीतर विद्यापीठे तसेच विद्यापीठांना संलग्न असलेल्या अशासकीय महाविद्यालयातील शिक्षकेतर पदे

(फ) इतर अनुदान प्राप्त संस्थांतील पदे.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, १९९८ अंमलात आल्यानंतर वेतनश्रेणीत सुधारणा करण्यात आली असल्यास, केंद्र शासनाकडील समकक्ष पदांच्या तुलनियतेचे पुन:परिक्षण करुन सुधारित वेतनश्रेणींची शिफारस करणे.

३. पदांच्या सुधारित वेतनश्रेणी सुचवितांना ज्या पदांना विद्यमान वेतनश्रेणीत विशेष वेतन/उच्च प्रारंभिक वेतनवाढी / व्यावसायिक पात्रतेसंबंधात वेतनवाढी इत्यादी मंजूर करण्यात आल्या आहेत याबाबत शिफारस करणे.

४. निवृत्तिवेतनधारकांची निवृत्तिवेतन निश्चिती व अनुषंगिक बाबींसंबंधी शिफारशी करणे.

१.१.३ समितीस आपली कार्यपध्दती स्वत: निश्चित करुन आपला अहवाल नियुक्तीच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत सादर करण्यास सांगण्यात आले होते. समितीस वित्त विभागातील वेतन पुनर्रचना कक्षामार्फत (जोडपत्र-२) सर्व प्रकारचे सहकार्य करण्यास सांगण्यात आले होते.

१.१.४ समितीच्या स्थापनेबाबतची माहिती देणारी तसेच समितीची कार्यकक्षा विचारात घेऊन कर्मचारी संघटनांनी निवेदने सादर करण्यासंदर्भात वित्त विभागामार्फत दिनांक २९ सप्टेंबर, २००८ रोजी (जोडपत्र-३) प्रमुख इंग्रजी व मराठी वर्तमानपत्रात जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आली होती. समितीची प्रत्यक्ष भेट घेऊन आपले म्हणणे मांडावयाचे असल्यास तशी विनंती करण्यास संघटनांना सुचविण्यात आले होते. त्याचप्रमाणे प्रशासकीय विभागांच्या प्रमुखांना त्यांच्या विभागातील व क्षेत्रिय कार्यालयातील पदे व विद्यमान वेतनश्रेणींबाबतची माहिती देण्याबाबत दिनांक २९ सप्टेंबर, २००८ च्या अर्धशासकीय पत्रान्वये विनंती करण्यात आली होती. वित्त विभागामार्फत प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहीर सूचनेला अनुसरुन विविध कर्मचारी संघटनामार्फत समितीस निवेदने प्राप्त झाली. बहुतांश संघटनांनी समितीची प्रत्यक्ष भेट घेऊन आपली बाजू मांडण्याची इच्छा व्यक्त केली होती; त्यानुसार सर्व संघटनांच्या पदाधिकाऱ्यांना समितीसमोर बाजू मांडण्याची संधी देण्यात आली. समितीची पहिली बैठक दिनांक ७.१०.२००८ रोजी आयोजित करण्यात आली होती. तेव्हापासून दिनांक १०.१२.२००८ पर्यंत विविध संघटनांच्या प्रतिनिधींबरोबर बैठका आयोजित करुन त्यांचे म्हणणे समितीने ऐकून घेतले. समितीने भेट घेतलेल्या संघटनांची यादी जोडपत्र-४ मध्ये नमूद केली आहे. विविध संघटनांमार्फत प्राप्त झालेल्या निवेदनांचा व त्यांच्या प्रतिनिधींनी समितीच्या बैठकीत केलेल्या सूचनांचा समितीने काळजीपूर्वक विचार केला. प्रशासकीय विभागांचे अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव यांच्यासमवेत दिनांक १७ व १८ ऑक्टोबर, २००८ तसेच दिनांक २२ व २३ ऑक्टोबर, २००८ रोजी बैठका आयोजित करुन त्यांचेकडून प्राप्त झालेल्या पदांविषयी माहितीच्या अनुषंगाने त्यांची मते/सूचना जाणून घेतल्या. समितीने भेट घेतलेल्या अधिकाऱ्यांची यादी जोडपत्र-५ मध्ये देण्यात आलेली आहे.

१.१.५ या अहवालात खालील इतर सहा प्रकरणांचा समावेश करण्यात आलेला आहे :-

प्रकरण क्रमांक २ - सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींचा गोषवारा.

प्रकरण क्रमांक ३ - राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या सुधारित वेतन संरचनेबाबत शिफारशी.

प्रकरण क्रमांक ४ - सेवानिवृत्तिवेतन व अनुषंगिक लाभांसंदर्भात शिफारशी.

प्रकरण क्रमांक ५ - कार्यक्षम आणि प्रतिसादात्मक प्रशासन.

प्रकरण क्रमांक ६ - समितीच्या शिफारशींमुळे अपेक्षित वित्तीय भार.

प्रकरण क्रमांक ७ - समितीच्या शिफारशींचा गोषवारा.

***

# प्रकरण २- सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशीचा गोषवारा

२.१.१ केंद्र शासनाने दिनांक ५ ऑक्टोबर, २००६ रोजी स्थापन केलेल्या सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाने आपला अहवाल दिनांक २४ मार्च, २००८ रोजी सादर केला. केंद्रीय वित्त मंत्रालयाने काही सुधारणांसह सदर अहवालातील शिफारशींची अंमलबजावणी करण्यासंबंधीचे आदेश दिनांक २९ ऑगस्ट, २००८ रोजी निर्गमित केले. आयोगाच्या शिफारशींची ठळक वैशिष्ट्ये थोडक्यात खाली नमूद करण्यात आलेली आहेत (ज्या शिफारशी केंद्र शासनाने सुधारित स्वरुपात स्वीकृत केल्या आहेत त्यांची माहितीही नमूद करण्यात आली आहे).

## २.२ सुधारित वेतन संरचना (वेतन बँड आणि ग्रेड वेतन)

**२.२.१** सुधारित वेतन संरचनेत रुपये २६०००(नियत) पेक्षा विद्यमान निम्न वेतनश्रेणीतील वेतनधारकांसाठी वेतन बँडची संकल्पना दिनांक १.१.२००६ पासून लागू करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. त्यामध्ये गट-क साठी पीबी-१ (रुपये ४८६०-२०२००) गट-ब साठी पीबी-२ (रुपये ८७००-३४८००) आणि गट-अ साठी पीबी-३ (रुपये १५६००-३९१००) व पीबी-४ (रुपये ३९२००-६७०००) या चार वेतन बँडचा समावेश करण्यात आलेला आहे. वेतन बँड पीबी-३ मध्ये रुपये १६४००-२०९०० या विद्यमान वेतनश्रेणीपर्यंतच्या सर्व पदांचा आणि पीबी-४ वेतन बँडमध्ये वर नमूद वेतनश्रेणीपेक्षा उच्च परंतु सचिव व तत्सम पदांपेक्षा (रुपये २६००० नियत) निम्न वेतनश्रेणीतील पदांचा समावेश करण्यात आलेला आहे. या सर्व पदांना ग्रेड वेतनाचीसुध्दा शिफारस करण्यात आलेली आहे (वेतन बँडसंबंधीच्या शिफारशी स्वीकृत करतांना केंद्र शासनाने त्यामध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा केली. (१) पीबी-१ करिता रुपये ५२००-२०२००, (२) पीबी-२ करिता रुपये ९३००-३४८००, (३) पीबी-४ करिता रुपये ३७४००-६७००० हे सुधारित वेतन बँड मंजूर केले आहेत आणि (४) रुपये

१४३००-१८३००, १५१००-१८३००, १६४००-२०००० व १६४००-२०९०० या विद्यमान वेतनश्रेणी पीबी-३ ऐवजी पीबी-४ मध्ये घेण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे (५) रुपये २२४००-२६००० व रुपये २४०५०-२६००० या विद्यमान वेतनश्रेणींना पीबी-४ मधून वेगळे करुन त्यासाठी रुपये ७५५००-८०००० ही नवीन सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली असून, त्यास एचएजी + असे संबोधण्यात आले आहे).

२.२.२ केंद्र शासनाकडे सचिव व तत्सम तसेच मंत्रिमंडळ सचिव व तत्सम पदांना अनुक्रमे रुपये ८०००० व रुपये ९०००० हे एकत्रित मासिक वेतन (कोणत्याही ग्रेड वेतनाशिवाय) प्रस्तावित करण्यात आले आहे.

२.२.३ गट-ड मधील पदांसाठी - १ एस (रुपये ४४४०-७४४०) या वेतन बँडची शिफारस करण्यात आली आहे. तथापि, ही वेतनश्रेणी नियमित अथवा स्थायी स्वरुपाची नसून यापुढे या गटात कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात येणार नाही. विद्यमान गट-ड मधील कर्मचारी गट-क मध्ये नियुक्तीसाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता धारण करीत असल्यास त्यांना दिनांक १.१.२००६ पासून थेट गट-क मध्ये सामावून घ्यावयाचे आहे. उर्वरित कर्मचाऱ्यांना योग्य ते प्रशिक्षण देऊन गट-क मध्ये सामावून घ्यावयाचे असून, तोपर्यंत त्यांना -१एस या वेतन बँडमध्ये ठेवायचे आहे. प्रशिक्षणानंतर ज्या कर्मचाऱ्यांना गट-क मध्ये सामावून घ्यावयाचे आहे ते कर्मचारी त्यांची ज्येष्ठता गमावणार नसून त्यांची व दिनांक १.१.२००६ पासून गट-क मध्ये सामावून घेण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची पूर्वीची (गट-ड) आपापसातील ज्येष्ठता अबाधित राहणार आहे.

२.२.४ यापुढे -१एस या वेतन बँडमध्ये नवीन नियुक्ती करावयाची नसली तरी गट-क मधील शैक्षणिक अर्हता धारण करीत नसतांना अनुकंपासारख्या काही विशिष्ट प्रसंगी नियुक्ती करावयाची झाल्यास ती -१एस वेतन बँडमध्ये प्रशिक्षणार्थी म्हणून करण्यात यावी व त्यांना

-१एस वेतन बँड मधील किमान टप्प्यावरील वेतन, वेतन ग्रेड शिवाय अदा करण्यात यावे. प्रशिक्षणार्थी म्हणून केलेली सेवा कोणत्याही सेवाप्रयोजनार्थ ग्राह्य धरण्यात येणार नाही. सदर कर्मचाऱ्यांनी सेवाप्रवेश नियमांनुसार गट-क मधील किमान शैक्षणिक अर्हता धारण केल्यानंतर गट-क साठी अनुज्ञेय वेतन बँड व ग्रेड वेतनामध्ये वेतन अदा करण्यात यावे.

२.२.५ एकाच वेतन बँडमधील पदांसाठी वेगवेगळे ग्रेड वेतन प्रस्तावित करण्यात आले आहेत. विविध पदांसाठी प्रस्तावित ग्रेड वेतन (सचिव किंवा तत्सम आणि मंत्रिमंडळ सचिव या पदांव्यतिरिक्त) पदांचा दर्जा विहित करतात. -१ एस मधील विविध पदांसाठी रुपये १३०० ते १६५०, पीबी-१ साठी रुपये १८०० ते २८००, पीबी-२ साठी रुपये ४२०० ते ५४००, पीबी-३ साठी रुपये ५४०० ते ८४०० व पीबी-४ साठी रुपये ९००० ते १३००० या ग्रेड वेतनांची शिफारस करण्यात आली होती (या शिफारशींची अंमलबजावणी करतांना केंद्र शासनाने ग्रेड वेतनांमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा केली आहे. (१) रुपये १०३२५-१०९७५ ते २२४००-२४५०० या विद्यमान वेतनश्रेणीतील विविध पदांस प्रस्तावित रुपये ६१०० ते ११००० या ग्रेड वेतनात रुपये ६६०० ते १२००० अशी सुधारणा केली आहे. (२) पीबी-४ मधील रुपये २२४००-२६००० व रुपये २४०५०-२६००० या विद्यमान वेतनश्रेणीतील पदास रुपये ७५५००-८०००० ही नवीन वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली असल्यामुळे या वेतनश्रेणीतील पदास मंजूर रुपये १३००० ग्रेड वेतन रद्द करण्यात आले आहे).

२.२.६ एका वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी वेतन बँडच्या कमाल टप्प्यावर वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या ग्रेड वेतनात कोणताही बदल न करता त्यांना लगतचा वेतन बँड मंजूर करण्यात यावा.

२.२.७ महागाई भत्ता तसेच इतर भत्त्यांची व निवृत्तिवेतन इत्यादींची परिगणना करताना ग्रेड वेतन व वेतन बँड विचारात घेण्यात यावे.

२.२.८ शासकीय निवासस्थानासारख्या सेवा-सुविधा मंजूर करतांना ग्रेड वेतन विचारात घेण्यात यावे. समान ग्रेड वेतन घेणाऱ्यांच्या बाबतीत एकूण वित्तलब्धी विचारात घेण्यात यावी.

२.२.९ सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्यापूर्वी केंद्रीय कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या वेतनश्रेणी, सहाव्या वेतन आयोगाने सुचविलेली सुधारित वेतन संरचना व केंद्र शासनाने मान्य केलेला वेतन संरचनेबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

| अ. क्र | वेतन आयोगाच्या शिफारशीपूर्वी लागू असलेली वेतनश्रेणी | | सहाव्या वेतन आयोगाने शिफारस केलेली सुधारित वेतन संरचना | | | केंद्र शासनाने मंजूर केलेली सुधारित वेतन संरचना | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | वेतन श्रेणी क्रमांक | वेतनश्रेणी | वेतन बँड क्रमांक | वेतन बँड | ग्रेड वेतन | वेतन बँड क्रमांक | वेतन बँड | ग्रेड वेतन |
| १ | एस-१ | २५५०-३२०० | -१एस | ४४४०-७४४० | १३०० | -१एस | ४४४०-७४४० | १३०० |
| २ | एस-२ | २६१०-३५४० | -१एस | ४४४०-७४४० | १४०० | -१एस | ४४४०-७४४० | १४०० |
| ३ | एस-२ अ | २६१०-४००० | -१एस | ४४४०-७४४० | १६०० | -१एस | ४४४०-७४४० | १६०० |
| ४ | एस-३ | २६५०-४००० | -१एस | ४४४०-७४४० | १६५० | -१एस | ४४४०-७४४० | १६५० |
| ५ | एस-४ | २७५०-४४०० | पीबी-१ | ४८६०-२०२०० | १८०० | पीबी-१ | ५२००-२०२०० | १८०० |
| ६ | एस-५ | ३०५०-४५९० | पीबी-१ | ४८६०-२०२०० | १९०० | पीबी-१ | ५२००-२०२०० | १९०० |
| ७ | एस-६ | ३२००-४९०० | पीबी-१ | ४८६०-२०२०० | २००० | पीबी-१ | ५२००-२०२०० | २००० |
| ८ | एस-७ | ४०००-६००० | पीबी-१ | ४८६०-२०२०० | २४०० | पीबी-१ | ५२००-२०२०० | २४०० |
| ९ | एस-८ | ४५००-७००० | पीबी-१ | ४८६०-२०२०० | २८०० | पीबी-१ | ५२००-२०२०० | २८०० |
| १० | एस-९ | ५०००-८००० | पीबी-२ | ८७००-३४८०० | ४२०० | पीबी-२ | ९३००-३४८०० | ४२०० |
| ११ | एस-१० | ५५००-९००० | पीबी-२ | ८७००-३४८०० | ४२०० | पीबी-२ | ९३००-३४८०० | ४२०० |
| १२ | एस-११ | ६५००-६९०० | पीबी-२ | ८७००-३४८०० | ४२०० | पीबी-२ | ९३००-३४८०० | ४२०० |
| १३ | एस-१२ | ६५००-१०५०० | पीबी-२ | ८७००-३४८०० | ४२०० | पीबी-२ | ९३००-३४८०० | ४२०० |
| १४ | एस-१३ | ७४५०-११५०० | पीबी-२ | ८७००-३४८०० | ४६०० | पीबी-२ | ९३००-३४८०० | ४६०० |
| १५ | एस-१४ | ७५००-१२००० | पीबी-२ | ८७००-३४८०० | ४८०० | पीबी-२ | ९३००-३४८०० | ४८०० |
| १६ | एस-१५ | ८०००-१३५०० | पीबी-२ | ८७००-३४८०० | ५४०० | पीबी-२ | ९३००-३४८०० | ५४०० |
| १७ | नवीन वेतन - श्रेणी | ८०००-१३५०० (गट-अ प्रवेश) | पीबी-३ | १५६००- ३९१०० | ५४०० | पीबी-३ | १५६००-३९१०० | ५४०० |
| १८ | एस-१६ | ९,००० | पीबी-३ | १५६००- ३९१०० | ५४०० | पीबी-३ | १५६००-३९१०० | ५४०० |
| १९ | एस-१७ | ९०००-९५५० | पीबी-३ | १५६००- ३९१०० | ५४०० | पीबी-३ | १५६००-३९१०० | ५४०० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २० | एस-१८ | १०३२५-१०९७५ | पीबी-३ | १५६००- ३९१०० | ६१०० | पीबी-३ | १५६००-३९१०० | ६६०० |
| २१ | एस-१९ | १००००-१५२०० | पीबी-३ | १५६००- ३९१०० | ६१०० | पीबी-३ | १५६००-३९१०० | ६६०० |
| २२ | एस-२० | १०६५०-१५८५० | पीबी-३ | १५६००- ३९१०० | ६५०० | पीबी-३ | १५६००-३९१०० | ६६०० |
| २३ | एस-२१ | १२०००-१६५०० | पीबी-३ | १५६००- ३९१०० | ६६०० | पीबी-३ | १५६००-३९१०० | ७६०० |
| २४ | एस-२२ | १२७५०-१६५०० | पीबी-३ | १५६००- ३९१०० | ७५०० | पीबी-३ | १५६००-३९१०० | ७६०० |
| २५ | एस-२३ | १२०००-१८००० | पीबी-३ | १५६००- ३९१०० | ७६०० | पीबी-३ | १५६००-३९१०० | ७६०० |
| २६ | एस-२४ | १४३००-१८३०० | पीबी-३ | १५६००- ३९१०० | ७६०० | पीबी-४ | ३७४००-६७००० | ८७०० |
| २७ | एस-२५ | १५१००-१८३०० | पीबी-३ | १५६००- ३९१०० | ८३०० | पीबी-४ | ३७४००-६७००० | ८७०० |
| २८ | एस-२६ | १६४००-२०००० | पीबी-३ | १५६००- ३९१०० | ८४०० | पीबी-४ | ३७४००-६७००० | ८९०० |
| २९ | एस-२७ | १६४००-२०९०० | पीबी-३ | १५६००- ३९१०० | ८४०० | पीबी-४ | ३७४००-६७००० | ८९०० |
| ३० | एस-२८ | १४३००-२२४०० | पीबी-४ | ३९२००-६७००० | ९००० | पीबी-४ | ३७४००-६७००० | १०००० |
| ३१ | एस-२९ | १८४००-२२४०० | पीबी-४ | ३९२००-६७००० | ९००० | पीबी-४ | ३७४००-६७००० | १०००० |
| ३२ | एस-३० | २२४००-२४५०० | पीबी-४ | ३९२००-६७००० | ११००० | पीबी-४ | ३७४००-६७००० | १२००० |
| ३३ | एस-३१ | २२४००-२६००० | पीबी-४ | ३९२००-६७००० | १३००० | एचएजी+ वेतनश्रेणी | ७५५०० (३ % दराने वार्षिक वेतनवाढ) -८०००० | निरंक |
| ३४ | एस-३२ | २४०५०-२६००० | पीबी-४ | ३९२००-६७००० | १३००० | एचएजी+ वेतनश्रेणी | ७५५००(३ % दराने वार्षिक वेतनवाढ) - ८०००० | निरंक |
| ३५ | एस-३३ | २६००० (नियत) | ॲपेक्स वेतनश्रेणी | ८०००० (नियत) | निरंक | ॲपेक्स वेतनश्रेणी | ८०००० (नियत) | निरंक |
| ३६ | एस-३४ | ३०००० (नियत) | मंत्रिमंडळ सचिव | ९०००० (नियत) | निरंक | मंत्रिमंडळ सचिव | ९०००० (नियत) | निरंक |

## २.३ वेतननिश्चिती

२.३.१ दिनांक १.१.२००६ रोजी सुधारित वेतन बँडमधील वेतननिश्चिती विद्यमान वेतनश्रेणीतील मूळ वेतनास १.७४ ने गुणून येणाऱ्या वेतनाच्या पुढील १० च्या पटीतील रक्कम विचारात घेऊन करण्यात यावी (या शिफारशीची अंमलबजावणी करतांना केंद्र शासनाने गुणकात १.७४ वरुन १.८६ अशी सुधारणा केली आहे).

२.३.२ विद्यमान वेतनश्रेणीतील दोन किंवा अधिक टप्प्यांना सुधारित वेतन बँडमध्ये एकच वेतन देय झाल्यास (वेतन एकवटल्यास) एक वेतनवाढ देण्यात यावी. सदर वेतनवाढ वेतन बँडमधील वेतनावर देण्यात यावी. मात्र, ग्रेड वेतनाचा त्यामध्ये समावेश असणार नाही.

२.३.३ पाचव्या वेतन आयोगानुसार विहित विद्यमान वेतनश्रेणीत जास्त वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्याची त्याच्यापेक्षा कमी वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यापेक्षा कमी वेतनावर सुधारित वेतन संरचनेत वेतननिश्चिती करता येणार नाही.

२.३.४ विद्यमान वेतनश्रेणी रुपये ५०००-८०००, रुपये ५५००-९००० व रुपये ६५००-१०५०० एकत्र करण्याचे प्रस्तावित असल्यामुळे निम्न पद व पदोन्नतीच्या पदास एकच वेतनश्रेणी अनुज्ञेय होण्याची शक्यता आहे. या संदर्भात आयोगाने काही विशिष्ट पदांबाबत विशेष शिफारशी केल्या असल्या तरी इतर पदांबाबत त्यामधील कार्यात्मक बाबतीत कोणतीही ढवळाढवळ न करता शक्य असल्यास आयोगाच्या शिफारशींप्रमाणे एकत्रित संवर्ग करण्यात यावा. काही पदांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या लक्षात घेता दोन संवर्ग विलिन करणे शक्य नसल्यास रुपये ५०००-८००० व रुपये ५५००-९००० या दोन विद्यमान वेतनश्रेणींमधील पदे रुपये ६५००-१०५०० या वेतनश्रेणीत विलिन करुन रुपये ६५००-१०५०० या वेतनश्रेणीतील पदांचे श्रेणीवर्धन रुपये ७४५०-११५०० या विद्यमान वेतनश्रेणीस अनुज्ञेय पीबी-२ मध्ये व रुपये ४६०० या ग्रेड वेतनात करण्यात यावे. रुपये ६५००-१०५०० या विद्यमान वेतनश्रेणीतील अभियांत्रिकी किंवा कायद्याची पदवी ही किमान शैक्षणिक अर्हता असलेल्या पदांचे श्रेणीवर्धन रुपये ७४५०-११५०० या विद्यमान वेतनश्रेणीत करण्यात यावे.

२.३.५ एखाद्या कर्मचाऱ्यास दिनांक १.१.२००६ व सुधारित वेतन संरचना लागू करण्यासंबंधीची अधिसूचना निर्गमित झाल्याच्या दिनांकादरम्यान पदोन्नती / पदांची

श्रेणीवाढ इत्यादींमुळे वरिष्ठ वेतनश्रेणी अनुज्ञेय झाल्यास अशा कर्मचाऱ्यास सुधारित वेतन संरचनेची निवड त्याच्या पदोन्नतीच्या/पदांच्या श्रेणीवाढीच्या दिनांकापासून करण्याची मुभा देण्यात यावी.

**२.३.६** गट-अ, ब आणि क मधील नवीन नियुक्तीधारकांची वेतन बँडमध्ये वेतननिश्चिती पुढीलप्रमाणे करण्यात यावी. (अ) सुरवातीस एका वेतन बँडमधील ग्रेड वेतनामधून दुसऱ्या ग्रेड वेतनामध्ये जाण्यासाठी विहित केलेला सेवा कालावधी मोजण्यात यावा, (ब) त्यानंतर विहित सेवा कालावधीच्या प्रत्येक वर्षासाठी एक वेतनवाढ अनुज्ञेय वेतन बँडच्या किमान टप्प्यातील वेतनात व कमीत कमी ग्रेड वेतनात मिळविण्यात यावी. (क) हे नवीन नियुक्तीधारकांचे वेतन त्या बँडमधील वेतन होईल. तसेच त्यांना संबंधित बँडमधील ग्रेड वेतन सुध्दा अनुज्ञेय होईल.

## २.४ वेतन बँड अंतर्गत पदोन्नती

**२.४.१** समान वेतन बँडमधील एका पदावरुन दुसऱ्या पदावर पदोन्नती देताना त्या पदाच्या ग्रेड वेतनात बदल होईल. या व्यतिरिक्त एक वेतनवाढ सुध्दा अनुज्ञेय होईल. एका वेतन बँडमधून दुसऱ्या वेतन बँडमध्ये पदोन्नती देताना निश्चित होणारे वेतन दुसऱ्या वेतन बँडच्या किमान टप्प्यापेक्षा कमी नसावे.

**२.४.२** समान पदावर दिनांक १.१.२००६ पूर्वी पदोन्नत झालेला ज्येष्ठ कर्मचारी जर दिनांक १.१.२००६ अथवा त्यानंतर पदोन्नत झालेल्या कनिष्ठ कर्मचाऱ्यापेक्षा कमी वेतन घेत असेल व ज्येष्ठ कर्मचारी त्याच्या पदोन्नतीच्या वेळेस कनिष्ठ कर्मचाऱ्या इतके अथवा त्याच्यापेक्षा जास्त वेतन घेत असेल तर ज्येष्ठ कर्मचाऱ्याचे वेतन कनिष्ठ कर्मचाऱ्याच्या वेतनाइतके उंचावून देण्यात यावे.

## २.५ वेतनवाढ

**२.५.१** सर्व वेतन बँडमधील वेतन व ग्रेड वेतनावर २.५० टक्के वेतनवाढ देण्यात यावी. या वार्षिक वेतनवाढीचा दिनांक १ जुलै असा राहील. जे कर्मचारी १ जुलै रोजी सहा महिने अथवा त्यापेक्षा जास्त कालावधीसाठी एकाच वेतनावर वेतन घेत आहेत त्यांना १ जुलै रोजी वेतनवाढ अनुज्ञेय होईल (या शिफारशीची अंमलबजावणी करतांना केंद्र शासनाने वेतनवाढीचा दर ३ टक्के इतका केला आहे).

**२.५.२** पीबी-३ या वेतन बँडमधील (गट-अ) ८० टक्के कर्मचाऱ्यांना वरीलप्रमाणे वेतनवाढ अनुज्ञेय होईल. उर्वरित २० टक्के कर्मचाऱ्यांना त्यांच्या कामगिरीच्या आधारे ३.५ टक्के या दराने वेतनवाढ देण्यात यावी (केंद्र शासनाने या दरात ४ टक्के असा बदल केला आहे).

## २.६ कामगिरीवर आधारित प्रोत्साहन योजना :-

**२.६.१** शासकीय कर्मचाऱ्यांना नियमित वेतनाशिवाय त्यांच्या कामगिरीवर आधारीत अतिरिक्त लाभ देणारी योजना लागू करण्यात यावी व या योजनेचा लाभ देण्यासाठी संबंधित कालावधीतील कामगिरी विचारात घेण्यात यावी. ही योजना "कामगिरीच्या प्रमाणात प्रोत्साहन" या तत्वावर राबविण्यात यावी. या योजनेसाठी लागणारी रक्कम संबंधित संस्थेच्या खर्चात कपात करण्याबाबतच्या विहित योजना राबवून उपलब्ध करण्यात यावी. या योजनेची अंमलबजावणी ऐच्छिक राहील.

**२.६.२** संबंधित कार्यालयाने स्वत:ची कार्यालयीन संरचना लक्षात घेऊन कामगिरीवर आधारित प्रोत्साहन योजना विकसित करावी व त्यासाठी देण्यात येणारी बक्षिसाची रक्कम निश्चित करुन दिलेले उद्दिष्ट पूर्ण करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कार्यालयाकडे झालेल्या बचतीच्या रकमेतून अदा करण्यात यावी.

२.६.३ ही योजना क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना पुरेसे स्वातंत्र्य व स्वायत्तता दिल्याशिवाय राबविता येणार नाही.

२.६.४ ही योजना वैयक्तिक, गट व संस्था या सर्वांच्या कामगिरीचा एकत्रित विचार करुन राबविण्यात यावी व त्यामध्ये सर्व कर्मचाऱ्यांचा समावेश असावा.

## २.७ विशिष्ट पदांबाबतच्या शिफारशी

२.७.१ केंद्र शासनाकडील काही विशिष्ट पदांबाबत काही विशिष्ट शिफारशी केलेल्या आहेत.

## २.८ महागाई भत्ता

२.८.१ महागाई भत्त्याची परिगणना करण्यासाठी २००१ वर्ष आधारभूत मानून ए.आय.सी.ई.आय.(आय.डब्ल्यू) चा वापर करण्यात यावा. आधारभूत वर्षात वेळोवेळी बदल करण्यात यावा.

२.८.२ महागाई भत्ता वर्षातून दोनवेळा १ जानेवारी व १ जुलै पासून अनुक्रमे मार्च व सप्टेंबर महिन्यांच्या वेतनासोबत देण्यात यावा.

## २.९ इतर भत्ते

२.९.१ शहर पूरक भत्ता रद्द करण्याबरोबर विशेष पूरक (डोंगराळ व दुर्गम भाग) भत्ता, आदिवासी भत्ता, प्रकल्प भत्ता, खराब हवामान भत्ता, डॉक्टरांसाठी व्यवसायरोध भत्ता, शिक्षण भत्ता, गणवेश भत्ता, व्यवसाय पेटी देखभाल भत्ता व इतर काही किरकोळ भत्त्यांच्या दरात सुधारणा करण्यात आली आहे. गांधीनगर व सीमा भागासाठी असलेला विशेष पूरक भत्ता रद्द करण्यात आलेला आहे.

२.९.२ दौऱ्यासाठी (भारताबाहेरील दौऱ्याव्यतिरिक्त) व बदली झाल्यानंतर अनुज्ञेय वाहतूक भत्त्यात सुधारणा करण्यात आली आहे. दैनिक भत्त्याच्या दरात सुध्दा सुधारणा करण्यात आली आहे.

२.९.३ शासकीय दौऱ्यासाठी काढलेल्या तिकीटावर मिळालेल्या मायलेज पॉईंटचा वापर संबंधित विभागाने करावा. अधिकाऱ्याने त्याचा वैयक्तिक वापर केल्यास ते शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र राहतील.

२.९.४ वाहतूक भत्त्याचा दर त्यासाठीच्या काही अटींमध्ये बदल करुन सुधारित करण्यात आला आहे.

२.९.५ घरभाडे भत्त्यासाठी शहरे व नगरांचे सुधारित वर्गीकरण करण्यात आले आहे. नवीन वर्गिकरणानुसार घरभाडे भत्त्याचा दर (वेतन बँडमधील वेतन व ग्रेड वेतनाची टक्केवारी) : एक्स (पूर्वीचे वर्गीकरण ए-१) - ३० टक्के, वाय (पूर्वीचे वर्गीकरण ए, बी-१ व बी-२) - २० टक्के आणि झेड (पूर्वीचे वर्गीकरण सी व अवर्गिकृत भागांसाठी) - १० टक्के असा राहील.

२.९.६ जोखीम भत्ता रद्द करण्यात आला आहे. त्याऐवजी ज्यांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्यांत जोखीम आहे किंवा काही कालावधीनंतर आरोग्यास अपाय संभवण्याची शक्यता आहे अशा कर्मचाऱ्यांना मोफत वैद्यकीय सुविधा व पीबी-१ मधील कर्मचाऱ्यांसाठी रुपये ५ लाख, पीबी-२ साठी रुपये ७.५० लक्ष व त्यापेक्षा उच्च वेतन बँड/वेतनश्रेणींमधील कर्मचाऱ्यांसाठी रुपये १० लक्ष इतक्या रकमेच्या विम्याचे संरक्षण पुरविण्याचे प्रस्तावित आहे.

## २.१० रजा प्रवास सवलत

२.१०.१ रजा प्रवास सवलत योजनेत बदल करण्यात आला आहे. केंद्र शासनाच्या सेवेत दाखल झाल्यापासून सुरुवातीच्या चार वर्षांच्या दोन गट वर्षात तीन वेळा केंद्र शासकीय

कर्मचारी आपल्या कुटुंबासह स्वग्रामी व एका वेळेस भारतात कुठेही जाऊ शकतो. रजा प्रवास सवलतीसाठी कुटुंबाच्या व्याख्येतही काही सुधारणा करण्यात आल्या आहेत.

२.१०.२ रजा प्रवास सवलतीबरोबर १० दिवसांपर्यंत व एकूण ६० दिवसांच्या मर्यादेत रजा रोखीकरण सवलत यापुढेही सुरु राहील. तथापि, रजा प्रवास सवलतीच्या वेळेस केलेल्या रजा रोखीकरणाचा कालावधी सेवानिवृत्तिच्या वेळेस रोखीकरणासाठी अनुज्ञेय असलेल्या कमाल अर्जित रजेतून कमी करण्यात येणार नाही.

## २.११ अतिकालिक वेतन

२.११.१ औद्योगिक व कार्यकारी कर्मचारी वर्गांना वगळून अतिकालिक भत्ता किंवा तत्सम भत्ता रद्द करण्यात यावा (केंद्र शासनाने ही शिफारस नंतर तपासण्याचा निर्णय घेतला आहे).

## २.१२ सुट्टया व रजा सवलत

२.१२.१ केंद्र शासकीय कार्यालयांमध्ये पाच दिवसांचा आठवडा यापुढेही चालू ठेवण्यात यावा. यापुढे शासकीय कार्यालये फक्त तीन राष्ट्रीय सुट्टयांच्या दिवशी बंद ठेवण्यात यावीत. इतर सुट्टयांच्या दिवशी कार्यालये चालू ठेवावीत. वैकल्पिक सुट्टया आठ दिवसांपर्यंत वाढविण्यात याव्यात. नैमित्तिक रजा, अर्धवेतनी रजा व अर्जित रजेच्या कालावधीत कोणताही बदल होणार नाही (फक्त तीन दिवस कार्यालये बंद ही शिफारस केंद्र शासनाने स्वीकारलेली नाही). शिक्षकांसारख्या काही पदधारकांना अनुज्ञेय नसणारी अर्धवेतनी रजा अनुज्ञेय करण्यात यावी.

## २.१३ महिला शासकीय कर्मचारी

२.१३.१ "सोयीनुसार कामाचे तास" ही संकल्पना महिला कर्मचाऱ्यांसाठी राबविण्यात यावी. सकाळी ११.०० ते सायंकाळी ४.०० या कालावधीत महिला कर्मचाऱ्यांना कार्यालयात

हजर राहणे गरजेचे राहील. त्या करीत असलेल्या कामाच्या तासांचा विचार करुन त्यांना दीड तास उशिरा येण्याचा अथवा दोन तास लवकर जाण्याचा विकल्प देता येईल (ही शिफारस केंद्र शासनाने स्वीकारलेली नाही).

**२.१३.२** लहान मुलांची काळजी घेण्यासाठी महिला कर्मचाऱ्यांना दोन मुलांकरीता प्रत्येकी दोन वर्षापर्यंत रजा घेता येईल. सदर रजेस जोडून तिस-या वर्षी ना देय रजा देण्यात यावी.

**२.१३.३** बालवाडी अथवा प्राथमिक शाळेत जाणाऱ्या मुलांसाठी पाळणाघर/मुलांची काळजी घेणारे केंद्र स्थापन करणे सर्व कार्यालयांना बंधनकारक राहील.

**२.१३.४** प्रसुती रजा कालावधी १३५ दिवसांवरुन १८० दिवस करण्यात यावा. तसेच, प्रसुती रजेस जोडून अनुज्ञेय असलेला रजा कालावधी एका वर्षावरुन दोन वर्षे करण्यात यावा.

**२.१३.५** एकट्या राहणाऱ्या शासकीय महिला कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाचा प्रश्न सोडविण्यासाठी महिला वसतीगृहे बांधावी अथवा भाड्याने घेऊन उपलब्ध करण्यात यावी.

**२.१३.६** घरगुती हिंसाचार अधिनियमातील तरतुदींसारख्या तरतुदी केंद्रीय नागरी सेवा (वर्तणूक) नियमात करण्यात याव्यात.

**२.१३.७** पती-पत्नी शासकीय कर्मचारी असल्यास बदली प्रवास भत्ता सवलत मंजूर करतांना काही अटी शिथिल करण्यात याव्यात.

## २.१४ अपंग शासकीय कर्मचारी

**२.१४.१** इतर कर्मचा-यांना असलेल्या आठ दिवसांच्या नैमित्तिक रजा अपंग कर्मचाऱ्यांसाठी बारा दिवस करण्यात याव्यात.

**२.१४.२** अपंग कर्मचाऱ्यांना त्यांची कार्यालयीन कर्तव्ये चांगल्या प्रकारे पार पाडण्यासाठी साधने व उपकरणे विनामुल्य उपलब्ध करण्यात यावीत.

**२.१४.३** अपंग व्यक्तींच्या दृष्टीने कार्यालय परिसर सहज उपयोगात आणता येण्याजोगा असावा.

**२.१४.४** शासनामार्फत व्याजाने यापुढे आगाऊ रकमा देण्यात येऊ नयेत. त्याऐवजी बँकांमार्फत तसे कर्ज उपलब्ध करुन दिले तर त्यावर २ % व्याजाचा भार शासनाने सोसावा, या शिफारशीच्या अनुषंगांने अपंग व्यक्तींसाठी ४ % व्याजाचा भार शासनाने सोसावा.

**२.१४.५** अशा कर्मचाऱ्यांसाठी उदार - लवचिक कामाचे तास असावेत. उदार-लवचिक आठवड्याच्या संकल्पनेचाही समावेश करण्यात यावा (ही शिफारस केंद्र शासनाने स्वीकारलेली नाही).

**२.१४.६** अपंग महिला कर्मचाऱ्यांसाठी विशेष अतिरिक्त भत्ता (यास मुलांच्या संगोपनासाठी विशेष भत्ता असे संबोधण्यात यावे) म्हणून दरमहा रुपये १,०००/- देण्याची शिफारस करण्यात येत आहे. हा भत्ता जास्तीत जास्त दोन मुलांसाठी दोन वर्षांपर्यंत देण्यात यावा. शासकीय कर्मचाऱ्यांच्या अपंग पाल्यांना शैक्षणिक भत्ता हा सर्वसाधारण दराच्या दुप्पट दराने देण्यात यावा.

२.१४.७ अपंग कर्मचाऱ्यांना वाहतूक भत्ता सर्वसाधारण दरापेक्षा दुप्पट दराने देण्यात यावा.

## २.१५ गट विमा योजना आणि सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना

२.१५.१ केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या गट विमा योजनेचा मासिक वर्गणी दर आणि विम्याची रक्कम गट-अ साठी अनुक्रमे रुपये ७२० व रुपये ७,२०,०००, गट-ब साठी

अनुक्रमे रुपये ३६० व रुपये ३,६०,००० आणि गट-क साठी अनुक्रमे रुपये १८० व रुपये १,८०,००० इतकी वाढविण्यात यावी. तसेच यापुढे सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीमधील गुंतवणूक ही पूर्णपणे स्वेच्छेने कोणत्याही किमान मर्यादेशिवाय करण्यात यावी (केंद्र शासनाने सदर शिफारशी स्वतंत्रपणे तपासण्याचा निर्णय घेतला आहे).

## २.१६ सेवेतील कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसाठी वैद्यकीय सुविधा

**२.१६.१** केंद्र शासकीय कर्मचा-यांसाठी तसेच सेवानिवृत्तांसाठी आरोग्य विमा योजना लागू करण्यात यावी. सेवेतील व सेवानिवृत्त कर्मचा-यांसाठी ऐच्छिक असलेली सदर योजना कार्यान्वित झाल्यानंतर सेवेत रुजू होणाऱ्या कर्मचाऱ्यांना आणि निवृत्तिवेतनधारकांना अनिवार्य करण्यात यावी. गट-अ, ब आणि क च्या कर्मचाऱ्यांना यासाठी हप्त्याची रक्कम अनुक्रमे ३० टक्के, २५ टक्के आणि २० टक्के भरावी लागेल तर उर्वरित रक्कम शासनामार्फत भरण्यात येईल (सदर शिफारस स्वतंत्रपणे तपासण्याचे केंद्र शासनाने ठरविले आहे).

## २.१७ निवृत्तिवेतनविषयक लाभ

**२.१७.१** वृद्ध निवृत्तिवेतनधारकांना (कुटुंब निवृत्तिवेतनधारकांसह) मिळणाऱ्या निवृत्तिवेतनाच्या प्रमाणात पुढीलप्रमाणे वाढ करण्यात यावी :-

| | | |
|---|---|---|
| ८० वर्षे | २० टक्के | मूळ निवृत्तिवेतनाच्या प्रमाणात अतिरिक्त निवृत्ती वेतन |
| ८५ वर्षे | ३० टक्के | मूळ निवृत्तिवेतनाच्या प्रमाणात अतिरिक्त निवृत्ती वेतन |
| ९० वर्षे | ४० टक्के | मूळ निवृत्तिवेतनाच्या प्रमाणात अतिरिक्त निवृत्ती वेतन |
| ९५ वर्षे | ५० टक्के | मूळ निवृत्तिवेतनाच्या प्रमाणात अतिरिक्त निवृत्ती वेतन |
| १०० वर्षे | १०० टक्के | मूळ निवृत्तिवेतनाच्या प्रमाणात अतिरिक्त निवृत्ती वेतन |

२.१७.२ निवृत्तिवेतनासाठी ३३ वर्षांच्या अर्हताकारी सेवेचा संबंध संपुष्टात आणण्यात यावा. कर्मचा-याने २० वर्षांची किमान अर्हताकारी सेवा केल्यानंतर त्यास शेवटच्या दहा महिन्यांच्या वेतनाच्या सरासरीच्या ५० टक्के किंवा शेवटच्या वेतनाच्या ५० टक्के यापैकी जे फायदेशीर असेल ते निवृत्तिवेतन देय राहील.

२.१७.३ निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणासाठी अंशराशीकरणाचा तक्ता सुधारित केला आहे. उपदानाची विशिष्ट उच्चतम मर्यादा रुपये १० लक्ष रुपयांपर्यंत वाढविण्यात यावी.

२.१७.४ अर्जित रजा आणि अर्धवेतनी रजा या दोन्ही रजा ३०० दिवसांच्या मर्यादेत रोखीकरणासाठी विचारात घेण्यात याव्यात. अर्धवेतनी रजेचे रोखीकरण अर्जित रजा वेतनाच्या निम्मे अनुज्ञेय राहील.

२.१७.५ कर्तव्यावर असताना मृत्यू पावलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत कुटुंब निवृत्तिवेतन दहा वर्षांच्या कालावधीसाठी वाढीव दराने देण्यात यावे.

२.१७.६ विकलांगता निवृत्तिवेतनाच्या बाबतीत स्थायी देखभाल भत्ता देण्यात यावा.

२.१७.७ कर्तव्ये पार पाडत असताना अपघाती मृत्यू झाला तर (उदा.दहशतवाद/हिंसाचार किंवा इतर कारणांमुळे) सानुग्रह अनुदान दुप्पट दराने म्हणजे रुपये १० लक्ष इतके आणि शत्रूंबरोबरच्या आंतरराष्ट्रीय युध्दात सीमेवरील अथवा आतंकवाद्याबरोबरच्या चकमकीत किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे मृत्यू आल्यास रुपये १५ लक्ष इतके अनुज्ञेय राहील.

२.१७.८ पूर्वीच्या निवृत्तिवेतनधारकांना सुधारित निवृत्तिवेतनाची परिगणना ७४ टक्के या दराने महागाई भत्ता गृहीत धरुन (महागाई वेतनाचे विलिनीकरण विचारात न घेता) करण्यात आली आहे. त्याप्रमाणे निवृत्तिवेतन निश्चितीसाठी विवरणपत्र तयार केले आहे. तथापि, कोणत्याही परिस्थितीत सुधारित निवृत्तिवेतन हे ज्या विद्यमान वेतनश्रेणीत निवृत्तिवेतनधारक

सेवेतून निवृत्त झाला त्या वेतनश्रेणीस अनुज्ञेय समकक्ष वेतन बँडमधील किमान वेतन आणि त्यावरील ग्रेड वेतन यांच्या बेरजेच्या ५० टक्क्यांपेक्षा कमी राहणार नाही.

२.१७.९ कुटुंब निवृत्तिवेतन आणि इतर अनुषंगिक निवृत्तिवेतनविषयक लाभांच्या अनुज्ञेयतेसाठी विधवा मुलींचा सुध्दा प्रथम गटात समावेश करण्यात यावा.

२.१७.१० मृत शासकीय कर्मचाऱ्याच्या अपत्यहिन विधवेस तिच्या पुनर्विवाहानंतरसुध्दा कुटुंब निवृत्तिवेतन देय राहील. तथापि, तिचे सर्व स्त्रोतातून येणारे वैयक्तिक उत्पन्न हे किमान देय असलेल्या कुटुंब निवृत्तिवेतनाइतके किंवा त्यापेक्षा जास्त झाल्यावर ते बंद करण्यात येईल.

## २.१८ सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना

२.१८.१ सध्याची दोन आर्थिक श्रेणीवाढींची आश्वासित प्रगती योजना पुढील सुधारणांसह यापुढेही चालू ठेवण्यात यावी :-

(१) सदर योजना गट-अ पदांसाठीही (संघटीत गट-अ सेवेतील पदांव्यतिरिक्त) लागू राहील.

(२) सदर योजनेचा फायदा देताना नियमित पदोन्नतीप्रमाणे वेतननिश्चिती करण्यात यावी.

(३) या योजनेंतर्गत वित्तीय श्रेणीवाढ देताना ग्रेड वेतन हे लगतचे उच्च ग्रेड वेतन राहील. पुढील पदोन्नतीच्या पदास अनुज्ञेय असलेले ग्रेड वेतन जर जास्त असेल तर ते फक्त नियमित पदोन्नतीच्या वेळीच देय राहील.

(४) एकाच पदावर १२ वर्षांची सेवा झाल्यानंतर वित्तीय श्रेणीवाढ अनुज्ञेय राहील. तथापि, संपूर्ण सेवेत दोनपेक्षा जास्त वित्तीय श्रेणीवाढी दिल्या जाणार नाहीत.

(केंद्र शासनाने सदर शिफारशींची अंमलबजावणी करतांना या योजनेंतर्गत १०, २० व ३० वर्षांनंतर तीन श्रेणीवाढी देण्याचे मान्य केले आहे)

## २.१९ मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा

२.१९.१ गट-ब आणि क मधील सरळसेवेने भरण्यात येणाऱ्या पदांपैकी १० टक्के पदे यापुढे मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेद्धारे भरण्यात यावीत. याकरीता सरळ सेवेद्वारे भरण्यात येणाऱ्या पदांसाठी विहित शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा गट कोणताही असला व त्यामध्ये कितीही सेवा झालेली असली तरी पात्र समजण्यात यावे.

## २.२० स्वेच्छानिवृत्ती

२.२०.१ पंधरा वर्षांची सेवा पूर्ण केलेल्या परंतु वीस वर्षांपेक्षा कमी सेवा झालेल्या सर्व केंद्रीय कर्मचाऱ्यांना ८० महिन्यांच्या वेतनाइतकी (शेवटच्या महिन्यात अर्जित केलेल्या वेतनावर किंवा सरासरी वेतन यापैकी जी अधिक लाभदायक असेल ती) रक्कम (अनुज्ञेय लाभांसह) एकरकमी देण्यात यावी (सदर शिफारस केंद्र शासनाने स्वीकारलेली नाही).

## २.२१ कार्यक्षम आणि प्रतिसादात्मक प्रशासन

२.२१.१ सेवा पुरविणाऱ्या प्रत्येक स्तरावर अधिकारांचे विकेंद्रीकरण, अधिकार प्रदानाच्या अनुषंगाने स्पष्ट जबाबदारीची निश्चिती व व्यवस्थापकीय रचनेत सुयोग्य बदल केले गेले पाहिजेत. त्यामुळे जबाबदारी निम्न कार्यात्मक स्तर व कर्मचा-यांपर्यंत जाईल.

२.२१.२ कर्मचारी वर्गाच्या कार्यक्षमता वाढीसाठी आणि त्यांच्या बळकटीकरणासाठी बहुविध कुशल शासकीय कर्मचारी तयार करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

२.२१.३ शासन सेवेतून आणि शासन सेवेबाहेरुन उत्तम गुणवत्ताधारक उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शासनातील उच्चतम स्तरावर थेट सेवा प्रवेशाची शिफारस करण्यात आली आहे.

## २.२२ अंमलबजावणीची तारीख

**२.२२.१** वेतन बँड आणि ग्रेड वेतनासह सुधारित वेतन संरचना दिनांक १.१.२००६ पासून अंमलात येईल. २० वर्षांची अर्हताकारी सेवा झाल्यानंतर निवृत्तिवेतनाबाबतची शिफारस भावी प्रभावाने अंमलात येईल. सर्व भत्त्यांबाबतच्या शिफारशीदेखील भावी प्रभावाने अंमलात येतील.

***

# प्रकरण ३ - राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या सुधारित वेतन संरचनेबाबत शिफारशी

## ३.१ वेतन बँड आणि ग्रेड वेतनावर आधारीत सुधारित वेतन संरचना

३.१.१ प्रकरण - २ मध्ये नमूद केल्यानुसार सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाने केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांकरीता सध्याच्या विविध वेतनश्रेणींऐवजी वेतन बँड आणि ग्रेड वेतनावर आधारीत सुधारित वेतन संरचनेची शिफारस केली आहे. पाचव्या वेतन आयोगाने काही वेतनश्रेणींचे विलीनीकरण करुन केंद्र शासनाकडील वेतनश्रेणींची संख्या ५१ वरुन ३४ इतकी केली होती. सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाने यापूर्वीची वेतनश्रेणीची पद्धती काही सुधारणेंसह यापुढेही चालू ठेवणे अथवा संपूर्णत: नवीन वेतन संरचना लागू करणे या दोन पर्यायांचा सर्वंकष विचार केला. नवीन वेतन संरचनेमुळे सध्याच्या वेतनश्रेणी पद्धतीतील विविध त्रूटींचे प्रमाण कमी होईल आणि वेतननिश्चिती संदर्भातील निर्णय प्रक्रिया सुलभ होईल या उद्देशाने नवीन वेतन संरचना पद्धती लागू करण्याचा पर्याय स्विकारला. वेतन संरचनेत वेतन बँडमधील कमाल व किमान वेतनात मोठे अंतर असल्यामुळे पूर्वीच्या वेतनश्रेणी पद्धतीतील मूळ वेतनातील कुंठीतता या नवीन पद्धतीमध्ये राहणार नाही, हा या पद्धतीचा विशेष फायदा आहे. तसेच, एका वेतनश्रेणीमधून दुसऱ्या वेतनश्रेणीमध्ये वेतननिश्चिती करताना उद्‌भवणारे प्रश्न (वरिष्ठ कर्मचाऱ्याचे वेतन कनिष्ठापेक्षा कमी निश्चित होणे इत्यादी) या नवीन पद्धतीमुळे लक्षणीयरित्या कमी होतील. या पद्धतीत प्रत्येक पदास वेतन बँड मधील वेतनाव्यतिरिक्त ग्रेड वेतन विहित केले आहे. ग्रेड वेतन हे संबंधित पदाच्या दर्जानुसार मिळणारी ठराविक रक्कम आहे. वार्षिक वेतनवाढीच्या परिगणनेसाठी ग्रेड वेतनसुद्धा विचारात घेण्यात येते.

**३.१.२** प्रकरण - २ मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे गट क ते गट अ मधील पदांसाठी पीबी - १,पीबी -२,पीबी -३ व पीबी - ४ अशा चार वेतन बँडची सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाने शिफारस केली आहे. याशिवाय गट ड पदांसाठी -१एस या वेतन बँडची शिफारस केली आहे. तथापि, हा नियमित वेतन बँड नसून यापूढे या वेतन बँडमध्ये नवीन नियुक्ती केली जाणार नाही. या वेतन बँड मधील कर्मचारी गट क मध्ये नियुक्तीसाठी आवश्यक अर्हता धारण करीत असल्यास त्यांना थेट गट क मध्ये नियुक्ती द्यावयाची असून उर्वरीत कर्मचारी सदर अर्हता प्राप्त होईपर्यंत गट ड मध्ये आणि सध्याच्याच वेतन बँडमध्ये वेतन घेत राहतील. आयोगाने रु.१३०० ते १३००० दरम्यान एकूण २३ ग्रेड वेतनांची देखील शिफारस केली आहे.

**३.१.३** आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी करताना केंद्र शासनाने वेतन बँड आणि ग्रेड वेतन यामध्ये काही बदल करुन खालीलप्रमाणे वेगवेगळे वेतन बँड व ग्रेड वेतन विहित केले आहेत :-

| | | |
|---|---|---|
| वेतन बँड -१एस | रु. ४४४०-७४४० | ग्रेड वेतन रु. १३०० ते रु. १६५० |
| वेतन बँड पीबी-१ | रु. ५२००-२०२०० | ग्रेड वेतन रु. १८०० ते रु. २८०० |
| वेतन बँड पीबी-२ | रु. ९३००-३४८०० | ग्रेड वेतन रु. ४२०० ते रु. ५४०० |
| वेतन बँड पीबी-३ | रु. १५६००-३९१०० | ग्रेड वेतन रु. ५४०० ते रु. ७६०० |
| वेतन बँड पीबी-४ | रु. ३७४००-६७००० | ग्रेड वेतन रु. ८७०० ते रु. १२००० |

**३.१.४** सर्व अनुषंगिक बाबींचा विचार करुन समिती अशा निष्कर्षाप्रत आली आहे की, वेतन बँड आणि ग्रेड वेतनावर आधारित सुधारित वेतन संरचनेची संकल्पना स्विकारणे राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या हिताची तसेच प्रतिसादात्मक, परिणामकारक आणि कार्यक्षम प्रशासनाच्या दृष्टीने लाभदायक ठरेल. त्यामुळे सुधारित वेतन संरचनेची संकल्पना स्विकारण्याची समिती शिफारस करीत आहे.

## ३.२ राज्य शासकीय कर्मचाऱ्यांसाठी सुधारित वेतन संरचना (वेतन बँड व ग्रेड वेतन)

**३.२.१** राज्य वेतन सुधारणा समिती, १९९७ च्या शिफारशींच्या आधारे राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीत दिनांक १.१.१९९६ पासून सुधारणा करण्यात येऊन त्यानुसार विविध पदांना २३ वेतनश्रेणी मंजूर करण्यात आल्या होत्या. या वेतनश्रेणींसाठी खालील तक्ता क्र. ३.१ मध्ये दर्शविल्याप्रमाणे सुधारित वेतन संरचनेत एकूण ५ वेतन बँड (-१एस वेतन बँड सह) व समुचित ग्रेड वेतनाची समिती शिफारस करीत आहे :-

**तक्ता क्रमांक ३.१ : राज्य शासकीय कर्मचाऱ्यांसाठी सुधारित वेतन संरचना**

| अ.क्र. | दिनांक १.१.१९९६ पासून विहित वेतनश्रेणी (रुपये) | शिफारस केलेला वेतन बँड क्रमांक | शिफारस केलेली सुधारित वेतन संरचना | |
|---|---|---|---|---|
| | | | वेतन बँड (रुपये) | ग्रेड वेतन (रुपये) |
| १ | २५५०-३२०० | -१एस | ४४४०-७४४० | १३०० |
| २ | २६१०-४००० | -१एस | ४४४०-७४४० | १६०० |
| ३ | २६५०-४००० | -१एस | ४४४०-७४४० | १६५० |
| ४ | २७५०-४४०० | पीबी-१ | ५२००-२०२०० | १८०० |
| ५ | ३०५०-४५९० | पीबी-१ | ५२००-२०२०० | १९०० |
| ६ | ३२००-४९०० | पीबी-१ | ५२००-२०२०० | २००० |
| ७ | ४०००-६००० | पीबी-१ | ५२००-२०२०० | २४०० |
| ८ | ४५००-७००० | पीबी-१ | ५२००-२०२०० | २८०० |
| ९ | ५०००-८००० | पीबी-२ | ९३००-३४८०० | ४२०० |
| १० | ५५००-९००० | पीबी-२ | ९३००-३४८०० | ४३०० |
| ११ | ६५००-१०५०० | पीबी-२ | ९३००-३४८०० | ४४०० |
| १२ | ७४५०-११५०० | पीबी-२ | ९३००-३४८०० | ४६०० |
| १३ | ७५००-१२००० | पीबी-२ | ९३००-३४८०० | ४८०० |
| १४अ | ८०००-१३५०० (गट अ- पूर्वीचा वर्ग - २) | पीबी-२ | ९३००-३४८०० | ५४०० |
| १४ब | ८०००-१३५०० (गट अ- पूर्वीचा वर्ग - १) | पीबी-३ | १५६००-३९१०० | ५४०० |
| १५ | १००००-१५२०० | पीबी-३ | १५६००-३९१०० | ६६०० |
| १६ | १०६५०-१५८५० | पीबी-३ | १५६००-३९१०० | ६६०० |
| १७ | १२०००-१६५०० | पीबी-३ | १५६००-३९१०० | ७६०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १८ | १४३००-१८३०० | पीबी-४ | ३७४००-६७००० | ८७०० |
| १९ | १५१००-१८३०० | पीबी-४ | ३७४००-६७००० | ८७०० |
| २० | १६४००-२०००० | पीबी-४ | ३७४००-६७००० | ८९०० |
| २१ | १६४००-२०९०० | पीबी-४ | ३७४००-६७००० | ८९०० |
| २२ | १८४००-२२४०० | पीबी-४ | ३७४००-६७००० | १०००० |
| २३ | २२४००-२४५०० | पीबी-४ | ३७४००-६७००० | १२००० |

**३.२.२** वरील तक्ता ३.१ मधील अ.क्र. ९, १० व ११ समोरील नोंदीबाबत पुढील प्रमाणे विश्लेषण करणे आवश्यक वाटते. सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींनुसार केंद्र शासनाने रुपये ५०००-८०००, रुपये ५५००-९००० आणि रुपये ६५००-१०५०० या तीन विद्यमान वेतनश्रेणींसाठी एकच वेतन बँड (पीबी-२) आणि ग्रेड वेतन (रुपये ४२००) मंजूर केले आहे. ही वेतन संरचना जशीच्या तशी राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत लागू केल्यास त्याची अंमलबजावणी करताना प्रशासकीय अडचणी उद्‌भवू शकतील असे समितीच्या निदर्शनास आले आहे. अनेक प्रशासकीय विभागांत खालील प्रमाणे परिस्थिती असल्याचे समितीस दिसून आले आहे :-

(अ) रुपये ५५००-९००० या वेतनश्रेणीतील पदे रुपये ५०००-८००० या वेतनश्रेणीतील पदांच्या पदोन्नतीची पदे आहेत.

(ब) रुपये ६५००-१०५०० या वेतनश्रेणीतील पदे रुपये ५०००-८००० या वेतनश्रेणीतील पदांच्या पदोन्नतीची पदे आहेत.

(क) रुपये ६५००-१०५०० या वेतनश्रेणीतील पदे रुपये ५५००-९००० या वेतनश्रेणीतील पदांच्या पदोन्नतीची पदे आहेत.

वरील परिस्थितीत सदर वेतनश्रेणीतील पदांना समान सुधारित वेतन संरचना (एकच वेतन बँड व ग्रेड वेतन) लागू केल्यास प्रशासकीय अडचणी उद्‌भवण्याची शक्यता आहे; या अडचणी टाळण्यासाठी प्रशासकीय विभागांचे अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, विभाग प्रमुख व संघटनेंच्या प्रतिनिधींसमवेत झालेल्या प्रत्यक्ष चर्चेच्यावेळी या वेतनश्रेणींसाठी सुधारित वेतन संरचना मंजूर करताना ग्रेड वेतनात फरक ठेवण्याची

मागणी केली होती. समितीस ही मागणी योग्य वाटत असून त्यास सहमती दर्शविणे योग्य होईल अशा निष्कर्षाप्रत समिती आली आहे. समितीचे असे देखील मत झाले की, या तीनही वेतनश्रेणीतील निम्न व पदोन्नतीच्या पदांसाठी सुधारित वेतन संरचनेत ग्रेड वेतनात फरक ठेवल्यास व या वेतन श्रेणीतील इतर पदधारकांच्या ग्रेड वेतनात काही बदल न केल्यास उच्च वेतनश्रेणीतील पदधारकांना कमी ग्रेड वेतन अनुज्ञेय होईल व त्यामुळे त्यांच्यात भेदभाव केल्याची भावना निर्माण होण्याची शक्यता आहे. या सर्व बाबींचा विचार करुन रुपये ५०००-८०००, ५५००-९००० व ६५००-१०५०० या विद्यमान वेतनश्रेणींसाठी अनुक्रमे रुपये ४२००,४३०० व ४४०० हे वेगवेगळे ग्रेड वेतन मंजूर करण्याची शिफारस समिती करीत आहे.

**३.२.३** तक्ता क्र. ३.१ नुसार विद्यमान वेतनश्रेणींतील पदास अनुज्ञेय असलेले सुधारित वेतन संरचनेतील समकक्ष वेतन बँड व ग्रेड वेतन निश्चित करणे शक्य आहे. तथापि, या प्रकरणातील पुढील परिच्छेदांत स्पष्ट केल्याप्रमाणे विविध बाबी विचारात घेऊन विशिष्ट संवर्ग पदांच्या ग्रेड वेतनात काही बदल प्रस्तावित करणे आवश्यक ठरले आहे (या विशिष्ट बाबी राज्य शासकीय संवर्ग पदांच्या संदर्भात लागू ठरत असून, केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत अशी परिस्थिती असल्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे खाली स्पष्ट केल्याप्रमाणे वरील तक्ता ३.१ मध्ये नमूद केल्याव्यतिरीक्त काही नवीन ग्रेड वेतन स्विकारणे अपरिहार्य ठरले आहे). त्यामुळे असे नमूद करण्यात येते की, तक्ता ३.१ मध्ये दर्शविलेले सुधारित वेतन संरचनेतील वेतन बँड व ग्रेड वेतन हे या प्रकरणाच्या पुढील भागांमध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे काही पदांसंदर्भातील विशिष्ट शिफारशींच्या अधिन राहतील.

**३.२.४** वरील तक्ता ३.१ मध्ये दर्शविलेल्या २३ विद्यमान वेतनश्रेणींखेरीज दिनांक १.१.१९९६ नंतर रुपये ६०००-१००००, ७२२५-११०५०, ७२२५-१२००० आणि ९१२५-१४०७५ या चार नवीन वेतनश्रेणी काही संवर्ग पदांना मंजूर करण्यात आल्या आहेत. या वेतनश्रेणी दिनांक १.१.१९९६ रोजी अस्तित्वात नसल्यामुळे या वेतनश्रेणींतील पदधारकांसाठी सुधारित वेतन संरचनेमध्ये वेतन बँड आणि ग्रेड वेतन कशाप्रकारे विहित करावे याबाबत पुढील परिच्छेदात स्वतंत्रपणे विवेचन करण्यात आले आहे.

**३.२.५** वरील तक्ता ३.१ मध्ये नमूद केलेले सुधारित वेतन संरचनेतील वेतन बँड आणि ग्रेड वेतन हे दिनांक १.१.१९९६ पासून अंमलात असलेल्या वेतनश्रेणींच्या बाबतीत लागू करण्यात यावेत व दिनांक १.१.१९९६ नंतर पुन:सुधारित करण्यात आलेल्या वेतनश्रेणींच्या बाबतीत सुधारित वेतन संरचनेमध्ये वेतन बँड आणि ग्रेड वेतन कशाप्रकारे विहित करावे याबाबत पुढील परिच्छेदात स्वतंत्रपणे विवेचन करण्यात आले आहे. [महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, १९९८ अंमलात आल्यानंतर ज्या संवर्ग पदांच्या वेतनश्रेणी पुन:सुधारित करण्यात आलेल्या आहेत त्या वेतनश्रेणींचे पुन:परिक्षण करुन सुधारित वेतनश्रेणी विहित करण्यांची बाब समितीच्या कार्यकक्षेचा एक भाग असल्याने सदर विवेचन करण्यात आले आहे].

**३.२.६** दिनांक १.१.२००६ पूर्वी कालबद्ध पदोन्नती योजना अथवा सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळालेल्या कर्मचाऱ्यांना सुधारित वेतन संरचनेत अनुज्ञेय होणाऱ्या वेतन बँड व ग्रेड वेतनाचा तपशिल परिच्छेद क्रमांक ३.२७.६ मध्ये नमूद करण्यांत आला आहे.

**३.२.७** सुधारित वेतन संरचना स्विकारण्यात आल्यानंतर करावयाची वेतननिश्चिती, एका संवर्ग पदावरुन दुसऱ्या संवर्ग पदावर पदोन्नती झाल्यानंतर अनुज्ञेय लाभ,

वेतनवाढीचा दर तसेच वेतनवाढीचा दिनांक या मुद्यांबाबतही या प्रकरणांच्या नंतरच्या भागांमध्ये विश्लेषण करण्यात आले आहे.

## ३.३ गट ड मधील कर्मचारी

**३.३.१** परिच्छेद ३.१.२ मध्ये थोडक्यात वर्णन केल्यानुसार गट ड मधील कर्मचाऱ्यांसाठी सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाने काही प्रमुख शिफारशी केल्या आहेत. -१एस वेतन बँड हा तात्पुरत्या स्वरुपाचा असून या बँडमध्ये यापूढे नियुक्ती केली जाणार नाही. आयोगास असे अपेक्षित आहे की, गट ड मधील कर्मचाऱ्यांना शक्य तितक्या लवकर गट क मध्ये सामावून घेण्यात यावे. गट ड मधील जे कर्मचारी विहित अर्हताधारक आहेत त्यांना गट क मध्ये थेट सामावून घेण्यात यावे. उर्वरित कर्मचाऱ्यांना आवश्यक त्या प्रशिक्षणानंतर गट क मध्ये सामावून घेऊन पीबी-१ या वेतन बँडमध्ये वेतन अदा करण्यात यावे. दरम्यानच्या कालावधीत त्यांना -१एस या वेतन बँडमध्ये वेतन मिळेल. गट ड मधील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देऊन गट क मध्ये सामावून घेण्यासाठी योग्य तो प्रशिक्षण कार्यक्रम तयार करण्याचे काम केंद्र शासनाच्या संबंधित मंत्रालय व विभागांवर आयोगाने सोपविले आहे. आयोगाने पुढे अशीही शिफारस केली आहे की, गट क मधील कर्मचाऱ्यांकडून विविध प्रकारचे काम करुन घेण्याच्या उद्देशाने त्यांच्या कार्यसूचीत बहुविध कुशलतेचा समावेश करण्याकरीता भर देण्यात यावा. पुढे असेही सुचविण्यात आले आहे की, गट ड मधील कर्मचाऱ्यांना गट क मध्ये सामावून घेताना त्यांच्यासाठी योग्य पदनाम निश्चित करण्यात यावे. त्यासाठी कुशल कारागीर सहाय्यक हे पदनामही सुचविण्यात आले आहे.

३.३.२ आयोगाने केलेल्या गट ड मधील कर्मचाऱ्यांच्या कार्यसूचीत आमुलाग्र बदल करणाऱ्या वरील शिफारशी समितीस योग्य वाटतात. तथापि, निव्वळ नावात बदल

करुन या शिफारशींवरील कार्यवाही न थांबविता त्यामध्ये सार्थ बदल करणे आवश्यक आहे. त्यासाठी कुशल कारागीर सहाय्यक (अथवा त्यांना देण्यात येणारे अन्य पदनाम) यांच्याकडून कोणत्या प्रकारचे काम अपेक्षित आहे याबाबत निश्चित अशी रुपरेषा ठरवावी लागेल आणि हे साध्य करण्यासाठी गट ड कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणात व त्यांच्या कार्यकुशलतेत वाढ करण्याचा प्रशिक्षण कार्यक्रम त्यांची शैक्षणिक अर्हता व त्यांच्यातील कार्यक्षमता विचारात घेऊन काळजीपूर्वक ठरवावा लागेल. कदाचित, त्यांची कार्यक्षमता लक्षात घेऊन गट ड मधील विविध गटातील कर्मचाऱ्यांसाठी वेगवेगळे प्रशिक्षण कार्यक्रम तयार करावे लागतील. समितीस असे वाटते की, या महत्वाच्या बाबींवर निर्णय घेऊन पुढील कार्यवाही करण्याचे काम संबंधित प्रशासकीय विभागांवर न सोपविता गट ड कर्मचाऱ्यांना कुशल कामाचे प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम तयार करणे, त्यासाठी योग्य प्रशिक्षण संस्थेची निवड करणे या कामात सामान्य प्रशासन विभागाने सक्रीय सहभाग घेणे आवश्यक आहे. सहाजिकच हे करण्यासाठी काही कालावधी लागण्याची शक्यता असून यासाठी वेळेचे बंधन घालणे समितीस उचित वाटत नाही.

**३.३.३** वरील सूचनेबरोबरच समितीस असेही वाटते की, गट - क मधील पदावर नियुक्तीसाठी विहित शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या गट ड मधील कर्मचाऱ्यांना कनिष्ठ लिपिकासारख्या पदावर सामावून घेणे निश्चितच उचित ठरेल. गट ड मधील विहित शैक्षणिक अर्हताधारक २५ टक्के कर्मचाऱ्यांना कनिष्ठ लिपिक पदावर पदोन्नती देण्याची योजना पूर्वीपासूनच राज्य शासनाकडे अस्तित्वात आहे. याप्रमाणेच इतर तत्सम पदांवर सुद्धा गट ड मधील अर्हताधारक कर्मचाऱ्यांना सामावून घेण्याचा प्रयत्न करणे योग्य ठरेल. गट ड मधील जास्तीत जास्त विहित अर्हताधारक कर्मचाऱ्यांना गट क मधील कनिष्ठ लिपिक किंवा तत्सम पदावर शक्य तितक्या लवकर सामावून घेण्याची

समिती शिफारस करीत आहे. याप्रमाणे गट ड मधील जास्तीत जास्त कर्मचाऱ्यांना गट क मधील पदावर लवकरात लवकर सामावून घेता येईल. समिती अशीही शिफारस करते की, गट क मध्ये नियुक्तीसाठी विहित अर्हता धारण करत नसणाऱ्या गट ड मधील कर्मचाऱ्यांनी सदर अर्हता शक्य तितक्या लवकर धारण करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन देण्यात यावे. असे केल्यावरही मोठ्या प्रमाणात गट ड मधील कर्मचारी गट क मध्ये पदोन्नती शिवाय राहणार असल्यास त्यांना प्रशिक्षणाअंती त्यांच्या कार्यकुशलतेत वाढ करुन कुशल कारागीर सहाय्यक म्हणून पदोन्नती देण्याचा कार्यक्रम राबविण्याबाबत सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींचा विचार करावा लागेल. तथापि, हा कार्यक्रम वरील परिच्छेद ३.३.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे पूर्ण विचारांती ठरवावा लागेल. जोपर्यंत गट ड मधील सर्व कर्मचारी कनिष्ठ लिपिक किंवा अन्य गट क मधील पदावर सामावून घेण्यात येणार नाहीत तोपर्यंत त्यांना -१एस या वेतन बँड मध्ये ठेवण्यात यावे. समिती अशीही शिफारस करते की, यापुढे गट ड मध्ये (गट क मधील पदावर नियुक्तीसाठी योग्य नसलेल्या उमेदवारांच्या अनुकंपा तत्वावरील नियुक्तीखेरीज) कर्मचाऱ्यांची नवीन नियुक्ती करण्यात येऊ नये. अनुकंपा तत्वावर गट ड मध्ये नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना -१एस या वेतन बँड मध्ये ठेवण्यात यावे व गट क मध्ये नियुक्तीसाठी विहित अर्हता प्राप्त करण्याचे त्यांना सुचविण्यात यावे.

## ३.४ विविध कर्मचारी संघटनांकडून प्राप्त झालेल्या निवेदनांबाबत समितीचा दृष्टीकोन

३.४.१ विविध विभागांतील संवर्ग पदांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या सुमारे ३५० संघटनांकडून समितीस निवेदने प्राप्त झाली. त्यातील काही निवेदनातील मागण्या समितीच्या कार्यकक्षेतील नाहीत. तर, बरीचशी निवेदने विविध संवर्ग पदांच्या वेतन संरचनेत सुधारणा करण्यासंबंधीची होती. कोणत्याही सबळ कारणाशिवाय उच्च वेतन

बँड व ग्रेड वेतनाच्या केलेल्या मागण्यांसह या निवेदनांत उच्च वेतन संरचनेच्या समर्थनार्थ प्रामुख्याने केंद्र शासनाकडील समतुल्य पदांशी असलेली सापेक्षता, राज्यातील इतर संवर्ग पदांबरोबर पूर्वी असलेली परंतु तद्नंतर गेलेली सापेक्षता पूर्ववत करणे, पदांच्या कर्तव्य अथवा जबाबदारीत वाढ होणे, पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसणे इत्यादी कारणे नमुद केली आहेत. तसेच पदोन्नती व निम्न पदाच्या वेतन संरचेनेत फरक ठेवण्याचा महत्वाचा मुद्दाही संघटनांकडून मांडण्यात आला. अशाप्रकारची स्थिती काही पदांबाबत सद्यस्थितीत देखील अस्तित्वात आहे व सहाव्या वेतन आयोगाने काही वेतनश्रेणींचे एकत्रिकरण केल्यामुळे त्यामध्ये अधिक भर पडली आहे. समितीच्या असेही निदर्शनास आणण्यात आले की, काही पदांना यापूर्वी योग्य वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली नाही. समितीने संघटनांकडून प्राप्त झालेल्या सर्व निवेदनांचा काळजीपूर्वक विचार केला. तथापि, बहुतांशी मागण्या खाली दिलेल्या विविध कारणास्तव समितीस मान्य करणे शक्य झाले नाही हे देखील समितीस नमूद करावेसे वाटते.

**३.४.२** केंद्र शासनाकडील संवर्ग पदांबरोबर सापेक्षता देण्याबाबत नमूद करण्यात येते की, हे तत्व सर्वसाधारणपणे मान्य असले तरी बऱ्याचशा प्रकरणी हे तत्व लागू करण्यात अडचणी आहेत. अनेक संवर्ग पदांबाबत अशी सापेक्षता शैक्षणिक अर्हता व अनुभव, कर्तव्ये व जबाबदारीतील समानता, कामाचा व्याप व राज्य आणि केंद्र शासनाकडील संबंधित कामांच्या प्राथम्यातील फरक या सर्व बाबी लक्षात घेऊन ठरविण्यात आली नाही. सापेक्षता ठरविताना दुर्लक्षित झालेला दुसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे केंद्र शासनाकडील समतुल्य पदाची वेतनश्रेणी राज्य शासनाकडील पदास देताना त्या पदाची राज्य शासनाकडील इतर पदांबरोबर प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे असलेली सापेक्षता भंग होऊ शकेल हा आहे. एखाद्या पदास केंद्र शासनाने ज्या कारणांसाठी उच्च वेतनश्रेणी मंजूर केली ती कारणे राज्य शासनाकडील पदांच्या कर्तव्ये व जबाबदारीच्या प्राथम्याशी सुसंगत

ठरतीलच असे नाही  हा मुद्दादेखील या ठिकाणी दुर्लक्षित करुन चालणार नाही. राज्य शासनाकडील पदांची केंद्र शासनाकडील पदाशी सापेक्षता ठरविताना येणाऱ्या वरील सर्व मर्यादांचा विचार करुन काही संवर्ग पदांबाबत केंद्र शासनाकडील पदांशी जवळपास समतुल्यता राखण्यासाठी समितीने सुधारित वेतन संरचनेत काही बदल करण्याची शिफारस केली आहे.

**३.४.३** वेतन आयोगाच्या/वेतन त्रुटी समितीच्या शिफारशींच्या आधारे तसेच काही संवर्गाच्या वेतनश्रेणीत शासनाने मध्यंतरी केलेल्या सुधारणांमुळे त्यांची इतर पदांबरोबरील भंग पावलेली सापेक्षता पूर्ववत करुन यामुळे झालेला अन्याय दूर करण्याची मागणी काही पदांबाबत करण्यात आली होती. याबाबत समितीस असे वाटते की यापूर्वीच्या समित्यांनी १०-२० वर्षांपूर्वी त्यावेळच्या परिस्थितीनुसार उच्च शैक्षणिक अर्हता, पदोन्नतीच्या कमी संधी इत्यादी बाबींचा विचार करुन दिलेल्या उच्च वेतनश्रेणींबाबत फेरविचार करणे आता योग्य होणार नाही. तथापि, सुधारित वेतन संरचनेत अनेक वेतनश्रेणींचे एकत्रिकरण करुन त्या ऐवजी सुचविलेल्या पाच वेतन बँड व समुचित ग्रेड वेतनांमुळे विविध पदांबाबत असलेल्या सापेक्षतांचा प्रश्न काही प्रमाणात कमी झालेला आहे या बाबीकडे लक्ष वेधण्यात येत आहे. विविध संवर्गामध्ये सापेक्षता ठरविणे ही एक संवेदनशिल बाब असून सुधारित वेतन संरचनेची शिफारस करताना ही सापेक्षता पुन्हा भंग होणार नाही याकडे विशेष लक्ष देण्याची आवश्यकता असल्याची समितीस जाणिव आहे. दोन वेतन आयोगांच्या कालावधी दरम्यान शासनाने केलेल्या बऱ्याचशा वेतन सुधारणांचा विपरीत परिणाम होतो अशा काही संघटनांच्या प्रतिनिधींनी व्यक्त केलेल्या भावनांशी समिती सहमत आहे. या सुधारणेंमुळे काही वेळा अनेक संवर्ग पदामधील परंपरागत स्विकारलेली सापेक्षता भंग पावते. अशा निर्णयांमुळे अन्य संवर्ग पदधारकांकडून उच्च वेतन संरचनेची मागणी होऊ शकेल व ही उच्च वेतनश्रेणीच्या

मागणीची शृखंला पुढे चालू राहील. सुधारित वेतन संरचनेची शिफारस करताना या सर्व बाबींचा समितीने प्रामुख्याने विचार केला आहे.

३.४.४ पदोन्नती व निम्न पदाच्या वेतन संरचनेत फरक ठेवण्याची विविध संघटनांनी केलेली मागणी समितीने मान्य केली आहे. या बाबतीत समितीने विशेष शिफारशी केल्या आहेत. या शिफारशी स्विकारुन त्यांची अंमलबजावणी केल्यास या संदर्भातील तक्रारी निकाली निघतील असा समितीस विश्वास वाटतो.

३.४.५ बऱ्याचशा संवर्ग पदांस पदोन्नतीची संधी उपलब्ध नसल्याबाबतच्या विशेषत: पदोन्नतीची एकही संधी उपलब्ध नसलेल्या संदर्भातील तक्रारींबाबत समितीस सहानुभूती आहे. संपूर्ण सेवा कालावधीत वाजवी पदोन्नतीच्या संधी उपलब्ध असणे ही प्रत्येक कर्मचाऱ्याची न्याय्य इच्छा असणे स्वाभाविक आहे. त्यामुळे या प्रश्नाचे समाधानकारक व मानवतावादी दृष्टीने निराकारण करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक वाटते. समितीस ज्ञात आहे की, पदोन्नतीच्या संधी सर्व कर्मचाऱ्यांना उपलब्ध करण्यासाठी नवीन संवर्ग पदाची निर्मिती करण्याबाबत शिफारस करण्याची बाब समितीच्या कार्यकक्षेंचा भाग नाही. तरीदेखील समिती सर्व प्रशासकीय विभागांस आव्हान करते की, प्रशासकीय आवश्यकता लक्षात घेऊन त्यांच्या अधिपत्याखालील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध करण्याच्या दृष्टीने व त्यांची न्याय्य इच्छा पूर्ण करण्यासाठी नवीन संवर्ग पदांची निर्मिती करण्याचा विचार करावा. पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसणाऱ्या कर्मचाऱ्यांना आपल्या परीने दिलासा देण्यासाठी सध्याच्या सेवातंर्गत आश्वासित प्रगती योजनेमध्ये आमुलाग्र बदल करण्याची शिफारस करण्याची समितीस आवश्यकता वाटते. याबाबत पुढील परिच्छेदात सविस्तर विवेचन केले आहे. याबाबत असेही निदर्शनास आणण्यात येते की, पदोन्नतीची संधी उपलब्ध नसल्यामुळे यापूर्वीच्या वेतनश्रेणी पद्धतीतील विपरीत परिणाम

म्हणजे कर्मचाऱ्यांचे वेतन विशिष्ट टप्प्यावर कुंठीत होत होते. सुधारित वेतन संरचनेत वेतन बँड मधील किमान व कमाल वेतनात असलेल्या मोठ्या फरकामुळे वेतनात कुंठीतता येण्याची शक्यता फारच अल्प आहे. तरीदेखील समिती अशी शिफारस करते की, सुधारित वेतन संरचनेतील वेतन बँड मधील कमाल टप्प्यावर एका वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यांना पुढील वेतन बँड (ग्रेड वेतनातील कोणत्याही बदलाशिवाय) मंजूर करण्याची सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशीची अंमलबजावणी राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत देखील करावी.

## ३.५ सुधारित वेतन संरचनेमध्ये रुपये १००००-१५२०० आणि रुपये १०६५०-१५८५० या विद्यमान वेतनश्रेणींचे एकवटणे

**३.५.१** सुधारित वेतन संरचनेत रुपये १००००-१५२०० आणि रुपये १०६५०-१५८५० या दोन्ही वेतनश्रेणींना पीबी-३ या वेतन बँडमध्ये रुपये ६६०० हे समान ग्रेड वेतन अनुज्ञेय ठरते. तथापि, काही प्रशासकीय विभागांमध्ये रुपये १०६५०-१५८५० या वेतनश्रेणींतील संवर्ग पदे ही रुपये १००००-१५२०० या वेतनश्रेणीतील संवर्ग पदांच्या पदोन्नतीची पदे असल्याचे आढळून आले आहे. पदोन्नतीचे पद व निम्न पद यांच्या ग्रेड वेतनात फरक ठेवणे आवश्यक असल्याने, अशा खालील रुपये १०६५०-१५८५० या विद्यमान वेतश्रेणीतील पदोन्नतीच्या पदांना रुपये ६९०० या ग्रेड वेतनाची शिफारस समिती करीत आहे :-

| अ.क्र. | प्रशासकीय विभाग (कार्यालय) | पदनाम |
|---|---|---|
| १ | वित्त विभाग (विक्रीकर आयुक्तालय) | ज्येष्ठ विक्रीकर उप आयुक्त |
| २ | उच्च व तंत्र शिक्षण विभाग (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय) | उप संचालक, (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण) |
| ३ | गृह विभाग (न्याय सहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा आणि शासकीय रासायनीक विश्लेषक) | उप संचालक |
| ४ | गृह विभाग (सरकारी अभियोग संचालनालय) | सहायक संचालक |
| ५ | सार्वजनिक आरोग्य विभाग (राज्य कामगार विमा योजना) | वैद्यकीय अधीक्षक |

## ३.६ गट अ (पूर्वीचे कनिष्ठ वर्ग - १) संवर्ग पदांसाठी सुधारित वेतन संरचना

**३.६.१** तक्ता ३.१ मधील अनुक्रमांक १४अ आणि १४ब समोरील नोंदी केंद्र शासनाने स्विकारलेल्या सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींच्या आधारावर आहेत. आयोगाने गॅट ब मधील रुपये ८०००-१३५०० या वेतनश्रेणीसाठी वेतन बँड पीबी-२ व रुपये ५४०० या ग्रेड वेतनाची शिफारस केलेली आहे. तर गट अ मधील याच वेतनश्रेणीसाठी (ही वेतनश्रेणी साधारणत: गट अ मधील नामनिर्देशनाने/सरळसेवेने थेट नियुक्तीसाठी विहित केली आहे). पीबी-३ हा वेतन बँड व रुपये ५४०० या ग्रेड वेतनाची शिफारस केली आहे. त्यानुसार राज्य शासनाकडील रुपये ८०००-१३५०० या विद्यमान वेतनश्रेणीतील गट अ (पूर्वीचे वर्ग - २) मधील पदधारकांना वेतन बँड पीबी-२ व रुपये ५४०० ग्रेड वेतनाची आणि रुपये ८०००-१३५०० या विद्यमान वेतनश्रेणीतील गट अ (पूर्वीचे वर्ग - १) मधील पदधारकांना वेतन बँड पीबी-३ व रुपये ५४०० ग्रेड वेतनाची शिफारस करण्यात येत आहे.

**३.६.२** राज्य शासनाकडील बहुतांश गट अ (पूर्वीचे वर्ग-१) मधील संवर्ग पदे रुपये ८०००-१३५०० या विद्यमान वेतनश्रेणीमध्ये आहेत (परिणामी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे त्यांना पीबी-३ वेतन बँड व रुपये ५४०० हे ग्रेड वेतन अनुज्ञेय करण्यात यावे). तथापि, समितीच्या असे निदर्शनास आले आहे की, पूर्वीचे वर्ग-२ मध्ये असलेले तहसिलदार आणि पोलीस निरीक्षक हे दोन संवर्ग गट अ मध्ये श्रेणीवर्धीत करण्यात आले आहेत.या दोन्ही पदांची विद्यमान वेतनश्रेणी रुपये ७४५०-११५०० ही आहे. खालील बाबी विचारात घेता, हे दोन्ही संवर्ग आणि रुपये ८०००-१३५०० या विद्यमान वेतनश्रेणीतील गट अ (पूर्वीचे वर्ग-१) संवर्ग पदांमध्ये फरक ठेवणे गरजेचे आहे :-

(अ) वरील दोन्ही पदांची वेतनश्रेणी रुपये ८०००-१३५०० या वेतनश्रेणीपेक्षा कमी आहे. तसेच,

(ब) संबंधित विभागांतील रुपये ८०००-१३५०० या वेतनश्रेणीतील उप जिल्हाधिकारी आणि पोलीस उप अधीक्षक ही पदे अनुक्रमे तहसिलदार आणि पोलीस निरीक्षक या पदांची पदोन्नतीची पदे आहेत.

या बाबींचा विचार करुन तहसिलदार आणि पोलीस निरीक्षक या संवर्ग पदांना वेतन बँड पीबी-२ व रुपये ५००० या ग्रेड वेतनाची समिती शिफारस करीत आहे. हीच वेतनसंरचना विवक्षितपणे उचित शासन आदेशाद्वारे पूर्वी वर्ग - १ म्हणून घोषित केलेल्या (सध्याच्या गट अ मधील) रुपये ७४५०-११५०० किंवा रुपये ७५००-१२००० या विद्यमान वेतनश्रेणीतील अन्य पदानांही लागू होईल.

**३.६.३** जलसंपदा आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने समितीच्या असे निदर्शनास आणले की, गट अ मधील सहाय्यक कार्यकारी अभियंता (थेट नियुक्तीचे पद), सहाय्यक अभियंता, श्रेणी - १, उप विभागीय अभियंता व उप विभागीय अधिकारी या सर्व पदांना समान वेतनश्रेणी असली तरी, सहाय्यक कार्यकारी अभियंता पदास उच्च प्रारंभिक वेतन (दोन वेतनवाढी) अनुज्ञेय आहेत. हा लाभ यापुढेही चालू ठेवण्याची विनंती या विभागांमार्फत करण्यात आली होती. या बाबतीत समितीने साकल्याने विचार केला. मात्र, खालील कारणांमुळे या विनंतीस समिती सहमती दर्शवू शकत नाही.

(अ) गट अ मधील संवर्ग पदांवर उच्च गुणवत्ता धारक उमेदवारांना आकर्षित करण्यासाठी सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाने गट अ (थेट नियुक्ती) मधील वेतनश्रेणीस पीबी-३ या वेतन बँडची तर गट - ब मधील समान वेतनश्रेणीस पीबी-२ या वेतन बँडची शिफारस केली आहे. पीबी-३ या वेतन बँड मधील किमान वेतन रुपये १५६०० तर पीबी-२ मधील किमान वेतन ९३०० इतके आहे. अशाप्रकारे, किमान वेतनामध्ये लक्षणीय वाढ करण्यात आली असल्यामुळे गट - अ मधील थेट नियुक्तीसाठी उच्च प्रारंभिक वेतन मंजूर करण्याची आवश्यकता वाटत नाही. इतरही

पदधारकांना नियुक्तीच्यावेळी उच्च प्रारंभिक वेतन देऊ नये अशी शिफारस पुढील परिच्छेदात केली आहे.

(ब) अखिल भारतीय सेवा, केंद्रीय सेवा किंवा केंद्रीय अभियांत्रिकी सेवेतील अधिकाऱ्यांना सेवा प्रवेशाच्यावेळी उच्च प्रारंभिक वेतन देण्यासंदर्भात सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाने कोणतीही शिफारस केली नाही.

अर्थात यापूर्वी ज्या अधिकाऱ्यांना उच्च प्रारंभिक वेतनाचा लाभ मिळालेला आहे त्यांचे वेतन सुधारित वेतन संरचनेत उच्च टप्प्यावर निश्चित होऊन सदर लाभ आपोआपच यापूढेही चालू राहील.

## ३.७ एकाच वेतनश्रेणीत असलेल्या पदोन्नतीच्या संवर्ग पदांच्या व त्यांच्या निम्न पदांच्या वेतनश्रेणींची सुधारणा

**३.७.१** समितीच्या असे निदर्शनास आले की, विविध प्रशासकीय विभागांमध्ये पदोन्नतीची पदे व त्यांची निम्न पदे ही एकाच वेतनश्रेणीत असून त्यापैकी काही पदोन्नतीच्या पदांस विशेष वेतन मंजूर करण्यात आले आहे. सर्व कर्मचाऱ्यांची वरीष्ठ पदावर पदोन्नती मिळण्याची आणि त्याचबरोबर वेतनश्रेणीत (सुधारित वेतन संरचनेत ग्रेड वेतनात) वाढ होण्याची साहजिकच अपेक्षा असते. विशेष वेतनामुळे कर्मचाऱ्यांना काही अंशी दिलासा मिळत असला तरी, उच्च वेतनश्रेणी कर्मचाऱ्यांस नेहमीच अधिक लाभदायी ठरते. समितीचे असे मत आहे की, पदोन्नतीच्या सर्वच प्रकरणी कर्मचाऱ्यांना उच्च ग्रेड वेतन असावे. त्यामुळे पदोन्नतीच्या पदास आणि त्या पदाच्या निम्न पदास वेगवेगळे ग्रेड वेतन विहित करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणी विद्यमान स्थितीत अनुज्ञेय असलेले विशेष वेतन आपोआपच खंडीत होईल. ज्या पदोन्नतीच्या

पदांची व त्यांच्या निम्न पदांची माहिती समितीस उपलब्ध झाली अशा पदांचे वेतन बँड व ग्रेड वेतन खालील तक्ता ३.२ मध्ये नमूद केले आहे :-

**तक्ता क्रमांक ३.२ - एकाच वेतनश्रेणीत असलेली पदोन्नतीची संवर्ग पदे व त्यांची निम्न पदे यासाठी सुधारित वेतन संरचना**

| अ.क्र. | प्रशासकीय विभाग | पदनाम | विद्यमान वेतनश्रेणी व असल्यास विशेष वेतन ( रुपये ) | शिफारस केलेली सुधारित वेतन संरचना (वेतन बँड व ग्रेड वेतन ) ( रुपये ) |
|---|---|---|---|---|
| १ | कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग | अप्पर आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास | १४३००-१८३०० + विशेष वेतन ८०० | पीबी-४ + रुपये ८८०० ग्रेड वेतन |
| | | महाव्यवस्थापक, बृहन्मुंबई दुध योजना | १४३००-१८३०० | पीबी-४ + रुपये ८७०० ग्रेड वेतन |
| २ | कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग | उप संचालक, फलोत्पादन | ८०००-१३५०० + विशेष वेतन ४०० | पीबी-३ + रुपये ५७०० ग्रेड वेतन |
| | | बागायती रोप संरक्षण अधिकारी | ८०००-१३५०० | पीबी-३ + रुपये ५४०० ग्रेड वेतन |
| ३ | कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग | सहाय्यक संचालक, पशुसंवर्धन | ८०००-१३५०० + विशेष वेतन४०० | पीबी-३ + रुपये ५७०० ग्रेड वेतन |
| | | पशुसंवर्धन विभागातील इतर पूर्वीचे वर्ग-१, (कनिष्ठ) मधील पशुसंवर्धन अधिकारी | ८०००-१३५०० | पीबी-३ + रुपये ५४०० ग्रेड वेतन |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग | पणन संचालक | १४३००-१८३०० + विशेष वेतन ८०० | पीबी-४ + रुपये ८८०० ग्रेड वेतन |
| | | अप्पर आयुक्त व विशेष निबंधक (वित्त) | १४३००-१८३०० + विशेष वेतन ८०० | पीबी-४ + रुपये ८८०० ग्रेड वेतन |
| | | अप्पर निबंधक | १४३००-१८३०० | पीबी-४ + रुपये ८७०० ग्रेड वेतन |
| | | संचालक (साखर) | १४३००-१८३०० | पीबी-४ + रुपये ८७०० ग्रेड वेतन |
| ५ | वित्त विभाग | अप्पर विक्रीकर आयुक्त | १४३००-१८३०० + विशेष वेतन ८०० | पीबी-४ + रुपये ८८०० ग्रेड वेतन |
| | | सह विक्रीकर आयुक्त (निवडश्रेणी) | १४३००-१८३०० | पीबी-४ + रुपये ८७०० ग्रेड वेतन |
| ६ | सामान्य प्रशासन विभाग | विभागीय सहाय्यक संचालक (भाषा संचालनालय) | ६५००-१०५०० + विशेष वेतन ४०० | पीबी-२ + रुपये ४६०० ग्रेड वेतन |
| | | सहाय्यक संचालक | ६५००-१०५०० | पीबी-२ + रुपये ४४०० ग्रेड वेतन |
| ७ | उच्च, तंत्र शिक्षण व सेवायोजन विभाग | अधिष्ठाता (कला संचालनालय) | १२०००-१८००० + विशेष वेतन ७०० | पीबी-३ + रुपये ७९०० ग्रेड वेतन |
| | | प्राध्यापक (कला संचालनालय) | १२०००-१८००० | पीबी-३ + ७६०० ग्रेड वेतन |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | गृह विभाग | संचालक, न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा आणि शासकीय रासायनिक विश्लेषक | १४३००-१८३०० + विशेष वेतन ८०० | पीबी-४ + ८८०० ग्रेड वेतन |
| | | सह संचालक, न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा आणि शासकीय रासायनिक विश्लेषक | १४३००-१८३०० | पीबी-४ + ८७०० ग्रेड वेतन |
| ९ | गृह विभाग | वरिष्ठ निदेशक (अग्नीशामक), होमगार्डस् | ६५००-१०५०० | पीबी-२ + रुपये ४६०० ग्रेड वेतन |
| | | वरिष्ठ निदेशक, होमगार्डस् | ६५००-१०५०० | पीबी-२ + रुपये ४४०० ग्रेड वेतन |
| १० | उद्योग, उर्जा व कामगार विभाग | अतिरिक्त संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य | १०६५०-१५८५० + विशेष वेतन ६०० | पीबी-३ + रुपये ६९०० ग्रेड वेतन |
| | | सह संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य | १०६५० -१५८५० | पीबी-३ + रुपये ६६०० ग्रेड वेतन |
| ११ | उद्योग, उर्जा व कामगार विभाग | अतिरिक्त संचालक, बाष्पके | १०६५०-१५८५० + विशेष वेतन ६०० | पीबी-३ + रुपये ६९०० ग्रेड वेतन |
| | | सह संचालक, बाष्पके | १०६५०-१५८५० | पीबी-३ + रुपये ६६०० ग्रेड वेतन |
| १२ | उद्योग, उर्जा व कामगार विभाग | सचिव, कामगार न्यायालय | ६५००-१०५०० + विशेष वेतन ४०० | पीबी-२ + रुपये ४६०० ग्रेड वेतन |
| | | उप निबंधक, कामगार न्यायालय | ६५००-१०५०० | पीबी-२ + रुपये ४४०० ग्रेड वेतन |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३ | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग | सह संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन | १२०००-१६५०० + विशेष वेतन ४०० | पीबी-३ + रुपये ७९०० ग्रेड वेतन |
| | | उप संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन | १२०००-१६५०० | पीबी-३ + रुपये ७६०० ग्रेड वेतन |
| १४ | सार्वजनिक आरोग्य विभाग | सह संचालक, आरोग्य सेवा | १२०००-१६५०० + विशेष वेतन ६०० | पीबी-३ + रुपये ७९०० ग्रेड वेतन |
| | | उप संचालक, आरोग्य सेवा | १२०००-१६५०० | पीबी-३ + रुपये ७६०० ग्रेड वेतन |
| १५ | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | वरिष्ठ खोदन अभियंता | ८०००-१३५०० | पीबी-३ + रुपये ५७०० ग्रेड वेतन |
| | | उप अभियंता (यांत्रिकी) | ८०००-१३५०० | पीबी-३ + रुपये ५४०० ग्रेड वेतन |

टीप.- वरील कोणत्याही पदास विशेष वेतन अनुज्ञेय असणार नाही.

**३.७.२** वरील पदांशिवाय एकाच विद्यमान वेतनश्रेणीत पदोन्नतीचे व निम्न पद असल्यास, सुधारित वेतन संरचनेत दोन्ही पदास तक्ता ३.१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे वेतन बँड अनुज्ञेय राहील. मात्र पदोन्नतीच्या पदास तक्ता ३.१ नुसार मिळणाऱ्या ग्रेड वेतनाव्यतिरिक्त खालील प्रमाणे ग्रेड वेतनात वाढ अनुज्ञेय करण्यात यावी.

(अ) विद्यमान वेतनश्रेणीतील रुपये ५००० पेक्षा कमी किमान वेतनापर्यंत - रुपये १००

(ब) विद्यमान वेतनश्रेणीतील रुपये ५००० व त्यापेक्षा जास्त व रुपये ८००० पेक्षा कमी किमान वेतनापर्यंत - रुपये २००

(क) विद्यमान वेतनश्रेणीतील रुपये ८००० व त्यापेक्षा जास्त व रुपये १२००० किमान वेतनापर्यंत - रुपये ३००

(ड) विद्यमान वेतनश्रेणीतील रुपये १२००० पेक्षा जास्त किमान वेतनापर्यंत - रुपये १००

## ३.८ अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, प्रकल्प संचालक (ग्राम विकास) आणि विभागीय आयुक्त कार्यालयातील उप आयुक्त (प्रशासन व विकास) या पदांसाठी सुधारित वेतन संरचना

**३.८.१** ग्राम विकास व जलसंधारण विभागाने दिनांक १७.०३.२००४ च्या शासन निर्णयान्वये अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, प्रकल्प संचालक (ग्राम विकास) आणि विभागीय आयुक्त कार्यालयातील उप आयुक्त (प्रशासन व विकास) ही पदे निर्माण केली आहेत. ही पदे उप मुख्य कार्यकारी अधिकारी या पदाची पदोन्नतीची पदे आहेत, त्यामुळे साहजिकच अधिक जबाबदारीची पदे आहेत. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (निवडश्रेणी) या पदाची वेतनश्रेणी रुपये १०६५०-१५८५० ही आहे. दिनांक १७.३.२००४ च्या शासन निर्णयान्वये निर्माण केलेल्या वरील पदांना दिनांक ३.८.२००४ च्या शासन निर्णयान्वये रुपये १२०००-१६५०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली होती. तथापि, सदर आदेश रद्द करण्यात येऊन या पदांच्या वेतनश्रेणींसंदर्भात सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशींच्या आधारावर उचित निर्णय घेण्याचे ठरविण्यात आले होते. वरील तीन पदे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (निवडश्रेणी) या पदाची पदोन्नतीची पदे असून या पदांच्या अधिक जबाबदाऱ्या विचारात घेता समितीस असे वाटते की, या पदांना उचित ग्रेड वेतन मंजूर करणे योग्य ठरेल. म्हणून, या पदोन्नतीच्या पदांसाठी त्यांची रुपये १२०००-१६५०० विद्यमान वेतनश्रेणी गृहीत धरुन रुपये ७६०० हे ग्रेड वेतन मंजूर करण्याची समिती शिफारस करीत आहे.

## ३.९ शिक्षकीय पदांसाठी सुधारित वेतन संरचना

**३.९.१** राज्यातील शिक्षकीय पदांच्या विद्यमान वेतनश्रेणी इतर समतुल्य पदांच्या तुलनेत उच्च दर्जाच्या आहेत. पाचव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींच्या आधारावर राज्य शासकीय कर्मचा-यांच्या वेतनश्रेणीत दिनांक १.१.१९९६ पासून सुधारणा करताना शिक्षकीय पदांस इतर पदांच्या तुलनेत आकर्षक वेतनश्रेणी मंजूर करण्यात आल्या आहेत. उदा. १२००-२०४० या वेतनश्रेणीतील शिक्षकीय पदांची वेतनश्रेणी रुपये ४५००-७००० अशी सुधारित करण्यात आली आहे. तथापि, या वेतनश्रेणीतील इतर राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना रुपये ४०००-६००० ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली. त्याचप्रमाणे रुपये १४००-२६०० या वेतनश्रेणीतील पदवीधारक शिक्षकांना रुपये ५५००-९००० तर शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना रुपये ५०००-८००० ही सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. प्राथमिक व माध्यमिक शाळेतील शिक्षक चट्टोपाध्याय आयोगाच्या शिफारशींनुसार त्रिस्तरीय वेतनश्रेणीत वेतन घेत आहेत. तसेच द्विस्तरीय वेतनश्रेणीत वेतन घेत असलेल्या उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकांना सन २००० मध्ये त्रिस्तरीय वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली. यामुळे या शिक्षकांची वेतनश्रेणी केंद्र शासनाकडील समतुल्य शिक्षकीय पदांपेक्षाही जास्त झाली.

**३.९.२** उच्च शिक्षित व्यक्ती शिक्षकीय पेशा स्विकारुन तेथे कायम राहण्याच्या उद्देशाने सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाने केंद्र शासनाकडील शिक्षकांसाठी इतरांच्या तुलनेने उच्च वेतनश्रेणींची शिफारस केली आहे, याची समितीस जाणीव आहे. समितीने या वेतनश्रेणी राज्यातील शिक्षकांना लागू करण्याच्या दृष्टीने काळजीपूर्वक विचार केला. तथापि, या संदर्भात निर्णय घेण्यापूर्वी इतर संबधित बाबींचाही विचार करणे गरजेचे असल्याचे समितीस आवश्यक वाटते. यासाठी सर्वप्रथम केंद्र व राज्य शासनाकडील इतर पदांच्या तुलनेत शिक्षकीय पदांचे प्रमाण विचारात घ्यावे लागेल. केंद्र शासनाकडे एकूण पदांच्या तुलनेत १ टक्क्यांपेक्षा थोडी जास्त शिक्षकीय पदे आहेत. दिल्ली व इतर केंद्रशासित प्रदेशांतील शिक्षकांची पदे वगळल्यास हे प्रमाण आणखी कमी होईल. तर हे

प्रमाण राज्य शासनाकडे ३० टक्यांपेक्षा अधिक आहे. ही बाब प्रामुख्याने सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी राज्य शासनाकडील शिक्षकीय पदांच्या बाबतीत स्विकारण्याचा विचार करण्यापूर्वी लक्षात घ्यावी लागेल. त्याचप्रमाणे, राज्य शासनाकडे विविध स्तरावर असलेल्या शिक्षकीय पदासह अनेक संवर्ग पदांची सापेक्षता ठेवण्यामध्ये असलेल्या अडचणी केंद्र शासनाकडे फारशा प्रमाणात नाहीत. समितीची भेट घेतलेल्या संघटनांनी विशेषत: ग्रामीण भागातील संघटनांनी त्यांच्या पदांची शिक्षकीय पदांबरोबर असलेली पूर्वीची सापेक्षता पूर्ववत करण्याची मागणी केली आहे. शालेय शिक्षण विभागातील प्रशासकीय कर्मचाऱ्यांमार्फतच विशेषत: शिक्षकांवर पर्यवेक्षण करणाऱ्या प्रशासकीय कर्मचाऱ्यांकडून शिक्षकीय पदांच्या पुन:सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्याची मागणी करण्यात येत आहे. यास्तव शासनाने दिनांक ५.११.२००८ च्या शासन निर्णयान्वये शालेय शिक्षण विभागातील गट ब आणि गट क मधील प्रशासकीय संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे आणि त्यामुळे इतर विभागातील कर्मचाऱ्यांकडूनही अशा प्रकारची मागणी होणे साहजिक आहे. यासंदर्भात वेतन सुधारणा समिती, १९९७ ने पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशींच्या आधारावर वेतन सुधारणा सुचविताना, आपल्या अहवालातील परिच्छेद ३.२१ व ३.२६ मध्ये शिक्षकीय पदांना उच्च वेतनश्रेणी मंजूर करण्यातील अडचणी विशद केल्या आहेत. या सर्व बाबींचा साकल्याने विचार करून समिती अशा निष्कर्षाप्रत आली आहे की, शिक्षकीय पदांबाबत सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशी जशाच्या तशा स्विकारणे शक्य होणार नाही. राज्य शासनाकडील शिक्षकीय पदांच्या वेतनश्रेणीत त्यांच्या विद्यमान वेतनश्रेणी तसेच वेतन सुधारणेसंदर्भातील सर्वसाधारण तत्वे विचारात घेऊन सुधारणा करावी लागेल. तरीदेखील इतर शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे शिक्षकांना सुध्दा वेतन सुधारणेमुळे आकर्षक वेतनवाढीचा लाभ मिळणार आहे.

**३.९.३** एकस्तर वेतनश्रेणीतील शिक्षकांना (म्हणजे विशिष्ट वर्षांनंतर वरिष्ठश्रेणी/ निवडश्रेणी अनुज्ञेय नसलेले शिक्षक) सुधारित वेतन संरचनेत खालील प्रमाणे वेतन बॅंड आणि ग्रेड वेतन अनुज्ञेय राहील :-

| | | |
|---|---|---|
| (अ) | विद्यमान रुपये ३०५०-४५९० या वेतनश्रेणीतील शिक्षक | - पीबी-१ + ग्रेड वेतन १९०० |
| (ब) | विद्यमान रुपये ३२००-४९०० या वेतनश्रेणीतील शिक्षक | - पीबी-१ + ग्रेड वेतन २००० |
| (क) | विद्यमान रुपये ४०००-६००० या वेतनश्रेणीतील शिक्षक | - पीबी-१ + ग्रेड वेतन २४०० |
| (ड) | विद्यमान रुपये ४५००-७००० या वेतनश्रेणीतील शिक्षक | - पीबी-१ + ग्रेड वेतन २८०० |
| (इ) | विद्यमान रुपये ५५००-९००० या वेतनश्रेणीतील मुख्याध्यापक (प्रशिक्षित मॅट्रीक्युलेट किंवा तालुका मास्तर) ; माध्यमिक शाळेतील संगीत शिक्षक व शिक्षक (गायन) | - पीबी-२ + ग्रेड वेतन ४३०० |
| (फ) | विद्यमान रुपये ५०००-८००० + विशेष वेतन रुपये २५० या वेतनश्रेणीतील अशासकीय कनिष्ठ अध्यापक महाविद्यालयांना संलग्न असलेल्या विस्तार सेवा केंद्रातील समन्वयक | - पीबी-२+ ग्रेड वेतन ४३०० (विशेष वेतन अनुज्ञेय नाही) |
| (ग) | विद्यमान रुपये ६५००-१०५०० या वेतनश्रेणीतील अशासकीय बी.एड. महाविद्यालयांशी संलग्न असलेल्या विस्तार केंद्रातील समन्वयक | - पीबी-२ + ग्रेड वेतन ४४०० |

**३.९.४** विशिष्ट वर्षांच्या सेवेनंतर वेगवेगळ्या वेतनश्रेणी (वरिष्ठ/निवडश्रेणी) अनुज्ञेय असलेल्या शिक्षकांसाठी सुधारित वेतन संरचनेत शिफारस करण्यात येत असलेले वेतन बॅंड आणि ग्रेड वेतन खालील तक्ता ३.३ मध्ये दर्शविण्यात आलेले आहेत. तसेच, शासकीय तांत्रिक शाळेतील आणि व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संस्थेतील शिक्षकांना अनुज्ञेय असलेले विशिष्ट वेतन बॅंड आणि ग्रेड वेतन देखील सदर तक्त्यात दर्शविण्यात आले आहे :-

| तक्ता ३.३ शिक्षकांसाठी सुधारित वेतन संरचनेची शिफारस | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. (१) | संवर्ग (२) | श्रेणी (३) | विद्यमान वेतनश्रेणी (रुपये) (४) | वेतन बँड व ग्रेड वेतनाची शिफारस (५) |
| १ | (१) अप्रशिक्षित प्राथमिक शिक्षक | मूळ श्रेणी | ३२००-४९०० | पीबी-१ + ग्रेड वेतन २००० |
| | (अ) पी.एस.सी. व पी.टी.सी. | वरिष्ठश्रेणी | ४०००-६००० | पीबी-१ + ग्रेड वेतन २४०० |
| | (ब) पी.एस.सी. व एक वर्षाची मॉन्टेसरी प्रशिक्षणाची पदविका | निवडश्रेणी | ४५००-७००० | पीबी-१ + ग्रेड वेतन २८०० |
| | (२) माध्यमिक शिक्षक - मुलोद्योग शिक्षक - पी.एस.सी. अधिक तंत्र शिक्षण संचालनालय मान्यताप्राप्त शिवणकामाचे किंवा भरतकामाचे प्रमाणपत्र / पदविका | | | |
| २ | माध्यमिक शिक्षक - इतर शिक्षक - क्षेत्र सहाय्यक (मॅट्रीक/एस.एस.सी. व सहा महिन्यांचा शेतकी अभ्यासक्रम) | मूळ श्रेणी<br>वरिष्ठश्रेणी<br>निवडश्रेणी | ४०००-६०००<br>४५००-७०००<br>५०००-८००० | पीबी-१ + ग्रेड वेतन २४००<br>पीबी-१ + ग्रेड वेतन २८००<br>पीबी-२ + ग्रेड वेतन ४२०० |
| ३ | (१) प्रशिक्षित प्राथमिक शिक्षक (स्तंभ क्रमांक ४ मध्ये दर्शविलेल्या विद्यमान वेतनश्रेणीतील माध्यमिक शाळेतील प्रशिक्षित अपदवीधर आणि शारीरिक प्रशिक्षण निदेशक, चित्रकला, संस्कृत, हिंदी, मुलोद्योग आणि संगीत शिक्षकांना देखील हे लागू ठरेल.) | मूळ श्रेणी<br>वरिष्ठश्रेणी<br>निवडश्रेणी | ४५००-७०००<br>५०००-८०००<br>५५००-९००० | पीबी-१ + ग्रेड वेतन २८००<br>पीबी-२ + ग्रेड वेतन ४२००<br>पीबी-२ + ग्रेड वेतन ४३०० |
| | (२) मुलोद्योग शिक्षक, अध्यापक विद्यालय | | | |
| | (३) पश्चिम महाराष्ट्रातील अशासकीय कनिष्ठ महाविद्यालयांना संलग्न असलेल्या प्रॅक्टीसींग शाळांमधील शिक्षक | | | |
| | (४) शासकीय/अशासकीय अनुदानित तंत्र माध्यमिक शाळेतील निदेशक | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | (१) माध्यमिक शाळांमधील प्रशिक्षित पदवीधर शिक्षक (स्तंभ क्रमांक ४ मध्ये दर्शविलेल्या विद्यमान वेतनश्रेणीतील इतर माध्यमिक शाळांमधील शिक्षकांना देखील हे लागू ठरेल)<br>(२) प्रशिक्षित पदवीधर प्राथमिक शिक्षक<br>(३) मुख्याध्यापक, प्राथमिक शाळा (२००व अधिक विद्यार्थी पट किंवा १ ते ७ पर्यंतचे वर्ग)<br>(४) स्तंभ क्रमांक ४ मध्ये दर्शविलेल्या विद्यमान वेतनश्रेणीतील उच्च माध्यमिक शाळांमधील 'अपूर्ण अर्हताधारक शिक्षक'<br>(५) सहाय्यक शिक्षक / प्रशिक्षित पदवीधर शिक्षक, अध्यापक विद्यालय<br>(६) समुपदेशक<br>(७)दृकश्रुती शिक्षण प्रभारी | मूळ श्रेणी<br>वरिष्ठश्रेणी<br>निवडश्रेणी | ५५००-९०००<br>६५००-१०५००<br>७५००-१२००० | पीबी-२ + ग्रेड वेतन ४३००<br>पीबी-२ + ग्रेड वेतन ४४००<br>पीबी-२ + ग्रेड वेतन ४८०० |
| ५ | (१) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र यामधील निदेशक<br>(२) + २ स्तरावरील (व्दिलक्षी व एम.सी.व्ही.सी.) व्यवसाय अभ्यासक्रम शिकविणाऱ्या संस्थांतील पूर्णवेळ निदेशक (शासकीय/अशासकीय)<br>(३) शासकीय/अशासकीय अनुदानित तंत्र माध्यमिकशाळेतील सहाय्यक अधिव्याख्याता/कनिष्ठ अधिव्याख्याता | मूळ श्रेणी<br>वरिष्ठश्रेणी<br>निवडश्रेणी | ५५००-९०००<br>६५००-१०५००<br>७४५०-११५०० | पीबी-२ + ग्रेड वेतन ४३००<br>पीबी-२ + ग्रेड वेतन ४४००<br>पीबी-२ + ग्रेड वेतन ४८०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था/मूलभूत प्रशिक्षण संस्था तथा अनुषंगिक सूचना केंद्र यामधील गट निदेशक व कनिष्ठ सर्वेक्षक तथा कनिष्ठ प्रशिक्षणार्थी सल्लागार व प्रगत व्यवसाय प्रशिक्षण व हायटेक प्रशिक्षण योजना [प्रशिक्षण अधिकारी (वरिष्ठ) ] योजनेंतर्गत येणारे प्रशिक्षण अधिकारी | | ५५००-९००० | पीबी-२ + ग्रेड वेतन ४४०० (मूळश्रेणी)<br>पीबी-२ + ग्रेड वेतन ४८०० (वरिष्ठश्रेणी) |
| ७ | सहाय्यक अभियांत्रिकी अधीक्षक (शासकीय/अशासकीय) | मूळश्रेणी<br>वरिष्ठश्रेणी | ६५००-१०५००<br>७४५०-११५०० | पीबी-२ + ग्रेड वेतन ४४००<br>पीबी-२ + ग्रेड वेतन ४८०० |
| ८ | पर्यवेक्षक, माध्यमिक शाळा | मूळश्रेणी<br>वरिष्ठश्रेणी<br>निवडश्रेणी | ५५००-९००० + विशेष वेतन रुपये १६०<br>६५००-१०५०० + विशेष वेतन रुपये १६०<br>७५००-१२००० + विशेष वेतन रुपये १६० | पीबी-२ + ग्रेड वेतन ४४०० (विशेष वेतन अनुज्ञेय नाही.)<br>पीबी-२ + ग्रेड वेतन ४५०० (विशेष वेतन अनुज्ञेय नाही.)<br>पीबी-२ + ग्रेड वेतन ४९०० (विशेष वेतन अनुज्ञेय नाही.) |
| ९ | (१) मुख्याध्यापक, केंद्रीय प्राथमिक शाळा<br>(२) केंद्र प्रमुख | मूळश्रेणी<br>वरिष्ठश्रेणी<br>निवडश्रेणी | ५५००-९००० + विशेष वेतन रुपये २५०<br>६५००-१०५०० + विशेष वेतन रुपये २५०<br>७५००-१२००० + विशेष वेतन रुपये २५० | पीबी-२ + ग्रेड वेतन ४४०० (विशेष वेतन अनुज्ञेय नाही.)<br>पीबी-२ + ग्रेड वेतन ४५०० (विशेष वेतन अनुज्ञेय नाही.)<br>पीबी-२ + ग्रेड वेतन ४९०० (विशेष वेतन अनुज्ञेय नाही.) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १० | (१) पदव्युत्तर पदवीधर शिक्षक<br>(२) +२ स्तरावरील (द्विलक्षी व एम. सी. व्ही. सी.) व्यवसाय अभ्यासक्रम शिकविणाऱ्या संस्थांतील पूर्णवेळ शिक्षक (शासकीय/अशासकीय)<br>(३) अध्यापक महाविद्यालयांतील पदव्युत्तर पदवीधर शिक्षक (खालील टीपेमध्ये नमूद केल्याप्रमाणे शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्रमांक: टिसीएम २००२ / प्र.क्र. २९७/माशि- ४, दिनांक ३.४.२००३ मध्ये नमूद केलेली अर्हताधारक) | मूळश्रेणी<br>वरिष्ठश्रेणी<br>निवडश्रेणी | ७२२५-११०५०<br>८०००-१३५००<br>९१२५-१४०७५ | पीबी-२ + ग्रेड वेतन ४६००<br>पीबी-३ + ग्रेड वेतन ५४००<br>पीबी-३ + ग्रेड वेतन ५७०० |
| ११ | महाराष्ट्र शिक्षण सेवा गट (ब) संवर्गातील औ. प्र. संस्था आणि शासकीय व अशासकीय अनुदानित तंत्र माध्यमिक शाळेतील प्राचार्य/उपप्राचार्य/सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार/अभियांत्रिकी अधीक्षक/उपनिरीक्षक/मुख्याध्यापक | | ७४५०-११५०० | पीबी-२ + ग्रेड वेतन ५४०० |
| १२ | अभियांत्रिकी अधीक्षक (शासकीय/अशासकीय) | मूळश्रेणी<br>वरिष्ठश्रेणी | ७४५०-११५००<br>८०००-१३५०० | पीबी-२ + ग्रेड वेतन ४८००<br>पीबी-३ + ग्रेड वेतन ५४०० |
| १३ | महाराष्ट्र शिक्षण सेवा गट अ(कनिष्ठ) संवर्गातील औ. प्र. संस्था आणि शासकीय व अशासकीय अनुदानित तंत्र माध्यमिक शाळेतील प्राचार्य/उपप्राचार्य/सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार वरिष्ठ निर्गक्षक/अधीक्षक/मुख्याध्यापक | | ८०००-१३५०० | पीबी-३ + ग्रेड वेतन ५४०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १४ | (१) माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापक | मूळश्रेणी | ७५००-१२००० | पीबी-२ + ग्रेड वेतन ४८०० |
| | (२) अध्यापक महाविद्यालयातील प्राचार्य | वरिष्ठश्रेणी | ९१२५-१४०७५ | पीबी-३ + ग्रेड वेतन ५७०० |
| १५ | उच्च माध्यमिकचे वर्ग संलग्नित असलेल्या माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक | मूळश्रेणी | ७५००-१२००० + विशेष वेतन २०० | पीबी-२ + ग्रेड वेतन ४९०० (विशेष वेतन अनुज्ञेय नाही.) |
| | | वरिष्ठश्रेणी | ९१२५-१४०७५ + विशेष वेतन २०० | पीबी-३ + ग्रेड वेतन ५८०० (विशेष वेतन अनुज्ञेय नाही) |
| १६ | मुख्याध्यापक, स्वतंत्र उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालये | | पदव्युत्तर शिक्षकाची समुचित वेतनश्रेणी + विशेष वेतन २०० | पदव्युत्तर शिक्षकाच्या समुचित वेतनश्रेणीस अनुज्ञेय असलेला वेतन बँड व ग्रेड वेतन आणि अतिरिक्त ग्रेड वेतन रुपये १०० (विशेष वेतन अनुज्ञेय नाही) |
| १७ | माध्यमिक शाळेतील उप मुख्याध्यापक (२० पेक्षा अधिक वर्ग संख्या असलेल्या शाळा) | मूळश्रेणी | ७२२५-११०५० | पीबी-२ + ग्रेड वेतन ४६०० |
| | | वरिष्ठश्रेणी | ८०००-१३५०० | पीबी-३ + ग्रेड वेतन ५४०० |

**टीप.-** वरील अनुक्रमांक १० (३) संदर्भात समितीसमोर संबंधित शिक्षक संघटनेमार्फत असे प्रतिपादन करण्यात आले की, सध्यस्थितीत अध्यापक महाविद्यालयांतील शिक्षकांना एम.एड. पदवीबरोबरच पदव्युत्तर पदवी (एम.ए., एम.एस्सी. इत्यादी) ही अर्हता धारण करणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत हे शिक्षक सहाय्यक शिक्षक/प्रशिक्षित पदवीधर शिक्षक म्हणून प्रशिक्षित पदवीधर शिक्षकांना अनुज्ञेय वेतनश्रेणीत वेतन घेत आहेत. या शिक्षकांना उच्च शैक्षणिक अर्हता धारण करावी लागत असल्यामुळे त्यांना उच्च वेतनश्रेणी मंजूर करणे आवश्यक आहे. एन.सी.टी.ई ने अध्यापक महाविद्यालयांतील शिक्षकांना विहित केलेली वरील किमान शैक्षणिक अर्हता या शिक्षकांनी धारण करणे शालेय शिक्षण आणि क्रीडा विभागाच्या शासन निर्णय क्रमांक:टिसीएम २००२/प्र.क्र.२९७/माशि-४, दिनांक-३.४.२००३ अन्वये अनिवार्य करण्यात आले आहे. त्यानुसार पदव्युत्तर पदवीधर शिक्षकांना अनुज्ञेय असलेली वेतनश्रेणी या शिक्षकांना देखील मंजूर करण्याची विनंती करण्यात आली आहे. तसेच, विभागाने असेही निदर्शनास आणले आहे की, वर नमूद दिनांक ३.४.२००३ चे शासन आदेश निर्गमित होण्यापूर्वी नियुक्त झालेल्या व सदर शासन निर्णयान्वये विहित केलेली शैक्षणिक अर्हता अद्यापही धारण न करणाऱ्या शिक्षकांना प्रशिक्षित पदवीधर शिक्षकांना अनुज्ञेय असलेलीच वेतनश्रेणी यापुढे अनुज्ञेय राहील. वरील सर्व बाबींचा विचार करुन, अध्यापक महाविद्यालयांतील पदव्युत्तर पदवीधर शिक्षकांना वरील तक्त्यातील अनुक्रमांक १० मध्ये नमूद केलेल्या वेतनश्रेणीची शिफारस समिती करीत आहे. मात्र, जे शिक्षक विहित अर्हता धारण करीत नाहीत त्यांना वरील तक्त्यातील अनुक्रमांक ४ मधील वेतनश्रेणी अनुज्ञेय राहील.

## ३.१० शिक्षण संचालनालयातील प्रशासकीय कर्मचाऱ्यांसाठी सुधारित वेतन संरचना

**३.१०.१** शिक्षण संचालनालयातील विविध प्रशासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या संवर्ग पदांस दिनांक १.१.१९९६ पासून मंजूर केलेल्या वेतनश्रेणींच्या आधारे तक्ता ३.१ मध्ये नमूद केलेले वेतन बँड व ग्रेड वेतन अनुज्ञेय होईल. तथापि, शासन निर्णय, शालेय शिक्षण आणि क्रीडा विभाग क्रमांक शिसंमा-१०००/(१०३/२०००)/प्रशा-५, दिनांक ५.११.२००८ सोबत जोडलेल्या परिशिष्ट अ मध्ये नमूद केलेल्या महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट क मधील १४ संवर्ग पदांना व परिशिष्ट ब मध्ये नमूद केलेल्या महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट ब (प्रशासन शाखा) मधील २८ संवर्ग पदांना पुढील प्रमाणे वेतन बँड व ग्रेड वेतन अनुज्ञेय होईल:-

| | |
|---|---|
| महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट क मधील वर नमूद १४ संवर्ग पदे | पीबी-२ + ग्रेड वेतन रुपये ४४०० |
| महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट ब (प्रशासन शाखा) मधील वर नमूद २८ संवर्ग पदे - | पीबी-२ + ग्रेड वेतन रुपये ४८०० |

## ३.११ परिवहन विभागातील अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी सुधारित वेतन संरचना

**३.११.१** समितीच्या असे निदर्शनास आले आहे की, शासन निर्णय गृह विभाग क्रमांक एमव्हीडी १२०८/प्र.क्र.१७२/परि-४ (२), दिनांक १४.११.२००८ अन्वये परिवहन विभागातील सहायक मोटर वाहन निरीक्षकांपासून अतिरिक्त परिवहन आयुक्तांपर्यंत सर्व संवर्गातील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर वेतनश्रेणीतील सुधारणा जलसंपदा विभागातील पदवीधर अभियंता व काही कालावधीच्या सेवेनंतर पदविकाधारक अभियंत्यांना दिनांक १६.४.१९८४ च्या शासन निर्णयान्वये अनुज्ञेय करण्यात आलेल्या वेतनश्रेणींच्या आधारावर करण्यात आली आहे. याबाबत समितीस असे वाटते की, या निर्णयाच्या परिणामस्वरूप इतर विभागांकडून विशेषत: परिवहन विभागातील कर्मचाऱ्यांबरोबर सापेक्षता असलेल्या इतर विभागांतील कर्मचाऱ्यांकडून, अशा प्रकारे वेतनश्रेणीत

सुधारणा करण्याची मागणी येऊ शकते. या बाबींची समितीने काळजीपूर्वक छाननी केल्यानंतर असे निदर्शनास आले की, परिवहन विभागातील विविध संवर्ग पदास अनुज्ञेय असलेल्या वेतनश्रेणींमध्ये आवश्यक तो फरक राखून व इतर विभागातील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणींबरोबर असलेली सापेक्षता कायम ठेऊन जलसंपदा विभागाच्या दिनांक १६.४.१९८४ च्या शासन निर्णयातील तरतुदींचा फायदा परिवहन विभागातील अधिकाऱ्यांना देणे शक्य होईल. त्यानुसार परिवहन विभागातील अधिकाऱ्यांच्या वेतनश्रेणीत नुकतीच सुधारणा करण्यात आली असली तरी, त्यांना सुधारित वेतन संरचनेत तक्ता क्रमांक ३.४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे वेतन बँड व ग्रेड वेतन मंजूर करण्याची समिती शिफारस करीत आहे :-

तक्ता क्रमांक ३.४ परिवहन विभागातील अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी सुधारित वेतन संरचना

| अ.क्र. | पदाचे नाव | सुधारित वेतन संरचनेची शिफारस | |
|---|---|---|---|
| | | वेतन बँड | ग्रेड वेतन रू. |
| १ | सहायक मोटर वाहन निरीक्षक ( कनिष्ठ श्रेणी ) | पीबी-२ | ४३०० |
| २ | सहायक मोटर वाहन निरीक्षक ( उच्च श्रेणी ) | पीबी-२ | ४४०० |
| ३ | मोटर वाहन निरीक्षक | पीबी-२ | ४५०० |
| ४ | सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी | पीबी-२ | ४६०० |
| ५ | उप प्रादेशिक परिवहन अधिकारी | पीबी-२ | ४८०० |
| ६ | प्रादेशिक परिवहन अधिकारी / उप आयुक्त | पीबी-३ | ६६०० |
| ७ | वरिष्ठ परिवहन उप आयुक्त | पीबी-३ | ६९०० |
| ८ | परिवहन सह आयुक्त | पीबी-३ | ७६०० |
| ९ | अतिरिक्त परिवहन आयुक्त | पीबी-४ | ८७०० |

## ३.१२ शुश्रुषा सेवा कर्मचाऱ्यांसाठी वेतन संरचना

**३.१२.१** शुश्रुषा सेवा कर्मचाऱ्यांच्या कामाचा विचार करुन सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाने त्यांना उच्च वेतन संरचनेची केलेली शिफारस व त्यानुसार केंद्र शासनाने घेतलेल्या निर्णयांची

समितीस जाणीव आहे. मात्र, वेतनश्रेणीसंदर्भात शुश्रुषा सेवा कर्मचाऱ्यांच्या पदांच्या इतर पदांबरोबरच्या समतुल्यतेवर होणारा परिणाम लक्षात घेऊन आयोगाच्या शिफारशींची व त्या आधारे केंद्र शासनाने घेतलेल्या निर्णयांची जशीच्या-तशी अंमलबजावणी राज्यात करणे शक्य नाही. तथापि, शुश्रुषा सेवा कर्मचाऱ्यांना योग्य वेतन संरचना मंजूर करण्याचा समितीने शक्य तितका प्रयत्न केला आहे. विविध श्रेणींतील शुश्रुषा कर्मचाऱ्यांना खालील तक्ता क्रमांक ३.५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सुधारित वेतन संरचनेतील वेतन बँड व ग्रेड वेतनाची समिती शिफारस करीत आहे.

तक्ता क्रमांक ३.५ - शुश्रुषा सेवा कर्मचाऱ्यांसाठी वेतन संरचना

| **अ. क्र.** | **संचालनालयाचे नाव** | **पदनाम** | **विद्यमान वेतनश्रेणी (रुपये)** | **शिफारस केलेला वेतन बँड + ग्रेड वेतन** |
|---|---|---|---|---|
| प्रशासकीय विभाग - वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग | | | | |
| १) | वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय | १)अधीक्षक, शुश्रुषा सेवा | १०६५०-१५८५० | पीबी-३ + रुपये ६६०० |
| | | २)प्राचार्य, शुश्रुषा संस्था | १००००-१५२०० | पीबी-३ + रुपये ६६०० |
| | | ३)प्राध्यापक, शुश्रुषा | ७४५०-११५०० | पीबी-२ + रुपये ५००० |
| | | ४)अधिसेविका (७५० किंवा त्यापेक्षा जास्त बेडस्) | ७४५०-११५०० | पीबी-२ + रुपये ५००० |
| | | ५)अधिसेविका (५०० पेक्षा जास्त व ७५० पेक्षा कमी बेडस्) | ७४५०-११५०० | पीबी-२ + रुपये ४८०० |
| | | ६)अधिसेविका | ६५००-१०५०० | पीबी-२ + रुपये ४७०० |
| | | ७)अधिव्याख्याता, शुश्रुषा संस्था | ६५००-१०५०० | पीबी-२ + रुपये ४७०० |
| | | ८)परिसेविका पाठयनिदेशक | ६५००-१०५०० | पीबी-२ + रुपये ४७०० |
| | | ९)सहाय्यक अधिसेविका | ६५००-१०५०० | पीबी-२ + रुपये ४६०० |
| | | १०)परिसेविका/वार्ड मास्टर | ५५००-९००० | पीबी-२ + रुपये ४५०० |
| | | ११)सार्वजनिक आरोग्य परिचारीका | ५५००-९००० | पीबी-२ + रुपये ४५०० |
| | | १२)बालरोग परिचारिका | ५५००-९००० | पीबी-२ + रुपये ४५०० |
| | | १३)मानसोपचार परिचारिका | ५५००-९००० | पीबी-२ + रुपये ४५०० |
| | | १४)सुश्रुषा सहाय्यक | ५०००-८००० | पीबी-२ + रुपये ४४०० |
| | | १५)अधिपरिचारिका | ५०००-८००० | पीबी-२ + रुपये ४४०० |
| | | १६)परिचारिका प्रसविका | ५०००-८००० | पीबी-२ + रुपये ४४०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २) | आयुर्वेद संचालनालय | १)अधिसेविका (राजपत्रित) | ६५००-१०५०० | पीबी-२ + रुपये ४७०० |
| | | २)अधिसेविका (अराजपत्रित) | ६५००-१०५०० | पीबी-२ + रुपये ४६०० |
| | | ३)परिसेविका | ५५००-९५०० | पीबी-२ + रुपये ४५०० |
| | | ४)अधिपरिचारिका | ५०००-८००० | पीबी-२ + रुपये ४४०० |
| प्रशासकीय विभाग - सार्वजनिक आरोग्य विभाग | | | | |
| १ | आरोग्य सेवा संचालनालय | १)महिला अधिक्षिका, सार्वजनिक आरोग्य शुश्रुषा शाळा | ७४५०-११५०० | पीबी-२ + रुपये ४८०० |
| | | २)अधिसेविका II (श्रेणी - १) | ६५००-१०५०० | पीबी-२ + रुपये ४८०० |
| | | ३)अधिसेविका II (श्रेणी - ३) | ६५००-१०५०० | पीबी-२ +४७०० |
| | | ४)अधिसेविका III | ६५००-१०५०० | पीबी-२ + रुपये ४७०० |
| | | ५)परिचारिका पाठ्यनिदेशक | ६५००-१०५०० | पीबी-२ + रुपये ४७०० |
| | | ६)शुश्रुषा अधिकारी | ६५००-१०००० | पीबी-२ + रुपये ४७०० |
| | | ७)आरोग्य परिचारिका निदेशक | ६५००-१०००० | पीबी-२ + रुपये ४७०० |
| | | ८)सहाय्यक अधिसेविका | ६५००-१०००० | पीबी-२ + रुपये ४६०० |
| | | ९)परिसेविका | ५५००-९००० | पीबी-२ + रुपये ४५०० |
| | | १०सार्वजनिक आरोग्य परिचारिका | ५५००-९००० | पीबी-२ + रुपये ४५०० |
| | | ११)बालरोग परिचारिका | ५५००-९००० | पीबी-२ + रुपये ४५०० |
| | | १२)मानसोपचार परिचारिका | ५५००-९००० | पीबी-२ + रुपये ४५०० |
| | | १३)विशेष परिचारिका | ५५००-९००० | पीबी-२ + रुपये ४५०० |
| | | १४)शस्त्रक्रियागार परिचारिका | ५५००-९००० | पीबी-२ + रुपये ४५०० |
| | | १५)अधिपरिचारिका / शस्त्रक्रियागृह परिचारिका | ५०००-८००० | पीबी-२ + रुपये ४४०० |
| | | १६)परिचारिका प्रसविका, प्राथमिक आरोग्य केंद्र | ५०००-८०००+ विशेष वेतन रु. २५० | पीबी-२ + रुपये ४४०० (विशेष वेतन अनुज्ञेय नाही) |
| | | १७)परिचारिका, फिरते रुग्णालय पथक | ५०००-८०००+ विशेष वेतन रु. २५० | पीबी-२ + रुपये ४४०० (विशेष वेतन अनुज्ञेय नाही) |
| २ | राज्य कामगार विमा योजना आयुक्तालाय | १)अधिसेविका | ७४५०-११५०० | पीबी-२ + रुपये ४८०० |
| | | २)अधिसेविका | ६५००-१०५०० | पीबी-२ + रुपये ४७०० |
| | | ३)सहायक अधिसेविका , | ६५००-१०५०० | पीबी-२ + रुपये ४६०० |
| | | ४)परिचारिका/गृहपरिचारिका | ५५००-९००० | पीबी-२ + रुपये ४५०० |
| | | ५)अधिपरिचारिका/परिचारिका | ५०००-८००० | पीबी-२ + रुपये ४४०० |
| | | ६)परिचारिका क्षयरोग निदान केंद्र/क्षयरोग परिचारिका | ५०००-८००० | पीबी-२ + रुपये ४४०० |

## ३.१३ जिल्हा परिषदांतील वैद्यकीय अधिकाऱ्यांसाठी सुधारित वेतन संरचना

**३.१३.१** आयुर्वेद संचालनालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांना रुपये ६५००-१०५०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली असून त्यांच्याशी समकक्ष असलेल्या जिल्हा परिषदांकडील वैद्यकीय अधिकाऱ्यांना रुपये ८०००-१३५०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली असल्याची बाब संबंधित संघटनांनी समितीच्या निदर्शनास आणून जिल्हा परिषदांकडील वैद्यकीय अधिकाऱ्यांप्रमाणे आयुर्वेद संचालनालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांना वेतनश्रेणी मंजूर करण्याची विनंती केली होती. या संबंधी खातरजमा करताना समितीच्या असे निदर्शनास आले की, वेतनत्रूटी उच्चस्तर समितीच्या शिफारशीनुसार शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर - १२०१/प्र.क्र.४/सेवा- ९, दिनांक २७.२.२००६ (प्रपत्र-अ मधील अ.क्र. २४) अन्वये जिल्हा परिषदांमधील वैद्यकीय अधिकाऱ्यांना रुपये ८०००-१३५०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे.

**३.१३.२** या प्रकरणाच्या सविस्तर छाननीअंती असे दिसून आले की, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक ३०.१०.२००० च्या आदेशान्वये निर्गमित केलेल्या महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट अ (सेवाप्रवेश) नियम, २००० नुसार ॲलोपॅथी (एम.बी.बी.एस.) किंवा आयुर्वेदातील वैद्यकीय पदविधारकांना वैद्यकीय अधिकारी गट अ (पूर्वीचे वर्ग - २) मधील पदावर नामनिर्देशनाने नियुक्ती देण्यात येते. त्याचप्रमाणे, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक ३०.३.१९९२ रोजी निर्गमित केलेल्या महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट ब (सेवाप्रवेश) नियम, १९९२ नुसार वैद्यकीय अधिकारी (ॲलोपॅथी) गट ब (पूर्वीचे वर्ग - ३) या पदावर एम.बी.बी.एस. किंवा एल.सी.पी.एस. किंवा एल.एम.पी. ही शैक्षणिक अर्हताधारक उमेदवाराची नियुक्ती करण्यात येते व दिनांक ३०.३.१९९२ अन्वये निर्गमित केलेल्या महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा (बिगर ॲलोपॅथी) (सेवाप्रवेश) नियम, १९९२ नुसार वैद्यकीय अधिकारी गट - ब (पूर्वीचे वर्ग - ३) मधील पदावर आयुर्वेदीक शास्त्रातील

पदवीधारक उमेदवाराची नियुक्ती करण्यात येते. अशाच प्रकारचे सेवाप्रवेश नियम जिल्हा तांत्रिक सेवा (वैद्यकीय) वर्ग - ३ संवर्गातील पदावर उमेदवारांच्या नियुक्तीसाठी विहित करण्यात आले आहेत. वैद्यकीय अधिकारी गट अ (पूर्वीचे वर्ग - २) या पदावर वैद्यकीय अधिकारी गट ब (पूर्वीचे वर्ग - ३) व जिल्हा तांत्रिक सेवा (वैद्यकीय) वर्ग - ३ या संवर्गातील विहित अर्हताधारक व अनुभव असलेल्या उमेदवारांना पदोन्नती देण्याची तरतुद वैद्यकीय अधिकारी गट अ ( पूर्वीचे वर्ग - २) या पदाच्या सेवाप्रवेश नियमांमध्ये आहे. यावरुन हे स्पष्ट आहे की, (अ) रुपये ८०००-१३५०० ही विद्यमान वेतनश्रेणी वैद्यकीय अधिकारी गट अ ( पूर्वीचे वर्ग - २) या पदावर नामनिर्देशनाने नियुक्त झालेल्या आणि वैद्यकीय अधिकारी गट ब ( पूर्वीचे वर्ग - ३) तसेच, जिल्हा तांत्रिक सेवा (वैद्यकीय) वर्ग - ३ या संवर्गातील पदावरुन वैद्यकीय अधिकारी गट अ ( पूर्वीचे वर्ग - २) पदावर पदोन्नत झालेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना अनुज्ञेय आहे. त्याचप्रमाणे (ब) गट अ (पूर्वीचे वर्ग - २) संवर्गातील वैद्यकीय अधिकारी या पदावर पदोन्नत न झालेल्या वैद्यकीय अधिकारी गट ब ( पूर्वीचे वर्ग - ३) व जिल्हा तांत्रिक सेवा ( वैद्यकीय) वर्ग - ३ या संवर्गातील वैद्यकीय अधिकाऱ्यांना रुपये ६५००-१०५०० ही विद्यमान वेतनश्रेणी अनुज्ञेय आहे.

**३.१३.३** वैद्यकीय अधिका-यांना वेतनश्रेणी/सुधारित वेतन संरचना विहित करताना या विधिवत स्थितीचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. त्यामुळे जिल्हा परिषदांमध्ये विविध पदनामाने कार्यरत असलेल्या ॲलोपॅथी किंवा बिगर ॲलोपॅथी अर्हताधारक जिल्हा तांत्रिक सेवा (वैद्यकीय) वर्ग - ३ या संवर्गातील ज्या वैद्यकीय अधिकारी वर्ग - ३ यांना वैद्यकीय अधिकारी गट अ (पूर्वीचे वर्ग - २) मध्ये पदोन्नती मिळाली नाही, त्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना सुधारित वेतन संरचना मंजूर करण्यापूर्वी त्यांना मंजूर केलेल्या विद्यमान रुपये ८०००-१३५०० या वेतनश्रेणीत सुधारणा करुन त्यांचे वेतन रुपये ६५००-१०५०० या वेतनश्रेणीत पुनर्निश्चित करण्यात यावे. सुधारित वेतन संरचनेत वैद्यकीय अधिकारी गट अ

(पूर्वीचे वर्ग - २) पदास पीबी-२ वेतन बँड + रुपये ५४०० ग्रेड वेतन आणि वैद्यकीय अधिकारी गट ब (पूर्वीचे वर्ग - ३) पदास पीबी-२ वेतन बँड + रुपये ४४०० ग्रेड वेतन मंजूर करण्यात यावे. जिल्हा परिषदांकडील जिल्हा तांत्रिक सेवा (वैद्यकीय) वर्ग - ३ या संवर्गातील विविध पदनामाने कार्यरत वैद्यकीय अधिकारी वर्ग - ३ यांना सुद्धा सुधारित वेतन संरचनेत पीबी-२ वेतन बँड + रुपये ४४०० ग्रेड वेतन अनुज्ञेय करण्यात यावे.

## ३.१४ महसूल विभागातील मंडळ अधिकाऱ्यांसाठी सुधारित वेतन संरचना

**३.१४.१** शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक : वेतन १०/२००५/प्र.क्र.११०/ई-७, दिनांक ४.२.२००६ अन्वये महसूल विभागातील मंडळ अधिकाऱ्यांची विद्यमान वेतनश्रेणी दिनांक १.४.२००४ पासून रुपये ४५००-७००० वरुन रुपये ५०००-८००० अशी सुधारित करण्यात आली आहे. अशा पुन: सुधारित वेतनश्रेणीस योग्य ती सुधारित वेतन संरचना सुचविण्याची बाब समितीच्या कार्यकक्षेचा भाग आहे. त्यामुळे या संदर्भातील इतर पदांबरोबर असलेली वेतनश्रेणीची समकक्षता व सर्व संबंधित बाबी विचारात घेऊन मंडळ अधिकारी या पदास पीबी-१ वेतन बँड + रुपये ३५०० ग्रेड वेतन या सुधारित वेतन संरचनेची समिती शिफारस करीत आहे.

## ३.१५ भू-विज्ञान व खनिकर्म संचालनालयातील अधिकाऱ्यांसाठी सुधारित वेतन संरचना

**३.१५.१** भू-विज्ञान व खनिकर्म संचालनालयातील अधिकाऱ्यांच्या वेतनश्रेणीत उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दिनांक २७ .४.२००७ च्या शासन निर्णयान्वये दिनांक १.५.२००७ पासून सुधारणा करण्यात आली आहे. या पुन:सुधारित वेतनश्रेणीचा तसेच इतर विभागातील पदांबरोबरच्या वेतनश्रेणीची समकक्षता व इतर अनुषंगिक बाबी विचारात घेऊन या संचालनालयातील अधिकाऱ्यांसाठी खालील प्रमाणे सुधारित वेतन संरचनेची शिफारस

करण्यात येत आहे :-

| अ.क्र. | पदनाम | सुधारित वेतन संरचना | |
|---|---|---|---|
| | | वेतन बँड | ग्रेड वेतन (रुपये) |
| १ | संचालक, भू-विज्ञान व खनिकर्म | पीबी-४ | ८८०० |
| २ | सह संचालक, भू-विज्ञान व खनिकर्म | पीबी-३ | ७६०० |
| ३ | मुख्य रसायनशास्त्रज्ञ | पीबी-३ | ५७०० |
| ४ | वरिष्ठ भू-वैज्ञानिक | पीबी-३ | ५७०० |
| ५ | सहाय्यक भू -वैज्ञानिक | पीबी-२ | ५००० |

## ३.१६ एकात्मिक बालविकास प्रकल्पातील पर्यवेक्षिका/मुख्यसेविका या पदांसाठी सुधारित वेतन संरचना

**३.१६.१** समितीच्या असे निदर्शनास आले आहे की, एकात्मिक बालविकास प्रकल्पातील रुपये ४५००-७००० या विद्यमान वेतनश्रेणीतील पर्यवेक्षिका/मुख्यसेविकांच्या वेतनश्रेणीत पुन:सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या संदर्भात या वेतनश्रेणीतील इतर पदांबरोबरची समकक्षता आणि इतर संबंधित बाबी विचारात घेऊन पर्यवेक्षिका/ मुख्यसेविका या पदांसाठी पीबी-१ वेतन बँड व रुपये ३००० ग्रेड वेतनाची शिफारस करण्यात येत आहे.

## ३.१७ काही संवर्ग पदांच्या दिनांक १.१.१९९६ नंतर पुन:सुधारित करण्यात आलेल्या वेतनश्रेणीसाठी सुधारित वेतन संरचना

**३.१७.१** या प्रकरणातील परिच्छेद क्रमांक ३.२.५ मध्ये नमूद करण्यात आले आहे की, दिनांक १.१.१९९६ नंतर पुन: सुधारित करण्यात आलेल्या वेतनश्रेणींच्या बाबतीत सुधारित वेतन संरचनेमध्ये वेतन बँड आणि ग्रेड वेतन विहित करण्याबाबत पुढील परिच्छेदात स्वतंत्रपणे विवेचन करण्यात येईल. अशा काही पुन: सुधारित वेतनश्रेणींस वरील परिच्छेदांमध्ये वेतन बँड व ग्रेड वेतनाची शिफारस केली आहे. उर्वरित संवर्ग पदांबाबत दिनांक १.१.२००६ रोजी अंमलात असलेल्या वेतनश्रेणींचा विचार करुन तक्ता क्र. ३.१ मध्ये दर्शविल्याप्रमाणे सुधारित वेतन संरचनेतील वेतन बँड व ग्रेड वेतन अनुज्ञेय करण्यात यावे.

## ३.१८ सैनिकी शाळेतील संगणक निदेशक व शिक्षण निदेशक यांना नियमित वेतनश्रेणी

३.१८.१ सन १९९५ पासून राज्यात ३९ सैनिकी शाळा सुरु करण्यात आल्या आहेत. या शाळांतील मंजूर आकृतीबंधात संगणक निदेशक व शिक्षण निदेशक ही पदे अनुक्रमे रुपये ३००० व रुपये ५००० या मासिक एकत्रित वेतनावर निर्माण करण्यात आली होती. सन २००४ मध्ये हे एकत्रित वेतन अनुक्रमे रुपये ४५०० व रुपये ७५०० असे करण्यात आले आहे. सैनिकी शाळेतील सर्व वर्ग सुरु झाले नसल्यामुळे पुरेशा कामाअभावी सुरवातीस ही पदे एकत्रित वेतनावर निर्माण करण्यात आली होती. या संदर्भात शालेय शिक्षण आणि क्रीडा विभागाने असे नमूद केले आहे की, या पदधारकांना आता पुरेसे काम असून ते आठवड्यात वेळापत्रकाप्रमाणे २८ तास व वेळापत्रकाव्यतिरिक्त ६ तास काम करीत आहेत. त्यामुळे विभागाने प्रस्तावित केल्यानुसार तीन वर्ष एकत्रित वेतनावरील सेवा पूर्ण झालेल्या संगणक निदेशकांना रुपये ५५००-९००० व शिक्षण निदेशकांना रुपये ४०००-६००० ह्या विद्यमान वेतनश्रेणींची अनुज्ञेयता विचारात घेऊन त्यांना अनुक्रमे पीबी-२ वेतन बँड + रुपये ४३०० ग्रेड वेतन व पीबी-१ वेतन बँड + रुपये २४०० ग्रेड वेतन या सुधारित वेतन संरचनेची समिती शिफारस करीत आहे.

## ३.१९ मुख्य वास्तुशास्त्रज्ञ यांच्या कार्यालयातील कनिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ आणि वास्तुशास्त्रीय आरेखक यांच्यासाठी सुधारित वेतन संरचना

३.१९.१ मुख्य वास्तुशास्त्रज्ञ यांच्या कार्यालयातील कनिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ यांची विद्यमान वेतनश्रेणी रुपये ५५००-९००० अशी आहे. तसेच, वास्तुशास्त्रीय आरेखक यांची विद्यमान मूळ वेतनश्रेणी रुपये ४५००-७००० व चार वर्षांच्या सेवेनंतर ५०००-८००० अशी आहे. समितीच्या असे निदर्शनास आणण्यात आले आहे की, या दोन्ही पदांसाठी वास्तुशास्त्रातील पदवी ही किमान शैक्षणिक अर्हता विहित करण्यात आली आहे. त्यामुळे सुधारित वेतन

संरचना लागू करताना या बाबींचा विचार करण्याची मागणी संबंधित संघटनेमार्फत करण्यात आली. या मागणीचा विचार करुन समिती त्यांना खालीलप्रमाणे सुधारित वेतन संरचनेची शिफारस करत आहे :-

(अ) कनिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ
(विद्यमान वेतनश्रेणी रुपये ५५००-९०००) -- पीबी-२ + रुपये ४४०० ग्रेड वेतन

(ब) वास्तुशास्त्रीय आरेखक
(नियुक्तीच्यावेळी विद्यमान वेतनश्रेणी
रुपये ४५००-७०००) -- पीबी-१ + रुपये ३५०० ग्रेड वेतन
(चार वर्षांच्या सेवेनंतर विद्यमान वेतनश्रेणी
रुपये ५०००-८०००) -- पीबी-२ + रुपये ४३०० ग्रेड वेतन

## ३.२० काही संवर्ग पदांच्या वेतन संरचनेत फेरबदल

**३.२०.१** काही संवर्गाच्या वेतन संरचनेत सुधारणा करण्यासंदर्भात प्राप्त निवेदनांचा विचार करुन खालील तक्ता क्रमांक ३.६ मध्ये दर्शविल्यानुसार सुधारित वेतन संरचनेची समिती शिफारस करीत आहे (या शिफारशी इतर विभागातील समतुल्य पदांची वेतन संरचना, अन्य पदांच्या तुलनेत असलेल्या कामातील भिन्नता इत्यादी बाबींचा विचार करुन करण्यात आल्या आहेत) :-

**तक्ता क्रमांक ३.६ - काही संवर्ग पदांच्या वेतन संरचनेतील फेरबदल**

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | पदनाम | विद्यमान वेतनश्रेणी (रुपये) | शिफारस केलेली सुधारित वेतन संरचना | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | वेतन बँड | ग्रेड वेतन (रुपये) |
| | | **प्रशासकीय विभाग - वित्त विभाग** | | | |
| १) | स्थानिक निधी लेखा परिक्षण | १) कनिष्ठ लेखापरिक्षक | ४०००-६००० | पीबी-२ | २८०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **प्रशासकीय विभाग - सामान्य प्रशासन विभाग** | | | | | |
| १) | मंत्रालय चौरस आहार गृह व मंत्रालय उपहारगृहे | १) महाव्यवस्थापक | ६५००-१०५०० + विशेष वेतन रुपये ४०० | पीबी-२ | ४५०० (विशेष वेतन अनुज्ञेय नाही) |
| | | २) व्यवस्थापक (मंत्रालय उपाहारगृह, विधान भवन उपाहारगृह) | ५५००-९००० | पीबी-२ | ४४०० |
| | | ३) प्रमुख आचारी आणि कुपन विक्रेता | २७५०-४४०० | पीबी-१ | २००० |
| | | ४) आचारी आणि चहा विशेषज्ञ | २६१०-४००० | पीबी-१ | १७०० |
| | | ५) सहायक आचारी / चहा बनविणारा /वाढपी / पर्यवेक्षक/ वेटर / बॉय वेटर (प्रौढ) | २५५०-३२०० | पीबी-१ | १४०० |
| | | ६) हमाल/ सफाईगार | २५५०-३२०० | पीबी-१ | १४०० |
| २) | सह्याद्री राज्य अतिथीगृह | १) व्यवस्थापक | ५५००-९००० | पीबी-२ | ४४०० |
| | | २) खानसामा | २७५०-४४०० | पीबी-१ | २००० |
| | | ३) गट ड मधील इतर कर्मचारी | २५५०-३२०० | पीबी-१ | १४०० |
| ३) | राज्य सैनिक कल्याण मंडळ | १) सचिव, जिल्हा सैनिक कल्याण आणि उप संचालक | ७४५०-११५०० | पीबी-२ | ५००० |
| | | २) सर्व अधिकारी / कर्मचाऱ्यांचे दुर्लक्षित निवृत्तिवेतन दरमहा रुपये १००० इतके करण्यात यावे. | | | |
| **प्रशासकीय विभाग - उच्च व तंत्र शिक्षण विभाग** | | | | | |
| १) | तंत्र शिक्षण संचालनालय | १) संगणक प्रोग्रॅमर | ५५००-९००० | पीबी-२ | ४४०० |
| **प्रशासकीय विभाग - वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग** | | | | | |
| १) | वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय | १) आहारतज्ञ | ५०००-८००० | पीबी-२ | ४३०० |
| **प्रशासकीय विभाग - सार्वजनिक आरोग्य विभाग** | | | | | |
| १) | आरोग्य सेवा संचालनालय | १) समाजकार्यकर्ता | ५०००-८००० | पीबी-२ | ४३०० |
| | | २) आहारतज्ञ | ५०००-८००० | पीबी-२ | ४३०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २) | राज्य कामगार विमा योजना आयुक्तालय | १) आहारतज्ज्ञ | ५०००-८००० | पीबी-२ | ४३०० |
| प्रशासकीय विभाग - सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | | | | | |
| १) | अपंग कल्याण आयुक्तालय | १) शासकीय आश्रम शाळेतील शिक्षक आणि विशेष शिक्षक | ४०००-६००० | पीबी-२ | २८०० |
| प्रशासकीय विभाग - पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | | | | | |
| १) | भूजल सर्वेक्ष ण आणि विकास यंत्रणा | १) वरिष्ठ भूवैज्ञानिक / वरिष्ठ भूभौतिकतज्ज्ञ/ वरिष्ठ रसायनी | ८०००-१३५०० | पीबी-३ | ५५०० |
| | | २) सहाय्यक भूवैज्ञानिक | ७५००-१२००० | पीबी-२ | ४९०० |
| | | ३) कनिष्ठ भूवैज्ञानिक/ सहाय्यक भूभौतिकतज्ज्ञ/ सहाय्यक रसायनी | ६५००-१०००० | पीबी-२ | ४५०० |
| | | ४) कनिष्ठ भूभौतिकतज्ज्ञ / कनिष्ठ रसायनी | ५५००-९००० | पीबी-२ | ४४०० |
| प्रशासकीय विभाग - उद्योग, उर्जा व कामगार विभाग | | | | | |
| १ | बाष्पके संचालनालय | १) तांत्रिक अधिकारी | ६५००-१०५०० | पीबी-२ | ४६०० |
| | | २) वरिष्ठ तंत्रसहाय्यक | ५५००-९००० | पीबी-२ | ४५०० |
| | | ३) कनिष्ठ तंत्रसहाय्यक (नियुक्तीच्यावेळी) | ५५००-९००० | पीबी-२ | ४३०० |
| | | कनिष्ठ तंत्रसहाय्यक (पाच वर्षांच्या सेवेनंतर अभियांत्रिकी पदविकाधारकास) | ५५००-९००० | पीबी-२ | ४४०० |

## ३.२१ सुधारित वेतन संरचनेत प्रारंभिक वेतननिश्चिती

**३.२१.१** सुधारित वेतन संरचनेत प्रारंभिक वेतननिश्चिती दिनांक १.१.२००६ रोजी विद्यमान वेतनश्रेणीत घेत असलेल्या मूळ वेतनास १.८६ ने गुणून येणाऱ्या वेतनाच्या पुढील १० च्या पटीतील वेतन टप्प्यावर करण्यात यावी. अशाप्रकारे निश्चित केलेली रक्कम सुधारित वेतन

संरचनेच्या वेतन बँड मधील वेतन होईल. या रकमेत विद्यमान वेतनश्रेणीसाठी अनुज्ञेय ग्रेड वेतन मिळविल्यानंतर येणारी रक्कम सुधारित वेतन संरचनेतील मूळ वेतन होईल.

**उदा.** रुपये ४०००-१००-६००० या विद्यमान वेतनश्रेणीतील शासकीय कर्मचाऱ्याचे दिनांक १.१.२००६ रोजी मूळ वेतन रुपये ४६०० इतके आहे. या रक्कमेस १.८६ ने गुणल्यास रुपये ८५५६ इतकी रक्कम येते. सदर रक्कम पुढील १० च्या पटीत रुपये ८५६० इतकी होईल. तसेच, रुपये ४०००-६००० या वेतनश्रेणीस रुपये २४०० इतके ग्रेड वेतन अनुज्ञेय असल्यामुळे संबंधित कर्मचाऱ्याचे सुधारित वेतन संरचनेत मूळ वेतन रुपये ८५६०+२४०० = रुपये १०९६० इतके निश्चित होईल.

**३.२१.२** विद्यमान वेतनश्रेणीतील वेतनास १.८६ ने गुणून येणारी रक्कम पुढील १० च्या पटीत घेऊन सुधारित वेतन संरचनेतील अनुज्ञेय वेतन, वेतन बँडच्या किमान वेतनापेक्षा कमी असल्यास संबंधित कर्मचा-याचे वेतन अनुज्ञेय वेतन बँड मधील किमान वेतन टप्प्यावर निश्चित करावयाचे आहे. विद्यमान वेतनश्रेणीत वेगवेगळ्या वेतन टप्प्यांवर वेतन घेत असलेल्या कर्मचाऱ्यांची वरीलप्रमाणे वेतन निश्चिती केल्यानंतर या सर्व कर्मचाऱ्यांचे वेतन सुधारित वेतन संरचनेत अनुज्ञेय असलेल्या वेतन बँडच्या किमान टप्प्यापेक्षा कमी होण्याची शक्यता आहे. अशा वेतन एकवटल्याच्या प्रकरणी विद्यमान वेतनश्रेणीतील दोन टप्प्यांसाठी एक वेतनवाढ (वेतनाच्या ३ टक्के - ग्रेड वेतन विचारात न घेता) देय होईल.

**३.२१.३** सुधारित वेतन बँड मध्ये वेतन निश्चिती करताना वेतन एकवटणाऱ्या विद्यमान वेतनश्रेणी पुढील प्रमाणे आहेत.-

| अ. क्र. | विद्यमान वेतनश्रेणी | सुधारित वेतन संरचनेत अनुज्ञेय वेतन बँड |
|---|---|---|
| १) | रुपये २५५०-३२००, २६१०-४००० व रुपये २६५०-४००० या गट - ड साठीच्या विद्यमान वेतनश्रेणीतील कर्मचाऱ्यांचे गट क मध्ये श्रेणीवर्धन केल्यास | पीबी-१ |
| २) | रुपये २७५०-४४००, ३०५०-४५९० व रुपये ३२००-४९०० | पीबी-१ |

| | | |
|---|---|---|
| ३) | रुपये ८०००-१३५०० (गट-अ - पूर्वीचे वर्ग - १) | पीबी-३ |
| ४) | रुपये १४३००-१८३००, १५१००-१८३००, १६४००-२००००, १६४००-२०९००, १८४००-२२४०० व रुपये २२४००-२४५०० | पीबी-४ |

उर्वरित विद्यमान वेतनश्रेणींच्या बाबतीत(गट ड मधील कर्मचाऱ्यांच्या -१एस वेतन बँड मधील वेतन निश्चितीसह) परिच्छेद ३.२१.१ मध्ये दिल्याप्रमाणे सुधारित वेतन बँड मध्ये वेतन निश्चिती विद्यमान वेतनश्रेणीतील वेतनास १.८६ ने गुणून येणारी रक्कम पुढील १० च्या पटीत विचारात घेऊन करण्यात यावी.

**३.२१.४** परिच्छेद क्र.३.२१.३ मध्ये नमूद केलेल्या विद्यमान वेतनश्रेणींच्या बाबतीत, ज्या वेतन टप्प्यांना १.८६ ने गुणून व पुढील १० च्या पटीतील रक्कम विचारात घेऊन करण्यात येणारी वेतननिश्चिती ज्या वेतन टप्प्यांना लागू होत नाही असे टप्पे व त्यासाठी अनुज्ञेय होणारे वेतन बँड मधील वेतन खालील तक्ता क्र. ३.७ मध्ये दर्शविण्यात आले आहे (यामध्ये दर्शविण्यात न आलेल्या वेतन टप्प्यांच्या बाबतीत १.८६ ने गुणून व पुढील १० च्या पटीतील रक्कम विचारात घेऊन वेतननिश्चिती करण्याचे नेहमीचेच सूत्र लागू ठरते).

**तक्ता क्र.३.७ विद्यमान वेतनश्रेणीतील मूळ वेतनास १.८६ ने गुणून आणि त्यापुढील १० च्या पटीतील रक्कमेवर निश्चित केलेल्या वेतनापेक्षा वेगळ्या वेतन टप्प्यावर वेतन निश्चित होणारे वेगवेगळ्या विद्यमान वेतनश्रेणींमधील वेतन टप्पे-**

**(१) २५५०-३२०० (-१एस मधून पीबी-१ मध्ये श्रेणीवर्धन केल्यानंतर)**

| विद्यमान वेतन-श्रेणीतील मूळ वेतन | सुधारित वेतन बँड मधील वेतन (ग्रेड वेतना शिवाय) | विद्यमान वेतन-श्रेणीतील मूळ वेतन | सुधारित वेतन बँड मधील वेतन (ग्रेड वेतना शिवाय) | विद्यमान वेतन-श्रेणीतील मूळ वेतन | सुधारित वेतन बँड मधील वेतन (ग्रेड वेतना शिवाय) |
|---|---|---|---|---|---|
| २५५० | ५२०० | २७८० | ५५३० | ३०२० | ५८८० |
| २६०५ | ५२०० | २८४० | ५५३० | ३०८० | ५८८० |
| २६६० | ५३६० | २९०० | ५७०० | ३१४० | ६०६० |
| २७२० | ५३६० | २९६० | ५७०० | ३२०० | ६०६० |

(२) २६१०-४००० (-१एस मधून पीबी-१ मध्ये श्रेणीवर्धन केल्यानंतर)

| विद्यमान वेतन- श्रेणीतील मूळ वेतन | सुधारित वेतन बँड मधील वेतन (ग्रेड वेतना शिवाय) |
|---|---|
| २६१० | ५२०० |
| २६७० | ५३६० |
| २७३० | ५३६० |
| २७९० | ५५३० |

| विद्यमान वेतन- श्रेणीतील मूळ वेतन | सुधारित वेतन बँड मधील वेतन (ग्रेड वेतना शिवाय) |
|---|---|
| २८५० | ५५३० |
| २९१० | ५७०० |
| २९७५ | ५७०० |
| ३०४० | ५८८० |

| विद्यमान वेतन- श्रेणीतील मूळ वेतन | सुधारित वेतन बँड मधील वेतन (ग्रेड वेतना शिवाय) |
|---|---|
| ३१०५ | ५८८० |
| ३१७० | ६०६० |
| ३२३५ | ६०६० |

(३) २६५०-४००० (-१एस मधून पीबी-१ मध्ये श्रेणीवर्धन केल्यानंतर)

| विद्यमान वेतन- श्रेणीतील मूळ वेतन | सुधारित वेतन बँड मधील वेतन (ग्रेड वेतना शिवाय) |
|---|---|
| २६५० | ५३६० |
| २७१५ | ५३६० |
| २७८० | ५५३० |
| २८४५ | ५५३० |

| विद्यमान वेतन- श्रेणीतील मूळ वेतन | सुधारित वेतन बँड मधील वेतन (ग्रेड वेतना शिवाय) |
|---|---|
| २९१० | ५७०० |
| २९७५ | ५७०० |
| ३०४० | ५८८० |
| ३१०५ | ५८८० |

| विद्यमान वेतन- श्रेणीतील मूळ वेतन | सुधारित वेतन बँड मधील वेतन (ग्रेड वेतना शिवाय) |
|---|---|
| ३१७० | ६०६० |
| ३२३५ | ६०६० |

(४) २७५०-४४०० (पीबी-१)

| विद्यमान वेतन- श्रेणीतील मूळ वेतन | सुधारित वेतन बँड मधील वेतन (ग्रेड वेतना शिवाय) |
|---|---|
| २७५० | ५५३० |
| २८२० | ५५३० |
| २८९० | ५७०० |

| विद्यमान वेतन- श्रेणीतील मूळ वेतन | सुधारित वेतन बँड मधील वेतन (ग्रेड वेतना शिवाय) |
|---|---|
| २९६० | ५७०० |
| ३०३० | ५८८० |
| ३१०० | ५८८० |

| विद्यमान वेतन- श्रेणीतील मूळ वेतन | सुधारित वेतन बँड मधील वेतन (ग्रेड वेतना शिवाय) |
|---|---|
| ३१७० | ६०६० |
| ३२४० | ६०६० |

(५) ३०५०-४५९० (पीबी-१)

| विद्यमान वेतन-श्रेणीतील मूळ वेतन | सुधारित वेतन बँड मधील वेतन (ग्रेड वेतना शिवाय) | विद्यमान वेतन-श्रेणीतील मूळ वेतन | सुधारित वेतन बँड मधील वेतन (ग्रेड वेतना शिवाय) | विद्यमान वेतन-श्रेणीतील मूळ वेतन | सुधारित वेतन बँड मधील वेतन (ग्रेड वेतना शिवाय) |
|---|---|---|---|---|---|
| ३०५० | ५८८० | ३१२५ | ६०६० | ३२०० | ६०६० |

(६) ३२००-४९०० (पीबी-१)

| विद्यमान वेतनश्रेणीतील मूळ वेतन | सुधारित वेतन बँड मधील वेतन (ग्रेड वेतनाशिवाय) |
|---|---|
| ३२०० | ६०६० |

(७) ८०००-१३५०० ( गट अ - पूर्वीचे वर्ग -१) (पीबी-३)

| विद्यमान वेतन-श्रेणीतील मूळ वेतन | सुधारित वेतन बँड मधील वेतन (ग्रेड वेतनाशिवाय) | विद्यमान वेतन-श्रेणीतील मूळ वेतन | सुधारित वेतन बँड मधील वेतन (ग्रेड वेतनाशिवाय) |
|---|---|---|---|
| ८००० | १५६०० | ८२७५ | १५६०० |

(८) १४३००-१८३०० (पीबी-४)

| विद्यमान वेतन-श्रेणीतील मूळ वेतन | सुधारित वेतन बँड मधील वेतन (ग्रेड वेतना शिवाय) | विद्यमान वेतन-श्रेणीतील मूळ वेतन | सुधारित वेतन बँड मधील वेतन (ग्रेड वेतना शिवाय) | विद्यमान वेतन-श्रेणीतील मूळ वेतन | सुधारित वेतन बँड मधील वेतन (ग्रेड वेतना शिवाय) |
|---|---|---|---|---|---|
| १४३०० | ३७४०० | १६३०० | ३९६९० | १८३०० | ४३३९० |
| १४७०० | ३७४०० | १६७०० | ४०८९० | १८७०० | ४३३९० |
| १५१०० | ३८५३० | १७१०० | ४०८९० | १९१०० | ४४७०० |
| १५५०० | ३८५३० | १७५०० | ४२१२० | १९५०० | ४४७०० |
| १५९०० | ३९६९० | १७९०० | ४२१२० | | |

(९) १५१००-१८३०० (पीबी-४)

| विद्यमान वेतन-श्रेणीतील मूळ वेतन | सुधारित वेतन बँड मधील वेतन (ग्रेड वेतना शिवाय) |
|---|---|
| १५१०० | ३९६९० |
| १५५०० | ३९६९० |
| १५९०० | ४०८९० |
| १६३०० | ४०८९० |

| विद्यमान वेतन-श्रेणीतील मूळ वेतन | सुधारित वेतन बँड मधील वेतन (ग्रेड वेतना शिवाय) |
|---|---|
| १६७०० | ४२१२० |
| १७१०० | ४२१२० |
| १७५०० | ४३३९० |
| १७९०० | ४३३९० |

| विद्यमान वेतन-श्रेणीतील मूळ वेतन | सुधारित वेतन बँड मधील वेतन (ग्रेड वेतना शिवाय) |
|---|---|
| १८३०० | ४४७०० |
| १८७०० | ४४७०० |
| १९१०० | ४६०५० |
| १९५०० | ४६०५० |

(१०) १६४००-२०००० आणि (११) १६४००-२०९०० (पीबी-४)

| विद्यमान वेतन-श्रेणीतील मूळ वेतन | सुधारित वेतन बँड मधील वेतन (ग्रेड वेतना-शिवाय) |
|---|---|
| १६४०० | ३९६९० |
| १६८५० | ४०८९० |
| १७३०० | ४०८९० |
| १७७५० | ४२१२० |
| १८२०० | ४२१२० |

| विद्यमान वेतन-श्रेणीतील मूळ वेतन | सुधारित वेतन बँड मधील वेतन (ग्रेड वेतना-शिवाय) |
|---|---|
| १८६५० | ४३३९० |
| १९१०० | ४३३९० |
| १९५५० | ४४७०० |
| २०००० | ४४७०० |
| २०४५० | ४६०५० |

| विद्यमान वेतन-श्रेणीतील मूळ वेतन | सुधारित वेतन बँड मधील वेतन (ग्रेड वेतना-शिवाय) |
|---|---|
| २०९०० | ४६०५० |
| २१३५० | ४७४४० |
| २१८०० | ४७४४० |
| २२२५० | ४८८७० |

(१२) १८४००-२२४०० (पीबी-४)

| विद्यमान वेतन-श्रेणीतील मूळ वेतन | सुधारित वेतन बँड मधील वेतन (ग्रेड वेतना शिवाय) |
|---|---|
| १८४०० | ४४७०० |
| १८९०० | ४६०५० |
| १९४०० | ४६०५० |
| १९९०० | ४७४४० |

| विद्यमान वेतन-श्रेणीतील मूळ वेतन | सुधारित वेतन बँड मधील वेतन (ग्रेड वेतना शिवाय) |
|---|---|
| २०४०० | ४७४४० |
| २०९०० | ४८८७० |
| २१४०० | ४८८७० |
| २१९०० | ५०३४० |

| विद्यमान वेतन-श्रेणीतील मूळ वेतन | सुधारित वेतन बँड मधील वेतन (ग्रेड वेतना शिवाय) |
|---|---|
| २२४०० | ५१८५० |
| २२९०० | ५३४१० |
| २३४०० | ५५०२० |
| २३९०० | ५६६८० |

(१३) २२४००-२३५०० (पीबी-४)

| विद्यमान वेतन-श्रेणीतील मूळ वेतन | सुधारित वेतन बँड मधील वेतन (ग्रेड वेतना शिवाय) |
|---|---|
| २२४०० | ५१८५० |
| २२९२५ | ५३४१० |

| विद्यमान वेतन-श्रेणीतील मूळ वेतन | सुधारित वेतन बँड मधील वेतन (ग्रेड वेतना शिवाय) |
|---|---|
| २३४५० | ५५०२० |
| २३९७५ | ५६६८० |

| विद्यमान वेतन-श्रेणीतील मूळ वेतन | सुधारित वेतन बँड मधील वेतन (ग्रेड वेतना शिवाय) |
|---|---|
| २४५०० | ५८३८० |

## ३.२२ दिनांक १.१.२००६ रोजी किंवा त्यानंतर नियुक्ती झालेल्या कर्मचाऱ्यांची सुधारित वेतन संरचनेत वेतननिश्चिती

**३.२२.१** सुधारित वेतन संरचना लागू केल्यानंतर विद्यमान वेतनश्रेणीसाठी एकच वेतन बँड (वेगवेगळ्या ग्रेड वेतनांसह) विहित करण्यात आला आहे. त्यामुळे विविध विद्यमान वेतनश्रेणी (जी सुधारित वेतन संरचना लागू केल्यानंतर विद्यमान वेतनश्रेणीच्या संबंधित ग्रेड वेतनाने ओळखली जाईल) मध्ये नव्याने नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या वेतननिश्चितीबाबत स्पष्ट कार्यपद्धती विहित करणे आवश्यक आहे. एखाद्या कर्मचाऱ्याची संबंधित वेतन बँडमधील सर्वात कमी विद्यमान वेतनश्रेणीत (उदा. पीबी-२ वेतन बँड मधील रुपये ५०००-८००० किंवा पीबी-३ वेतन बँडमधील रुपये ८०००-१३५०० ही विद्यमान वेतनश्रेणी) नियुक्ती केली जाईल, त्यावेळेस त्याचे वेतन बँड मधील वेतन संबंधित वेतन बँडच्या किमान टप्प्यावर (वरील प्रकरणी अनुक्रमे रुपये ९३०० व १५६००) निश्चित करता येईल. तथापि, वेतन बँडच्या विद्यमान वेतनश्रेणीतील सर्वात कमी वेतनश्रेणी ऐवजी अन्य वरच्या वेतनश्रेणीत नियुक्ती झाल्यास, अशाप्रकरणी संबंधित कर्मचाऱ्यांची प्रारंभिक वेतननिश्चिती वेगळ्या प्रकारे करावी लागेल आणि हे ज्या पदावर नियुक्ती झाली आहे त्या पदाच्या ग्रेड वेतनावरुन ओळखता येईल. अशा

कर्मचाऱ्यांच्या बाबतीत नवीन नियुक्तीच्या वेळचे प्रारंभिक वेतन तक्ता क्र. ३.८ मध्ये दर्शविल्याप्रमाणे राहील.

**तक्ता क्रमांक - ३.८ - दिनांक १.१.२००६ रोजी अथवा त्यानंतर नव्याने सेवेत नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांचे नियुक्तीच्या पदास अनुज्ञेय ग्रेड वेतनावर आधारित प्रारंभिक वेतन**

| नियुक्ती पदाचे ग्रेड वेतन (रुपये) | वेतन बँड मध्ये निश्चित होणारे प्रारंभिक वेतन (रुपये) व वेतन बँड | नियुक्ती पदाचे ग्रेड वेतन (रुपये) | वेतन बँड मध्ये निश्चित होणारे प्रारंभिक वेतन (रुपये) व वेतन बँड | नियुक्ती पदाचे ग्रेड वेतन (रुपये) | वेतन बँड मध्ये निश्चित होणारे प्रारंभिक वेतन (रुपये) व वेतन बँड |
|---|---|---|---|---|---|
| १८०० | ५२०० (पीबी-१) | ४२०० | ९३०० (पीबी-२) | ५७०० | १६३९० (पीबी-३) |
| १९०० | ५८३० (पीबी-१) | ४३०० | १०१०० (पीबी-२) | ६६०० | १८७५० (पीबी-३) |
| २००० | ६४६० (पीबी-१) | ४४०० | १०९०० (पीबी-२) | ६९०० | १९७०० (पीबी-३) |
| २४०० | ७५१० (पीबी-१) | ४५०० | ११७०० (पीबी-२) | ७६०० | २१९०० (पीबी-३) |
| २५०० | ७७७० (पीबी-१) | ४६०० | १२५४० (पीबी-२) | ७९०० | २२८५० (पीबी-३) |
| २८०० | ८५६० (पीबी-१) | ४८०० | १३३५० (पीबी-२) | ८७०० | ३७४०० (पीबी-४) |
| २९०० | ८६२० (पीबी-१) | ५००० | १३७१० (पीबी-२) | ८९०० | ४०२०० (पीबी-४) |
| ३००० | ८६८० (पीबी-१) | ५४०० | १४४५० (पीबी-२) | १०००० | ४३००० (पीबी-४) |
| ३५०० | ८९२० (पीबी-१) | ५४०० | १५६००(पीबी-३) | १२००० | ४७१०० (पीबी-४) |

## ३.२३ वार्षिक वेतनवाढीचा दर आणि देय दिनांक

**३.२३.१** केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना देय असलेली वार्षिक वेतनवाढ मूळ वेतनाच्या ३ टक्के प्रमाणे (३ टक्क्यांप्रमाणे येणारी रक्कम आवश्यकतेनुसार त्यापुढील १० च्या पटीत घेण्यात यावी). सर्व कर्मचाऱ्यांना दिनांक १ जुलै रोजी देण्याची समिती शिफारस करीत आहे. सदर वेतनवाढीची रक्कम वेतन बँडमधील विद्यमान मूळ वेतनात मिळविण्यात यावी.

**उदा.**

| | | |
|---|---|---|
| | १) वेतनवाढीपूर्वी वेतन बँड मधील मूळ वेतन | रुपये ८७५० ( वेतन बँड पीबी-१) |
| | २) ग्रेड वेतन | रुपये २४०० |
| | ३) वेतन बँड मधील मूळ वेतन + ग्रेड वेतन | रुपये १११५० |
| | ४) वेतनवाढीची रक्कम<br>(वरील क्र.३ येथील रक्कमेच्या ३ टक्के) | रुपये ३३४.५०<br>(पुढील १० च्या पटीतील रक्कम रुपये ३४०) |
| | ५) वेतनवाढीनंतर वेतन बँड मधील वेतन | रुपये ८७५०+ ३४०= रुपये ९०९० |
| | ६) ग्रेड वेतन | रुपये २४०० |

**३.२३.२** दरवर्षी दिनांक १ जुलै रोजी वार्षिक वेतन वाढ मंजूर करण्यात यावी. सुधारित वेतन संरचनेत दिनांक १ जुलै रोजी ज्या कर्मचाऱ्यांची ६ महिने किंवा त्यापेक्षा जास्त सेवा पूर्ण होईल त्यांना दिनांक १ जुलै, २००७ रोजी वेतनवाढ देय राहील. ज्या कर्मचाऱ्यांना दिनांक २.१.२००५ ते दिनांक १.१.२००६ या कालावधीत विद्यमान वेतनश्रेणी वेतनवाढ मिळाली आहे अशा सर्व कर्मचाऱ्यांना दिनांक १ जुलै, २००६ रोजी पुढील वेतनवाढ देय राहील. ज्या कर्मचाऱ्यांना विद्यमान वेतनश्रेणीत दिनांक १.१.२००५ रोजी वेतनवाढ मिळाली आहे (आणि परिणामी ज्यांना दिनांक १.१.२००६ रोजी पुढील वेतनवाढ देय आहे) अशा कर्मचाऱ्यांना सुधारित वेतन संरचनेत वेतननिश्चिती करण्यापूर्वी दिनांक १.१.२००६ रोजी विद्यमान वेतनश्रेणीत वेतनवाढ देय होईल आणि त्यांना दिनांक १ जुलै, २००६ रोजी सुधारित वेतन संरचनेत पुढील वेतनवाढ देय होईल. सन २००७ पासून पुढे सर्व कर्मचाऱ्यांना त्या-त्या वर्षी दिनांक १ जुलै रोजी वार्षिक वेतनवाढ देय राहील.

## ३.२४ अत्युत्कृष्ट कामासाठी आगाऊ वेतनवाढीऐवजी उच्च दराने वेतनवाढ

**३.२४.१** सुधारित वेतन संरचनेत पीबी-३ वेतन बँडमध्ये वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यांना कामगिरीच्या आधारावर विशिष्ट प्रमाणात सर्वसाधारण दरापेक्षा १ टक्का जास्त दराने वेतनवाढ देण्याची सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाची शिफारस केंद्र शासनाने मान्य केली

आहे. सदर शिफारस राज्यात लागू केल्यास चांगले काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन मिळेल व त्यामुळे प्रशासकीय कामकाजात गतिमानता येईल असे समितीस वाटते. या बाबींचा विचार करुन समिती अशी शिफारस करते की, प्रत्येक विभागांतील/कार्यालयांतील एकूण कर्मचारी संख्येच्या ५ टक्के कर्मचाऱ्यांना त्यांच्या अत्युत्कृष्ट कामगिरीच्या आधारावर ३ टक्क्यांऐवजी ४ टक्के दराने वेतनवाढ मंजूर करण्यात यावी. सदर ५ टक्यांची मर्यादा -१एस, पीबी-१, पीबी-२ व पीबी-३ या वेतन बँड मध्ये वेतन घेणाऱ्या कर्मचारी/अधिकाऱ्यांना स्वतंत्रपणे (आणि शक्य असेल तर, संवर्गनिहाय) लागू करण्यात यावी. एकदा उच्च दराने वेतनवाढ मिळाल्यानंतर त्या कर्मचाऱ्यांचा उच्च दराने वेतनवाढीसाठी पुढील पाच वर्षे विचार करण्यात येणार नाही. उच्च दराने वेतनवाढ मंजूर करण्याची ही योजना वेतन बँड पीबी-४ मध्ये वेतन घेणाऱ्या अधिकाऱ्यांना लागू होणार नाही.

**३.२४.२** वरीलप्रमाणे उच्च दराने वेतनवाढ मंजूर करण्याच्या शिफारशीच्या परिणामस्वरुप एक किंवा दोन आगाऊ वेतनवाढी मंजूर करण्याची सध्याची पद्धत बंद करण्याची समिती शिफारस करीत आहे.

## ३.२५ नवीन नियुक्तीच्या वेळेस देण्यात येणारे विशेष वेतन, आगाऊ वेतनवाढी तसेच उच्च शैक्षणिक अर्हतेसाठी वेतनवाढी

**३.२५.१** सध्या काही पदांसाठी लागू असलेले विशेष वेतन तसेच उच्च शैक्षणिक अर्हतेसाठी वेतनवाढी संदर्भात शिफारस करणे समितीच्या कार्यकक्षेचा एक भाग आहे. उच्च शैक्षणिक अर्हतेसाठी वेतनवाढ/उच्च प्रारंभिक वेतन याबाबत समितीस असे वाटते की, यापूर्वीच्या परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे वेतन सुधारणेमुळे बऱ्यापैकी आर्थिक लाभ तसेच, वेतनवाढीसुद्धा उच्च दराने मिळणार असल्यामुळे उच्च शैक्षणिक अर्हतेसाठी वेतनवाढ अथवा उच्च प्रारंभिक वेतन ही पद्धत बंद करण्यात यावी. ज्या कर्मचाऱ्यांची कामगिरी

खरोखरच अत्युत्कृष्ट आहे किंवा त्यांनी धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेमुळे त्यांची कामगिरी सातत्याने अत्युत्कृष्ट राहते, अशा कर्मचाऱ्यांना वर परिच्छेद ३.२४ मध्ये नमूद केल्यानुसार १ टक्का जास्त दराने वेतनवाढ मंजूर करता येईल.

**३.२५.२** विशेष वेतनाबाबतसुद्धा समितीस असे वाटते की, सुधारित वेतन संरचनेच्या अनुषंगाने होणाऱ्या वेतन सुधारणेमुळे बहुतेक प्रकरणी विशेष वेतन मंजूर करण्याचे काही प्रयोजन राहत नाही. त्यामुळे विद्यमान वेतनश्रेणीत सध्या सर्व पदांना मिळत असलेले विशेष वेतन बंद करण्याची समिती शिफारस करीत आहे. मात्र, पोलीस शिपाई, नाईक आणि हवालदार यांच्या कर्तव्याचे स्वरुप लक्षात घेता त्यांना विद्यमान दराने विशेष वेतन पुढे चालू ठेवण्याची समिती शिफारस करीत आहे.

## ३.२६ पदोन्नतीनंतरची वेतननिश्चिती

**३.२६.१** एखाद्या कर्मचाऱ्याची एकाच वेतन बँड मधील एका पदावरुन दुसऱ्या पदावर पदोन्नती झाल्यास पदोन्नतीनंतरचे त्याचे वेतन, वेतन बँडमधील वेतन व ग्रेड वेतनात ३ टक्के वाढ देऊन व येणारी रक्कम पुढील १० च्या पटीत घेऊन निश्चित करण्यात यावे. अशा प्रकारे येणारी रक्कम (वेतन बँड मधील वेतन व ग्रेड वेतनावर ३ टक्के वाढ मिळवून येणारी रक्कम) त्या कर्मचाऱ्याचे पदोन्नतीनंतरचे वेतन होईल. या वेतनावर पदोन्नतीच्या पदास लागू ग्रेड वेतन सुद्धा अनुज्ञेय राहील. पदोन्नतीनंतर वेतन बँड बदलत असल्यावरही वरील प्रमाणे ३ टक्के वाढ देऊन पदोन्नतीच्या पदाचे वेतन निश्चित करण्यात यावे. ही रक्कम जर पदोन्नतीच्या पदाच्या वेतन बँड मधील किमान व कमाल वेतनाच्या मध्ये असल्यास ती रक्कम संबंधित कर्मचाऱ्याचे पदोन्नतीनंतरचे वेतन होईल. तथापि, ही रक्कम पदोन्नतीच्या

पदाच्या वेतन बँड मधील किमान वेतनापेक्षा कमी असल्यास वेतन बँड मधील किमान वेतन हे संबंधित कर्मचाऱ्याचे पदोन्नती नंतरचे वेतन होईल.

## ३.२७ सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना

**३.२७.१** समितीची भेट घेतलेल्या बहुतांशी संघटनांच्या प्रतिनिधींनी अनेक संवर्गात पदोन्नतीची संधी उपलब्ध नसल्याचे किंवा असल्यास फारच अल्प प्रमाणात असणे या बाबीकडे समितीचे लक्ष वेधले होते. यासाठी संघटनांनी पदोन्नती नसलेल्या ठिकाणी नवीन संवर्ग निर्माण करण्याची तसेच अल्पप्रमाणात पदोन्नतीची संधी उपलब्ध असलेल्या ठिकाणी पदोन्नतीच्या पदसंख्येत वाढ करण्याची मागणी केली. संघटनांच्या प्रतिनिधींनी पुढे असेही निदर्शनास आणले की, कालबद्ध पदोन्नती योजना/आश्वासित प्रगती योजनेमुळे पदोन्नतीची उणीव काही प्रमाणात भरुन निघाली असली तरी, योजनांतील काही तरतुदींमुळे यातील आकर्षकता कमी झाली आहे. एकाकी संवर्गातील पदधारकांना पूर्वीची कालबद्ध पदोन्नती योजना व सध्याच्या आश्वासित प्रगती योजनेतंर्गत अनुज्ञेय होणाऱ्या वेतनश्रेणीतील तफावती कडेही समितीचे लक्ष वेधले होते.

**३.२७.२** प्रत्येक कर्मचाऱ्याला त्याच्या सेवा कालावधीत वरिष्ठ पदावर पदोन्नती मिळण्याची इच्छा असणे स्वाभाविक आहे. त्यामुळे त्यांच्या कामात गती येऊन त्यांच्याकडून उत्कृष्ट काम होऊ शकते व पर्यायाने प्रशासन गतीमान होण्यास मदत होईल, याची समितीस जाणिव आहे. वरिष्ठ पदावरील पदोन्नतीच्या इच्छेमागे केवळ आर्थिक लाभ अपेक्षित नसून त्या पदामुळे मिळणारी प्रतिष्ठासुद्धा महत्वाची असते. त्यामुळे प्रत्येक संवर्गात उचित पदोन्नतीच्या संधी उपलब्ध करण्याची गरज असल्याचे समितीस वाटते. पदोन्नतीची एकही संधी उपलब्ध नसलेल्या पदावरील कर्मचाऱ्यांच्या स्थितीबाबत समितीस सहानुभूती आहे. पदोन्नतीची संधी उपलब्ध असलेल्या काही प्रकरणी प्रत्यक्ष पदोन्नती मिळण्यास २०-२५ वर्षांचा कालावधी

लागत असल्याचे समितीच्या निदर्शनास आणण्यात आले आहे. वर नमूद केल्याप्रमाणे अशा कर्मचाऱ्यांबाबत समितीस सहानुभूती असली तरी पदोन्नतीसाठी नवीन संवर्ग निर्माण करण्याची अथवा अल्प पदोन्नतीची संधी उपलब्ध असलेल्या ठिकाणी पदोन्नतीच्या पदसंख्येत वाढ करण्याची समिती शिफारस करु शकत नाही. यासाठी संबंधित प्रशासकीय विभागाने त्यांच्या प्रशासकीय गरजा लक्षात घेऊन कार्यवाही करणे आवश्यक आहे.

**३.२७.३** वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे पदोन्नतीची संधी उपलब्ध करण्यासाठी नवीन संवर्ग निर्माण करणे/पदसंख्येत वाढ करणेबाबत समिती शिफारस करु शकत नसली तरी याबाबत कर्मचाऱ्यांच्या तक्रारीचे काही प्रमाणात निराकरण करण्याच्या उद्देशाने सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या तरतुदींमध्ये आकर्षक बदल करण्याचे समितीने प्रस्तावित केले आहे. या संदर्भात सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाने केलेल्या शिफारशी व त्याची अंमलबजावणी सुधारित स्वरुपात करण्याबाबत केंद्र शासनाने घेतलेल्या निर्णयाचा समितीने विचार केला आहे. पाचव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींच्या आधारावर केंद्र शासनाने सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना गट-ब, गट - क आणि गट -ड तसेच, गट अ मधील एकाकी पदास लागू केली होती. या योजनेमध्ये १२ व २४ वर्षांच्या सेवेनंतर दोन वेळा पदोन्नतीमुळे अनुज्ञेय होणाऱ्या वेतनश्रेणीतील किंवा एकाकी पदांबाबत विहित वेतनश्रेणीतील वेतननिश्चितीमुळे मिळणारा आर्थिक लाभ देण्याची तरतुद करण्यात आली होती. सहाव्या केंद्रीय वेतन आयोगानेही सदर योजना पुढील सुधारणेसह चालू ठेवण्याची शिफारस केली आहे,- १) ही योजना गट-अ मधील (संघटीत सेवा वगळून) सर्व अधिकाऱ्यांना लागू करण्यात यावी. २) प्रत्यक्ष पदोन्नतीच्या वेळेस होणाऱ्या वेतननिश्चितीचा लाभ या योजनेचा लाभ (म्हणजे वेतनवाढ व वरिष्ठ ग्रेड वेतन) अनुज्ञेय करताना देण्यात यावा. सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या लाभाच्या वेळेस देण्यात येणारे ग्रेड वेतन संबंधित कर्मचारी घेत असलेल्या ग्रेड वेतनाच्या साखळीत नजीकचे ग्रेड वेतन असेल. हे ग्रेड वेतन प्रत्यक्ष पदोन्नतीच्यावेळी अनुज्ञेय होणाऱ्या ग्रेड वेतनापेक्षा वेगळे असू शकते. ३) या योजनेचा लाभ १२ वर्षांची सेवा पूर्ण झाल्यानंतर मिळू शकेल.

सदर योजनेचा लाभ संपूर्ण सेवा कालावधीत दोन वेळा देण्याच्या सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींमध्ये केंद्र शासनाने बदल करुन सदर लाभ दोन ऐवजी १०, २० व ३० वर्षांनी तीन वेळा अनुज्ञेय केला आहे.

**३.२७.४** राज्य शासनाने दिनांक ८.६.१९९५ च्या शासन निर्णयान्वये कालबद्ध पदोन्नती योजना प्रथम दिनांक १.१०.१९९४ पासून राज्यात लागू केली. फक्त क आणि ड गटातील कर्मचाऱ्यांसाठी लागू करण्यात आलेल्या सदर योजनेंतर्गत १२ वर्षाची सेवा झाल्यानंतर पदोन्नतीचे पद असल्यास त्या पदाची वेतनश्रेणी अथवा पदोन्नतीचे पद नसल्यास अशा प्रकरणी या लाभासाठी ठरविण्यात आलेली वेतनश्रेणी संबंधित कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय करण्यात येत होती. हा लाभ पदोन्नतीसाठी विहित पद्धती अनुसरुन अनुज्ञेय करण्यात येत होता. तसेच संपूर्ण सेवा कालावधीत या योजनेचा लाभ फक्त एकदाच अनुज्ञेय करण्यात येत होता. दोन पदोन्नती मिळालेल्या कर्मचाऱ्यांना त्याचप्रमाणे गट -क मधून गट -ब मध्ये पदोन्नत होणाऱ्या कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय नव्हता. या योजनेचा लाभ देताना पदोन्नतीच्या वेळी करण्यात येणाऱ्या वेतननिश्चितीचा लाभ देण्यात येत होता. तथापि प्रत्यक्ष पदोन्नतीच्या वेळेस परत वेतननिश्चिती करण्यात येत नव्हती. तसेच या योजनेचा लाभ मिळालेला कर्मचारी प्रत्यक्ष पदोन्नतीस अपात्र ठरल्यास अथवा पदोन्नती नाकारल्यास सदर लाभ काढून घेण्यात येऊन संबंधित कर्मचाऱ्याची या लाभापूर्वी घेत असलेल्या वेतनश्रेणीत वेतननिश्चिती करण्यात येत होती. तथापि, मिळालेल्या आर्थिक लाभाची वसूली करण्यात येत नव्हती. कालबद्ध पदोन्नतीच्या सदर योजनेऐवजी नवीन सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना दिनांक २०.७.२००१ च्या शासन निर्णयान्वये राज्यात लागू करण्यात आली. पूर्वीच्या कालबद्ध पदोन्नती आणि सध्याच्या सेवातंर्गत आश्वासित प्रगती योजनेतील महत्वाचा बदल म्हणजे गट-क आणि गट -ड कर्मचाऱ्यांसाठी लागू असलेली पूर्वीची योजना रुपये ८०००-१३५०० या वेतनश्रेणीत वेतन घेणाऱ्या अधिकाऱ्यांपर्यंत लागू करण्यात आली. या योजनेचा लाभ दोन किंवा अधिक पदोन्नती मिळालेल्या व पूर्वीच्या कालबद्ध पदोन्नती मिळालेल्या कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय नाही. तसेच, या योजनेचा लाभ संपूर्ण

सेवा कालावधीत एकदाच अनुज्ञेय करण्यात आला आहे. या योजनेचा लाभ काही एकाकी पदांना देताना कालबद्ध पदोन्नती योजनेंतर्गत अनुज्ञेय असलेल्या वेतनश्रेणींपेक्षा निम्न वेतनश्रेणी मंजूर करण्यात आल्यामुळे तफावत निर्माण झाल्याची बाब समितीच्या निदर्शनास आली आहे.

**३.२७.५** सध्याच्या सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेत सुधारणा करण्याच्या दृष्टीने योजनेतील विद्यमान तरतुदी, केंद्र शासनाने मान्य केलेली सुधारित योजना तसेच संघटनांमार्फत निदर्शनास आणण्यात आलेल्या योजनेतील त्रूटी याचा काळजीपूर्वक विचार करुन खालील प्रमाणे सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेची समिती शिफारस करीत आहे :-

१) संपूर्ण सेवा कालावधीत फक्त एकदाच योजनेचा लाभ मिळण्याच्या सध्याच्या तरतुदीऐवजी १२ व २४ वर्षांच्या सेवेनंतर दोन वेळा लाभ अनुज्ञेय करण्यात यावा. तथापि, तीन किंवा त्यापेक्षा जास्त पदोन्नती मिळालेल्या कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ मिळणार नाही. दोन पदोन्नती मिळालेल्यांना या योजनेचा लाभ एकदा मिळू शकेल. एक पदोन्नती किंवा पदोन्नती न मिळालेल्या कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ दोन वेळा मिळू शकेल. या ठिकाणी हे स्पष्ट करण्यात येते की, कालबद्ध पदोन्नती अथवा सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ यापूर्वी मिळाला असल्यास, सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेखाली एक पदोन्नती मिळाली असे गृहीत धरण्यात येईल. तसेच असेही स्पष्ट करण्यात येते की, विशिष्ठ कालावधीनंतर समय वेतनश्रेणी, अकार्यकारी वेतनश्रेणी, निवडश्रेणी अथवा अन्य कारणांमुळे मिळणारी उच्च वेतनश्रेणी या योजनेचा लाभ देण्यासाठी पदोन्नती समजण्यात येईल.

२) सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना शिक्षकीय संवर्गास लागू असणार नाही.

३) या योजनेचा लाभ पूर्वीप्रमाणेच रुपये ८०००-१३५०० या विद्यमान वेतनश्रेणी पर्यंतच्या वेतनश्रेणीत वेतन घेणाऱ्या अधिकाऱ्यांना अनुज्ञेय करण्यात यावा.

४) पदोन्नतीच्या संधी उपलब्ध असणाऱ्या कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ १२ वर्षांच्या सेवेनंतर मिळाल्यावर त्यांना प्रत्यक्ष पदोन्नतीच्या वेळेस अनुज्ञेय होणारी वेतनवाढ देण्यात यावी. ग्रेड वेतन हे प्रत्यक्ष पदोन्नतीच्या वेळेस मिळणाऱ्या ग्रेड वेतनापेक्षा वेगळे असू शकेल. अशा प्रकरणी प्रत्यक्ष पदोन्नती मिळाल्यानंतर उर्वरित ग्रेड वेतनाची रक्कम अनुज्ञेय करण्यात यावी. तथापि, प्रत्यक्ष पदोन्नतीनंतर पुन्हा वेतननिश्चिती करण्यात येणार नाही.

५) एकाकी पदधारकांसाठी या योजनेखालील तरतूदी प्रस्तावित करताना उदार दृष्टीकोन स्विकारण्यात आला आहे. पदोन्नतीची संधी उपलब्ध असलेल्या कर्मचाऱ्यांना योजनेचा लाभ मिळाल्यानंतरही त्यांना त्यांच्या मूळ पदाचे काम करावे लागते. त्याप्रमाणेच पदोन्नतीची संधी उपलब्ध नसणाऱ्या कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ मिळाल्यावर त्यांच्या कामात कोणताही फरक होत नाही. तथापि, अशा कर्मचाऱ्यांना पहिल्या व दुसऱ्या लाभानंतर त्यांच्या सध्याच्या पदनामानंतर अनुक्रमे वरिष्ठ व निवडश्रेणी असा शब्दप्रयोग करण्यात यावा.

**३.२७.६** दिनांक १.१.२००६ पूर्वी कालबद्ध पदोन्नती योजना किंवा सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळालेल्या कर्मचाऱ्यांचे दिनांक १.१.२००६ व त्यानंतर सुधारित वेतन संरचनेतील वेतन खाली दर्शविल्यानुसार निश्चित करण्यात यावे :-

(अ) दिनांक १.१.२००६ पूर्वीच कालबद्ध पदोन्नती योजना किंवा सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळाल्यानंतर प्रत्यक्ष पदोन्नती मिळाली असेल, अशा कर्मचाऱ्यांची सुधारित वेतन संरचनेतील वेतननिश्चिती इतर कर्मचाऱ्यांप्रमाणेच तक्ता क्रमांक ३.१ नुसार अनुज्ञेय वेतन बँड व ग्रेड वेतनानुसार करण्यात यावी.

(ब) दिनांक १.१.२००६ पूर्वी कालबद्ध पदोन्नती योजना किंवा सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळाल्यानंतर पदोन्नतीच्या संधी उपलब्ध असूनही प्रत्यक्ष पदोन्नती न मिळालेल्या कर्मचाऱ्याची वेतननिश्चिती करताना त्यास प्रत्यक्ष पदोन्नतीच्या पदाचा वेतन बँड

आणि कालबद्ध पदोन्नती योजना किंवा सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळण्यापूर्वीच्या वेतनश्रेणीचे ग्रेड वेतन अधिक सदर ग्रेड वेतन आणि प्रत्यक्ष पदोन्नतीच्या पदाचे ग्रेड वेतन यामधील फरकाच्या ५० टक्के रक्कम किंवा रुपये १०० यापैकी जे जास्त असेल ते ग्रेड वेतन अनुज्ञेय करण्यात यावे.

**उदा.** (१) चौथ्या वेतन आयोगातंर्गत रुपये ९५०-१५०० या वेतनश्रेणीमध्ये वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यास दिनांक १.१.१९९६ पूर्वी कालबद्ध पदोन्नतीचा लाभ मिळाला आहे तथापि प्रत्यक्ष पदोन्नती मिळाली नाही. तसेच पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी रुपये १२००-२०४० अशी होती. पाचव्या वेतन आयोगात रुपये ९५०-१५०० व रुपये १२००-२०४० या वेतनश्रेणींसाठी अनुक्रमे रुपये ३०५०-४५९० आणि रुपये ४०००-६००० अशा वेतनश्रेणी मंजूर करण्यात आलेल्या आहेत. चौथ्या वेतन आयोगातील रुपये ९५०-१५०० या वेतनश्रेणी करीता (किंवा पाचव्या वेतन आयोगातील रुपये ३०५०-४५९० या वेतनश्रेणीकरीता) सहाव्या वेतन आयोगांतर्गत पीबी-१ वेतन बँड रुपये १९०० ग्रेड वेतन अनुज्ञेय होईल व रुपये १२००-२०४० या वेतनश्रेणीकरीता (किंवा पाचव्या वेतन आयोगातील रुपये ४०००-६००० या वेतनश्रेणीकरीता) सहाव्या वेतन आयोगांतर्गत पीबी-१ वेतन बँड रुपये २४०० ग्रेड वेतन अनुज्ञेय होईल. सुधारित वेतन संरचनेत दिनांक १.१.२००६ रोजी व त्यानंतर वेतननिश्चिती करताना त्या कर्मचाऱ्यास पीबी-१ वेतन बँड (कालबद्ध पदोन्नती योजनेंतर्गत मिळालेल्या रुपये १२००-२०४० या प्रत्यक्ष पदोन्नतीच्या वेतनश्रेणीला अनुज्ञेय असलेला) आणि रुपये १९००+ २५० (२४००-१९००= ५०० च्या ५० टक्के अथवा रुपये १०० यापैकी जे जास्त असेल ते म्हणजेच रुपये २५०)म्हणजेच रुपये २१५० इतके ग्रेड वेतन अनुज्ञेय होईल.

(२) पाचव्या वेतन आयोगानुसार रुपये २७५०-४४०० या वेतनश्रेणीत वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यास दिनांक १.१.१९९६ नंतर कालबद्ध पदोन्नती योजना/सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळाला असल्यास त्यांना पदोन्नतीच्या पदाची रुपये ३०५०-४५९० ही

वेतनश्रेणी लागू होईल. रुपये २७५०-४००० व रुपये ३०५०-४५९० या वेतनश्रेणींना सहाव्या वेतन आयोगानुसार अनुक्रमे पीबी-१ वेतन बँड + रुपये १८०० ग्रेड वेतन आणि पीबी-१ + रुपये १९०० ग्रेड वेतन अनुज्ञेय होईल. सुधारित वेतन संरचनेत दिनांक १.१.२००६ रोजी व त्यानंतर वेतननिश्चिती करताना संबंधित कर्मचाऱ्यास पीबी-१ वेतन बँड (कालबद्ध पदोन्नती योजना/सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत मिळालेल्या रुपये ३०५०-४५९० या प्रत्यक्ष पदोन्नतीच्या पदास अनुज्ञेय असलेला) आणि रुपये १८००+ (१९००-१८००= १०० च्या ५० टक्के किमान १०० रुपयेच्या अधिन) रुपये १०० म्हणजे रुपये १९०० इतके ग्रेड वेतन अनुज्ञेय होईल.

(३) पाचव्या वेतन आयोगानुसार रुपये ४५००-७००० या वेतनश्रेणीत वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यास दिनांक १.१.१९९६ नंतर कालबद्ध पदोन्नती योजना/सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत पदोन्नतीच्या पदाची रुपये ५०००-८००० ही वेतनश्रेणी लागू होईल. या दोन्ही वेतनश्रेणींना सहाव्या वेतन आयोगानुसार अनुक्रमे पीबी-१ वेतन बँड + रुपये २८०० ग्रेड वेतन आणि पीबी-२ + रुपये ४२०० ग्रेड वेतन अनुज्ञेय होईल. सुधारित वेतन संरचनेत दिनांक १.१.२००६ रोजी व त्यानंतर वेतननिश्चिती करताना संबंधित कर्मचाऱ्यास पीबी-२ वेतन बँड (कालबद्ध पदोन्नती योजना/सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत मिळालेल्या रुपये ५०००-८००० या प्रत्यक्ष पदोन्नतीच्या पदास अनुज्ञेय असलेला वेतन बँड) आणि रुपये २८००+ (४२००-२८००= १४०० च्या ५० टक्के) रुपये ७०० म्हणजे रुपये ३५०० इतके ग्रेड वेतन अनुज्ञेय होईल.

अशाप्रकारे कर्मचाऱ्यांना ते ज्या पदावर पदोन्नत होणार आहेत त्या पदाच्या ग्रेड वेतनापेक्षा कमी ग्रेड वेतन अनुज्ञेय होणार आहे. तसेच, हेदेखील नमूद करण्यात येते की, कालबद्ध पदोन्नती योजना/सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळालेल्या कर्मचाऱ्यांना ग्रेड वेतनाबरोबरच यापूर्वीच वेतननिश्चितीच्यावेळी (कालबद्ध पदोन्नती योजना/सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत) मिळालेल्या उच्च वेतनाचा लाभ सुधारित वेतन संरचनेत वेतननिश्चितीच्या वेळेस होईल. तसेच, त्या कर्मचाऱ्यास या सुधारित सेवांतर्गत आश्वासित

प्रगती योजनेंतर्गत मिळणारे ग्रेड वेतन आणि प्रत्यक्ष पदोन्नतीच्या पदाचे ग्रेड वेतन यामधील फरक त्याला प्रत्यक्ष पदोन्नतीच्यावेळी देय होईल. तसेच असेही स्पष्ट करण्यात येते की, कालबद्ध पदोन्नती योजना/सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेतंर्गत कर्मचाऱ्यांस एका वेतनवाढीचा लाभ मिळालेला असल्याने प्रत्यक्ष पदोन्नतीच्यावेळी त्या कर्मचाऱ्यास वेतनवाढीचा फायदा पुन्हा मिळणार नाही.

(क) दिनांक १.१.२००६ पूर्वी कालबद्ध पदोन्नती योजना/सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळालेल्या व पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसलेल्या कर्मचाऱ्यांस सुधारित वेतन संरचनेत दिनांक १.१.२००६ रोजी किंवा त्यानंतर, कालबद्ध पदोन्नती योजना/सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत लाभ मिळण्यापूर्वी घेत असलेल्या मूळ पदाच्या विद्यमान वेतनश्रेणींस अनुज्ञेय असलेला वेतन बँड आणि मूळ पदास अनुज्ञेय ग्रेड वेतन अधिक खाली नमूद केल्याप्रमाणे समुचित ग्रेड वेतन अनुज्ञेय होईल :-

| **मूळ पदाचे ग्रेड वेतन (रुपये)** | **मूळ पदाच्या ग्रेड वेतनाव्यतिरिक्त अनुज्ञेय ग्रेड वेतन (रुपये)** |
|---|---|
| २००० पर्यंत | २०० |
| २००० पेक्षा जास्त व ४००० पेक्षा कमी | ३०० |
| ४००० पेक्षा जास्त व ५००० पेक्षा कमी | ४०० |
| ५००० पेक्षा जास्त | ५०० |

**उदा.** (१) पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसलेल्या व चौथ्या वेतन आयोगानुसार रुपये ९५०-१५०० या वेतनश्रेणीत वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यास दिनांक १.१.१९९६ पूर्वी कालबद्ध पदोन्नती योजनेंतर्गत रुपये १२००-२०४० ही वेतनश्रेणी अनुज्ञेय होते. पाचव्या वेतन केंद्रीय वेतन आयोगानुसार रुपये ९५०-१५०० व रुपये १२००-२०४० या वेतनश्रेणींना अनुक्रमे रुपये ३०५०-४५९० आणि रुपये ४०००-६००० या समकक्ष वेतनश्रेणी अनुज्ञेय ठरतात. चौथ्या वेतन आयोगातील रुपये ९५०-१५०० या वेतनश्रेणीकरीता (पाचव्या वेतन आयोगातील रुपये

३०५०-४५९० या वेतनश्रेणी करीता) सहाव्या वेतन आयोगानुसार पीबी-१ वेतन बँड + रुपये १९०० ग्रेड वेतन अनुज्ञेय होईल. दिनांक १.१.२००६ व त्यानंतर सुधारित वेतन संरचनेत वेतननिश्चिती करताना सदर कर्मचाऱ्यास पीबी-१ वेतन बँड (कालबद्ध पदोन्नती पूर्वी रुपये ९५०-१५०० या त्याच्या मूळ वेतनश्रेणीस अनुज्ञेय असलेला) आणि रुपये १९००+ २०० म्हणजेच रुपये २१०० ग्रेड वेतन देय होईल.

(२) पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसलेल्या व पाचव्या वेतन आयोगानुसार रुपये ३०५०-४५९० या वेतनश्रेणीत वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यास दिनांक १.८.२००१ व त्यानंतर सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळाल्यास रुपये ३२००-४९०० ही वेतनश्रेणी अनुज्ञेय होते. पाचव्या वेतन आयोगातील रुपये ३०५०-४५०० करीता सहाव्या वेतन आयोगानुसार पीबी-१ वेतन बँड + रुपये १९०० ग्रेड वेतन अनुज्ञेय होईल. सुधारित वेतन संरचनेत दिनांक १.१.२००६ रोजी व त्यानंतर वेतननिश्चिती करताना सदर कर्मचाऱ्यास पीबी-१ वेतन बँड (सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळण्यापूर्वी रुपये ३०५०-४५९० या त्याच्या मूळ वेतनश्रेणीस अनुज्ञेय असलेला) आणि रुपये १९०० + २०० म्हणजचे रुपये २१०० इतके ग्रेड वेतन अनुज्ञेय होईल.

**३.२७.७** दिनांक १.१.२००६ नंतर सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ मिळणाऱ्या कर्मचाऱ्यांची सुधारित वेतन संरचनेत खालील प्रमाणे वेतननिश्चिती करण्यात यावी :-

(अ) पदोन्नतीच्या संधी उपलब्ध असलेल्या कर्मचाऱ्यांस दिनांक १.१.२००६ नंतर सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ मिळणार असल्यास त्यास प्रत्यक्ष पदोन्नतीच्या पदाचा वेतन बँड आणि सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळण्यापूर्वीच्या त्याच्या संबंधित पदाचे ग्रेड वेतन अधिक सदर पदाचे ग्रेड वेतन व प्रत्यक्ष

पदोन्नतीच्या पदाचे ग्रेड वेतन यामधील फरकाच्या रकमेच्या ५० टक्के किंवा रुपये १०० यापैकी जे जास्त असेल ते ग्रेड वेतन अनुज्ञेय होईल.

**उदा.** पीबी-१ वेतन बँड आणि रुपये १९०० ग्रेड वेतन अनुज्ञेय असलेल्या पदावरील कर्मचाऱ्याच्या पदोन्नतीच्या पदाचा वेतन बँड पीबी-१ आणि ग्रेड वेतन रुपये २४०० असल्यास त्याला सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ मिळाल्यास त्यास पीबी-१ वेतन बँड (सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ मिळाला त्यावेळी त्याच्या पदोन्नतीच्या पदास अनुज्ञेय असलेला) आणि रुपये १९०० अधिक (२४००-१९०० = ५०० च्या ५० टक्के अथवा रुपये १०० यापैकी जास्त असेल ते) रुपये २५० म्हणजेच रुपये २१५० इतके ग्रेड वेतन अनुज्ञेय होईल आणि अर्थातच एका वेतनवाढीचा लाभही अनुज्ञेय होईल. तसेच, त्या कर्मचाऱ्यास सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत मिळणारे ग्रेड वेतन आणि प्रत्यक्ष पदोन्नतीच्या पदाचे ग्रेड वेतन यामधील उर्वरित फरक प्रत्यक्ष पदोन्नतीच्या वेळी देय होईल. मात्र, सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत एका वेतनवाढीचा लाभ मिळालेला असल्याने प्रत्यक्ष पदोन्नतीच्यावेळी पुन्हा वेतनवाढीचा लाभ अनुज्ञेय होणार नाही.

(ब) पदोन्नतीची संधी उपलब्ध नसलेल्या कर्मचाऱ्यास दिनांक १.१.२००६ नंतर सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ अनुज्ञेय झाल्यास, तो कर्मचारी त्याच्या पदाच्या विद्यमान वेतन बँड मध्ये वेतन घेत राहील आणि त्यास एका वेतनवाढीचा लाभ अनुज्ञेय राहील. तसेच त्याच्या पदाचे विद्यमान ग्रेड वेतन अधिक खाली नमूद केल्याप्रमाणे समुचित ग्रेड वेतनसुध्दा अनुज्ञेय होईल :-

| मूळ पदाचे ग्रेड वेतन (रुपये) | मूळ पदाच्या ग्रेड वेतनाव्यतिरिक्त अनुज्ञेय ग्रेड वेतन (रुपये) |
|---|---|
| २००० पर्यंत | २०० |
| २००० पेक्षा जास्त व ४००० पेक्षा कमी | ३०० |
| ४००० पेक्षा जास्त व ५००० पेक्षा कमी | ४०० |
| ५००० पेक्षा जास्त | ५०० |

**३.२७.८** ज्या कर्मचाऱ्यास संपूर्ण सेवा कालावधीत पदोन्नतीच मिळाली नसेल किंवा फक्त एकच पदोन्नती मिळाली असेल अशा कर्मचाऱ्यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ मिळू शकेल. हा दुसरा लाभ सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या पहिल्या लाभानंतर अथवा प्रत्यक्ष पदोन्नती नंतर १२ वर्षांची नियमित सेवा पूर्ण झाल्यानंतर, यापैकी नंतरच्या दिनांकास अनुज्ञेय होईल. सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत दुसरा लाभ अनुज्ञेय झाल्यानंतर वेतननिश्चिती पुढील प्रमाणे करण्यात यावी :-

(अ) पदोन्नतीच्या संधी असूनही प्रत्यक्ष पदोन्नती न मिळालेल्या कर्मचाऱ्यास सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ मिळाल्यानंतर तो वेतनवाढीच्या लाभासह विद्यमान वेतन बँडमध्ये वेतन घेत राहील आणि त्यास प्रत्यक्ष पदोन्नतीच्या पदाचे ग्रेड वेतन अनुज्ञेय होईल. म्हणजे जर त्यास सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या पहिल्या लाभानंतर पदोन्नतीच्या पदाचे ग्रेड वेतन देणे बाकी असल्यास ते ग्रेड वेतन मिळेल. तसेच असेही स्पष्ट करण्यात येते की, त्यानंतर प्रत्यक्ष पदोन्नतीच्या वेळेस त्याच्या वेतन बँड व ग्रेड वेतनात बदल होणार नाही आणि वेतनवाढीचा लाभ देखील अनुज्ञेय होणार नाही.

(ब) पदोन्नतीच्या संधी असलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ आणि तद्नंतर प्रत्यक्ष पदोन्नती मिळालेल्या कर्मचाऱ्यास सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या दुसऱ्या लाभाच्या वेळेस लगतच्या पदोन्नतीच्या पदाचा वेतन बँड अनुज्ञेय होईल. तसेच त्याचे ग्रेड वेतन दुसरा लाभ मिळण्यापूर्वी मिळत असलेले ग्रेड वेतन अधिक सदर ग्रेड वेतन आणि लगतच्या पदोन्नतीच्या पदाचे ग्रेड वेतन यामधील फरकाची ५० टक्के रक्कम (किमान रुपये १००) इतके राहील आणि त्याला एका वेतनवाढीचा लाभ अनुज्ञेय होईल. आणखी असेही स्पष्ट करण्यात येते की, कर्मचाऱ्यांना दुसऱ्या लाभानंतर मिळणारे ग्रेड वेतन आणि लगतच्या पदोन्नतीच्या पदाचे ग्रेड वेतन यामधील फरक प्रत्यक्ष पदोन्नतीनंतर अनुज्ञेय होईल. मात्र, सेवांतर्गत आश्वासित प्रगती

योजनेंतर्गत दुसरा लाभ मिळाल्यानंतर एका वेतनवाढीचा लाभ मिळालेला असल्याने प्रत्यक्ष पदोन्नतीच्यावेळी पुन्हा वेतनवाढीचा लाभ अनुज्ञेय होणार नाही.

(क) सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ मिळण्यापूर्वीच प्रत्यक्ष पदोन्नती मिळाली असल्यास व त्यापुढे पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसलेल्या आणि या योजनेंतर्गत दुसरा लाभ अनुज्ञेय झालेल्या कर्मचाऱ्याला वेतनवाढीच्या लाभासह विद्यमान वेतन बँडमध्ये वेतन देय होईल आणि विद्यमान ग्रेड वेतन अधिक खाली नमूद केल्याप्रमाणे समुचित ग्रेड वेतनसुध्दा अनुज्ञेय होईल :-

| विद्यमान ग्रेड वेतन (रुपये) | विद्यमान ग्रेड वेतनाव्यतिरिक्त अनुज्ञेय ग्रेड वेतन (रुपये) |
|---|---|
| २००० पर्यंत | २०० |
| २००० पेक्षा जास्त व ४००० पेक्षा कमी | ३०० |
| ४००० पेक्षा जास्त व ५००० पेक्षा कमी | ४०० |
| ५००० पेक्षा जास्त | ५०० |

(ड) संपूर्ण सेवा कालावधीत पदोन्नतीची संधीच उपलब्ध नसलेल्या कर्मचाऱ्यास सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ मिळाल्यास तो विद्यमान वेतन बँडमध्ये वेतन घेत राहील आणि त्याला एका वेतनवाढीचा लाभ अनुज्ञेय राहील. तसेच त्याला विद्यमान ग्रेड वेतन अधिक खाली नमूद केल्याप्रमाणे समुचित ग्रेड वेतन अनुज्ञेय राहील :-

| विद्यमान ग्रेड वेतन (रुपये) | विद्यमान ग्रेड वेतनाव्यतिरिक्त अनुज्ञेय ग्रेड वेतन (रुपये) |
|---|---|
| २००० पर्यंत | ३०० |
| २००० पेक्षा जास्त व ४००० पेक्षा कमी | ४५० |
| ४००० पेक्षा जास्त व ५००० पेक्षा कमी | ६०० |
| ५००० पेक्षा जास्त | ७०० |

## ३.२८ महागाई भत्ता

३.२८.१ केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांना दिनांक १.१.२००६ नंतर वेळोवेळी अनुज्ञेय करण्यात आलेला/येणारा महागाई भत्त्याचा दर राज्य शासकीय तसेच इतर पात्र कर्मचाऱ्यांना लागू करण्यात यावा.

## ३.२९ नियत/एकत्रित वेतनावरील अंशकालीन कर्मचाऱ्यांच्या वेतनात सुधारणा

३.२९.१ नियत/एकत्रित वेतनावरील अंशकालीन कर्मचाऱ्यांच्या वेतनात शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक वेपूर - १२९८/प्र.क्र.१५/९८/सेवा-१०, दिनांक ३१.१०.१९९८ नुसार सुधारणा करण्यात आली होती. या नियत/एकत्रित वेतनात आणखी सुधारणा करण्याची आवश्यकता असल्याचे समितीस वाटते. यासंदर्भात सर्व संबंधित बाबींचा विचार करुन समिती अशी शिफारस करते की, अंशकालीन कर्मचाऱ्यांचे सध्याचे नियत/एकत्रित दरमहा वेतन दुप्पट करण्यात यावे; ही वाढीव रक्कम किमान रुपये ६०० व कमाल रुपये १२०० च्या मर्यादेत राहील. तसेच असेही स्पष्ट करण्यात येते की, रुपये १२०० पेक्षा जास्त नियत/एकत्रित वेतन घेत असलेल्या अंशकालीन कर्मचाऱ्यांच्या वेतनात कोणताही बदल होणार नाही.

## ३.३० शिफारशीची व्याप्ती

३.३०.१ या प्रकरणातील शिफारशी परिच्छेद क्र. १.१.२ मध्ये नमूद केल्यानुसार राज्य शासकीय कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त जिल्हा परिषदा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, न्यायालयातील अन्यायिक कर्मचारी, अनुदानित शाळेतील कर्मचारी, कृषि व अकृषि विद्यापीठे आणि त्यांना संलग्न अनुदानप्राप्त अशासकीय महाविद्यालयांतील कर्मचारी तसेच इतर अनुदानप्राप्त संस्थेतील कर्मचाऱ्यांना लागू होतील. न्यायालयातील न्यायिक पदांच्या

वेतनश्रेणी शेट्टी आयोगाच्या शिफारशींनुसार २००३ मध्ये सुधारित करण्यात आल्या आहेत. या वेतनश्रेणींमध्ये स्वतंत्रपणे सुधारणा करण्यात येणार आहे असे समजते.

**३.३०.२.** राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या व्यतिरिक्त सदर शिफारशी लागू असलेल्या परिच्छेद ३.३०.१ मध्ये नमूद इतर कार्यालयांतील/संस्थेतील कर्मचाऱ्यांच्या संघटनांनी समितीच्या असे निदर्शनास आणले की, वेतन सुधारणेसंदर्भातील शिफारशी राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना लागू करण्याबाबत वित्त विभागामार्फत आदेश निर्गमित झाल्यानंतर त्याआधारे या कर्मचाऱ्यांसंदर्भातील वेतन सुधारणेचे आदेश संबंधित विभागांमार्फत बऱ्याच विलंबाने निर्गमित केले जातात. हा विलंब टाळून राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतन सुधारणेच्या आदेशाबरोबरच या कर्मचाऱ्यांचे वेतन सुधारणेचे आदेश निर्गमित होणे आवश्यक असल्याची त्या संघटनांनी आग्रहाची मागणी केली आहे. संघटनेच्या या मागणीशी समिती पूर्णत: सहमत आहे. त्यामुळे समिती अशी शिफारस करते की, वेतन सुधारणेच्या शिफारशी परिच्छेद ३.३०.१ मधील इतर कार्यालयांतील/संस्थांतील कर्मचाऱ्यांना लागू करण्याचे आदेश निर्गमित करण्याची कार्यवाही राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सदर शिफारशी लागू करण्याबाबत वित्त विभागामार्फत निर्गमित होणाऱ्या आदेशाबरोबरच करावी.

***

# प्रकरण ४- सेवानिवृत्तिवेतन व अनुषंगिक लाभांसंदर्भात शिफारशी

## ४.१ सेवानिवृत्तिवेतनात सुधारणा

४.१.१ सुधारित वेतन संरचनेच्या परिणामस्वरुप सेवानिवृत्तिवेतन तसेच अनुषंगिक लाभांसंदर्भात शिफारशी करणे ही समितीच्या कार्यकक्षेतील बाब आहे. त्यामुळे या प्रकरणात नवीन परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना लागू नसलेल्या म्हणजेच महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ लागू असलेल्या कर्मचाऱ्यांचे सुधारित निवृत्तिवेतन व इतर अनुषंगिक लाभांची निश्चिती यासंदर्भातील शिफारशी करण्यात येत आहेत. सेवानिवृत्तिविषयक लाभाच्या सध्याच्या दरानुसार ७.४० लक्ष निवृत्तिवेतनधारकांवर २००६-०७ मध्ये रुपये ४८३९ कोटी इतका खर्च झाला. निवृत्तिवेतनधारकांच्या निवृत्तिवेतनात सुधारणा सुचविताना सध्याच्या निवृत्तिवेतनात वाजवी वाढ करण्याची गरज तसेच शासनावर येणाऱ्या वाढीव दायित्व या दोन्ही बाबींचा समितीने साकल्याने विचार केला. दिनांक १.१.२००६ पूर्वी तसेच दिनांक १.१.२००६ रोजी किंवा त्यानंतर सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तिवेतनधारकांबाबत स्वतंत्रपणे शिफारशी करण्यात आल्या आहेत. असाधारण निवृत्तिवेतन, विकलांगता निवृत्तिवेतन, सानुग्रह अनुदान इत्यादी निवृत्तिवेतनाच्या प्रकारासंदर्भात वेगळ्या तरतुदी असल्यामुळे समितीने यासंदर्भात शिफारशी केल्या नाहीत.

## ४.२ दिनांक १.१.२००६ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तिवेतनधारकांच्या निवृत्तिवेतनात सुधारणा

४.२.१ सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाने दिनांक ०१.०१.२००६ पूर्वी सेवा निवृत्त झालेल्या निवृत्तिवेतनधारकांच्या मूळ निवृत्तिवेतनाच्या (यामध्ये महागाई भत्ता व महागाई

निवृत्तिवेतनाचा समावेश नसेल) ४० टक्के वाढ देण्याची शिफारस केली आहे. त्याप्रमाणे राज्यातील निवृत्तिवेतन धारकांच्या निवृत्तिवेतनात सुधारणा करण्याची समिती शिफारस करीत आहे. परिणामस्वरुप दिनांक १.१.२००६ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तिवेतन धारकांच्या निवृत्तिवेतनात ४०/१८६ या प्रमाणात वाढ होईल.

**उदा.** दिनांक १.१.२००६ रोजी रुपये १०००० इतके मूळ निवृत्तिवेतन घेत असलेल्या निवृत्तिवेतनधारकांना एकूण रुपये १८६०० इतके निवृत्तिवेतन मिळत होते (रुपये ५००० महागाई निवृत्तिवेतन आणि रुपये ३६०० महागाई भत्ता विचारात घेऊन). वरील निवृत्तिवेतन निश्चितीच्या तरतुदीमुळे त्यांच्या मूळ निवृत्तिवेतनात ४० टक्के किंवा रुपये ४००० ने वाढ होईल. त्यानुसार या निवृत्तिवेतन धारकांचे एकूण निवृत्तिवेतन रुपये २२६०० इतके होईल.

याप्रकारे निवृत्तिवेतन धारकांच्या मूळ निवृत्तिवेतनावर ४० टक्के वाढीचा लाभ देऊन अनुज्ञेय होणाऱ्या सुधारित निवृत्तिवेतनाचा तक्ता तयार करावा म्हणजे सर्व निवृत्तिवेतन धारकांचे निवृत्तिवेतन सुधारित करणे सोयीचे होईल.

**४.३ दिनांक १.१.२००६ किंवा त्यानंतर सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तिवेतनधारकांना मिळणारे इतर निवृत्तिवेतनविषयक लाभ**

४.३.१ दिनांक १.१.२००६ पासून सुधारित वेतन संरचना लागू केल्यामुळे या दिनांकापासून सेवानिवृत्त झालेल्या/होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या निवृत्तिवेतनात सुद्धा त्याप्रमाणे सुधारणा होणे साहजिक आहे. अशीच सुधारणा इतर लाभांतही उदा. उपदान, रजा रोखीकरण इत्यादीमध्ये होणे अपेक्षित आहे. या बाबींचा विचार करुन सध्या अनुज्ञेय रुपये ३.५० लक्ष उपदानाची रक्कम रुपये ५ लक्ष इतकी करण्याची समिती शिफारस करीत आहे.

४.३.२ निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणासाठी (राज्यात सध्याचा दर निवृत्तिवेतनार्ह वेतनाच्या १/३ आहे) सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाने व्याज दर आणि आयुर्मानाचा विचार करुन सुधारित अंशराशीकरणाचा तक्ता प्रस्तावित केला आहे. या तक्त्याचा वापर अंशराशीकरणाच्या परिगणनेसाठी करण्याबाबत समिती शिफारस करीत आहे. मात्र ही शिफारस भावी प्रभावाने लागू करण्यात यावी.

**उदा.** दिनांक १.१.२००६ नंतर, परंतु सुधारित वेतन संरचना लागू करण्यापूर्वी सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्याचे मासिक मूळ निवृत्तिवेतन रुपये ६००० आहे. त्या मूळ निवृत्तिवेतनाच्या १/३ रक्कमेचे (म्हणजे रुपये २०००) अंशराशीकरण केले होते. वयाची ५८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत विद्यमान अंशराशीकरणाच्या तक्त्यानुसार पुढील जन्मदिनी होणारे वय ५९ लक्षात घेऊन अंशराशीकरणाचे मूल्य (प्रतीवर्षी १ रुपया निवृत्तिवेतनाकरीता) १०.४६ आहे. याआधारे त्यांच्या मासिक रुपये २००० म्हणजेच वार्षिक रुपये २४००० साठी अंशराशीकरणाची रक्कम रुपये २४००० x १०.४६ = २५१०४० इतकी होते. संबंधित कर्मचारी दिनांक १.१.२००६ नंतर सेवानिवृत्त झाला असल्यामुळे त्याची सुधारित वेतन संरचनेत दिनांक १.१.२००६ रोजी वेतननिश्चिती होईल व त्याआधारे मूळ निवृत्तिवेतनातसुद्धा सुधारणा होईल. समजा सुधारित मूळ निवृत्तिवेतन रुपये ६००० ऐवजी रुपये ८१०० इतके झाले. प्रस्तुत प्रकरणी दोन पर्याय उपलब्ध आहेत : (१) नवीन अंशराशीकरण न करता, प्रत्येक महिन्यात रुपये ६१०० (म्हणजे सुधारित मूळ निवृत्तिवेतन रुपये ८१०० वजा यापूर्वी अंशराशीकरण केलेली रक्कम रुपये २०००) एवढे निवृत्तिवेतन घेणे. (२) वाढीव मूळ निवृत्तिवेतन (म्हणजे सुधारित मूळ निवृत्तिवेतन वजा पूर्वीचे मूळ निवृत्तिवेतन ) रुपये २१०० चे पुन्हा १/३ अंशराशीकरण करणे. याचा अर्थ प्रतिमाह रुपये ७०० किंवा

वार्षिक रुपये ८४०० इतक्या रकमेचे पुन्हा अंशराशीकरण करणे. समजा तसे करण्याच्यावेळी त्याने वयाची ५९ वर्षे पूर्ण केली असल्यास, त्याचे पुढील जन्मदिनी होणारे वय ६० असल्यामुळे नवीन अंशराशीकरणाच्या तक्त्यानुसार वार्षिक रुपया एक करीता अंशराशीकरण मूल्य ८.२८७ इतके आहे. म्हणून त्याला ८४०० x ८.२८७ = ६९६१० इतकी अंशराशीकरणाची वाढीव रक्कम मिळेल. येथे असेही स्पष्ट करण्यात येते की, पूर्वी अंशराशीकरण केलेल्या मूळ निवृत्तिवेतनाच्या बाबतीत नवीन अंशराशीकरण तक्ता लागू करावयाचा नसल्यामुळे त्यानुषंगाने त्याच्याकडून कोणत्याही रकमेची वसूली करता येणार नाही. पुन्हा अंशराशीकरण केल्यानंतर त्याला प्रत्येक महिन्यात रुपये ५४०० (म्हणजे सुधारित मूळ निवृत्तिवेतन रुपये ८१०० वजा एकूण अंशराशीकरण केलेले रुपये २००० + ७०० = २७००) इतके मासिक निवृत्तिवेतन मिळणार आहे. तसेच असेही स्पष्ट करण्यात येते की, त्याच्या सेवानिवृत्तीच्या दिनांकापासून दुसरे अंशराशीकरण करण्यापर्यंत त्याला रुपये २१०० (म्हणजे सुधारित मूळ निवृत्तिवेतन रुपये ८१०० वजा पूर्वी अंशराशीकरण केलेले रुपये २००० वजा प्रत्येक महिन्यात घेतलेले मासिक निवृत्तिवेतन रुपये ४०००) याप्रमाणे थकबाकी मिळेल.

## ४.४. सुधारित वेतन संरचना लागू केल्यामुळे परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजनेतील शासकीय अंशदानात वाढ

४.४.१ दिनांक १.११.२००५ पासून नव्याने सेवेत दाखल झालेल्या उमेदवारांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना लागू करण्यात आली आहे. ही योजना लागू असलेल्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या मुळ वेतनाच्या कमीत कमी १० टक्के मासिक अंशदान द्यावे लागते. तसेच १० टक्के अंशदान शासनामार्फत देण्यात येते.

सुधारित वेतन संरचनेमुळे कर्मचाऱ्यांच्या वेतनात लक्षणीय वाढ होणार असल्यामुळे या योजनेखाली देण्यात येणाऱ्या शासकीय अंशदानाच्या रक्कमेतही दिनांक १.१.२००६ पासून भरीव वाढ होईल.

## ४.५ सेवानिवृत्तिवेतनासाठी अर्हताकारी सेवा

४.५.१ सध्या निवृत्तिवेतनार्ह वेतनाच्या ५० टक्के रक्कम निवृत्तिवेतन म्हणून मिळण्यासाठी ३३ वर्षांच्या अर्हताकारी सेवेची आवश्यकता आहे (काही अटींच्या अधीन राहून २८ वर्षांची सेवा झाल्यानंतर ३३ वर्षांच्या अर्हताकारी सेवेचे लाभ अनुज्ञेय आहेत). या ३३ वर्षांच्या अर्हताकारी सेवेचा कालावधी २० वर्षे इतका करण्याची सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाची शिफारस केंद्र शासनाने स्वीकृत केली आहे. ही शिफारस राज्यातही लागू करण्याची समिती शिफारस करीत आहे. अशाप्रकारे २० वर्षांची अर्हताकारी सेवा पूर्ण करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीच्या शेवटच्या १० महिन्यांत अर्जित केलेल्या सरासरी वेतनाच्या किंवा शेवटच्या महिन्यात घेतलेल्या वेतनाच्या ५० टक्के, यापैकी जी रक्कम कर्मचाऱ्यास लाभदायक ठरेल, ती रक्कम निवृत्तिवेतन म्हणून अनुज्ञेय होईल. यामुळे सध्याची २८ वर्षांच्या अर्हताकारी सेवेत ५ वर्षांच्या सेवेची भर घालण्याची तरतुद रद्द करण्यात यावी. ही शिफारस भावी प्रभावाने लागू करण्यात यावी.

## ४.६ सेवेत असताना मृत्यू पावलेल्या कर्मचाऱ्याच्या वारसास कुटुंब निवृत्तिवेतन

४.६.१ सेवेत असताना मृत्यू पावलेल्या कर्मचाऱ्याच्या वारसाच्या कुटुंब निवृत्तिवेतनाबाबत सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाने शिफारशी केल्या आहेत. सध्या अशा प्रकरणी ७ वर्षांपर्यंत उच्च दराने कुटुंब निवृत्तिवेतन अदा करण्यात येते. ही मर्यादा १० वर्षांपर्यंत वाढविण्याची सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाची केंद्र शासनाने स्विकारलेली

शिफारस राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीतही लागू करण्याची समिती शिफारस करीत आहे. मात्र, हा लाभ भावी प्रभावाने देण्यात यावा.

***

# प्रकरण ५ - कार्यक्षम आणि प्रतिसादात्मक प्रशासन

## ५.१ प्रशासकीय सुधारणा

५.१.१ प्रशासन कार्यक्षम आणि लोकाभिमुख करण्याचे उद्दीष्ट नजरेसमोर ठेवून सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाने सुधारित वेतन संरचनेबाबतच्या शिफारशी केल्या असल्याचे आयोगाने त्यांच्या अहवालात नमूद केलेल्या बाबींची समितीने नोंद घेतली आहे. कर्तव्य-पालनामधील कसूर, कामातील गुणवत्तेचा अभाव, नकारात्मक प्रतिसाद, अधिकारांचा गैरवापर या विविध कारणांमुळे शासकीय यंत्रणेवरील जनतेची नष्ट झालेली विश्वासार्हता पुन:स्थापित करण्याची तसेच कर्मचाऱ्यांना उत्स्फुर्तपणे काम करण्यासाठी प्रोत्साहित करण्याची आवश्यकता असल्याचे आयोगाने विनिर्दिष्टपणे नमूद केले आहे. आयोगाची सदर निरीक्षणे राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्याबाबतीत तंतोतंत लागू ठरतात.

५.१.२ राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत समितीने केलेल्या शिफारशी वर नमूद केलेली उद्दीष्टे साध्य करण्याच्या दृष्टीने सहाय्यकारी आहेत. त्यामध्ये वेतनश्रेणीतील कुंठीतता घालविण्यासाठी वेतन बँडची संकल्पना लागू करणे, प्रत्यक्ष सेवा पुरविणाऱ्या कर्मचाऱ्यांना अधिक महत्व देणे, कर्मचाऱ्यांची बहुविध कुशलता वाढविणे, उच्च गुणवत्ताधारक उमेदवारांसाठी वरिष्ठ पदावर थेट नियुक्तीची तरतुद आणि उत्कृष्ट कामगिरीसाठी प्रोत्साहन इत्यादी बाबींचा समावेश आहे.

## ५.२ आवश्यक परिवर्तन

५.२.१ सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाने सध्याच्या प्रशासकीय पद्धतीमध्ये खालीलप्रमाणे परिवर्तन करण्याच्या आवश्यकतेवर भर दिला आहे :-

* सेवा पुरविणाऱ्या स्तरापर्यंत जबाबदारीच्या निश्चितीसह अधिकारांचे विकेंद्रीकरण
* कार्यक्रमाची प्रत्यक्ष अंमलबजावणी होणाऱ्या स्तरावर जास्त जबाबदारी देऊन प्रशासकीय यंत्रणेतील स्तर कमी करणे
* कार्यपद्धतीचे आणि प्रक्रियेचे सुलभीकरण करुन प्रशासकीय कामकाजात गतिमानता आणणे
* कर्मचाऱ्यांची कार्यकुशलता आणि कार्यक्षमता वाढविण्याच्या दृष्टीने योग्य त्या संधी नियमितपणे उपलब्ध करुन देणे
* कामामध्ये अभिनवता, सृजनशिलता व कार्यक्षमता दाखविणाऱ्या कर्मचाऱ्यांना उत्तेजन देणे.
* महिला, अपंग व समाजातील दुर्बल घटक इत्यादींचा प्रशासनातील सहभाग वाढविणे

समितीस असे वाटते की, वरील सर्व उद्दीष्टे योग्य असून राज्य शासकीय यंत्रणेने सदर उद्दीष्टांच्या पूर्ततेसाठी सातत्याने प्रयत्न करणे आवश्यक आहे. प्रत्येक विभागाने सध्याच्या प्रशासकीय अधिकारांच्या विकेंद्रीकरणाचा आणि प्रत्यायोजनाचा आढावा घेऊन त्यामध्ये पुन:सुधारणा करणे, संवर्गाचा आढावा घेताना व्यवस्थापकीय रचनेतील स्तर कमी करण्याचे तसेच प्रशासकीय प्रक्रीया सुरळीत करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे अत्यंत आवश्यक आहे. शासकीय कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेत वृध्दी होण्यासाठी आणि निर्णयाभिमुखता वाढविण्यासाठी सेवाप्रवेशाच्या वेळी तसेच पुढील सेवा कालावधीत वेळोवेळी योग्य प्रशिक्षण कार्यक्रम आखण्यात यावेत. त्याकरीता शासकीय कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणाऱ्या संस्था आणि विद्याशाखा साधनसामुग्रीने सुसज्ज करण्यात याव्यात. तसेच सर्व कर्मचाऱ्यांचा अशा प्रशिक्षण कार्यक्रमातील सहभाग अनिवार्य असावा.

## ५.३ प्रशासकीय यंत्रणेची पुनर्रचना आणि कर्मचारी कपात

५.३.१ प्रत्येक विभागातील कामाचा आढावा घेऊन अनावश्यक कर्मचारीवृंद कमी करणे अत्यंत गरजेचे आहे. मर्यादित कर्मचारी संख्येमुळे सेवा पुरविण्यात होणारी सुलभता व वेतनावरील सातत्याने वाढणारे दायित्व मर्यादित ठेवण्यास मदत होईल. अत्यावश्यक आणि प्रत्यक्ष सेवा पुरविणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या संख्येत कपात करण्यास मर्यादा असली तरी; संगणकाचा सुयोग्य वापर, व्यवस्थापकीय माहिती पद्धतीची स्थापना इत्यादी आधुनिक तंत्रांचा वापर करुन लिपिकवर्गीय, पर्यवेक्षिय आणि प्रशासकीय स्तरावरील कर्मचाऱ्यांच्या संख्येत कपात करणे शक्य आहे. गट ड मधील कर्मचारी संख्येतसुद्धा कपात करण्यास मोठ्या प्रमाणात वाव आहे. समितीस असे वाटते की, सध्याच्या एकूण कर्मचारी संख्येत १५-२० टक्क्यांनी कपात करणे शक्य आहे. सेवानिवृत्तीमुळे रिक्त होणाऱ्या पदांपैकी फक्त ५० टक्के पदे भरल्यास पुढील चार वर्षात पाच टक्के कर्मचारी कपातीचे उद्दीष्ट गाठता येईल. तसेच उर्वरित उद्दीष्ट त्यानंतरच्या दहा वर्षात पूर्ण करता येईल. प्रत्येक विभागाचा सखोल आढावा घेऊन कर्मचाऱ्यांची पदे कमी करण्याकरीता उत्तेजन म्हणून पदे कमी केल्यामुळे होणाऱ्या बचतीची विशिष्ठ टक्केवारी (उदा. १० ते १५ टक्के) पुढच्या भागामध्ये उल्लेख केलेल्या "कामगिरीवर आधारित प्रोत्साहन योजना" राबविण्यासाठी वापरता येऊ शकेल असा निर्णय शासन घेऊ शकते.

## ५.४ कामगिरीवर आधारित प्रोत्साहन योजना

**५.४.१** चांगल्या कामगिरीसाठी उत्तेजन म्हणून, सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाने उच्च वेतनवाढीशिवाय "कामगिरीवर आधारित प्रोत्साहन योजना" ही नवीन योजना राबविण्याची शिफारस केली आहे. ही योजना "गुणवत्तेवर आधारीत मोबदला" या तत्वावर आधारित आहे. सदर योजनेमुळे खर्चात वाढ होणार नाही. कारण या योजनेकरीता येणारा खर्च

कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेतील वाढीमुळे होणारी बचत आणि खर्च कपात यामधून करावयाचा आहे.

**५.४.२** राज्यात वरील योजनेची त्वरीत अंमलबजावणी करण्यास अडचणी असल्याची समितीस जाणीव आहे. तथापि, ही योजना अंमलात आणण्याच्या दृष्टीने कर्मचारीनिहाय तसेच कर्मचाऱ्यांच्या गटांकरीता प्रत्येक विभाग निहाय/ संस्था निहाय सुसंबद्ध आणि समुचित कार्यक्षमता निर्देशक शोधून काढणे, परिमाणात्मक उद्दिष्टे निर्धारित करुन देणे आणि उद्दिष्ट पूर्ततेचे मूल्यमापन करणे शक्य असल्याची खात्री झाल्यानंतर ही योजना राबविण्याचा निर्णय राज्य शासन घेऊ शकते. सदर योजना अंमलात आणण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध असल्याची खात्रीही करुन घेणे आवश्यक आहे. परिच्छेद ५.३.१ मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे कर्मचारी कपातीमुळे होणाऱ्या बचतीमधील विशिष्ठ टक्केवारी ही योजना राबविण्यासाठी वापरता येईल. तसेच केंद्र शासनाकडील विविध मंत्रालयांना योजनेच्या अंमलबजावणी संदर्भात आलेल्या अनुभवांचाही उपयोग राज्य शासनास करुन घेणे शक्य आहे.

***

# प्रकरण ६ - समितीच्या शिफारशींमुळे अपेक्षित वित्तीय भार

## ६.१ शिफारशींच्या अंमलबजावणीचा दिनांक

६.१.१ सुधारित वेतन संरचना व निवृत्तिवेतनाबाबतच्या समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी दिनांक १.१.२००६ पासून करण्यात यावी. परिणामस्वरुप होणाऱ्या वेतन व निवृत्तिवेतनवाढीची थकबाकी अदा करावी लागेल. थकबाकीच्या वित्तीय भाराची परिगणना सन २००६ साठी तसेच दिनांक १.१.२००६ ते दिनांक ३१.१२.२००८ या कालावधीसाठी करण्यात आली आहे. तसेच २००९ या वर्षातील व २००९-१० या वित्तीय वर्षातील खर्चाची परिगणनादेखील करण्यात आली आहे.

## ६.२ सुधारित वेतन संरचनेमुळे अपेक्षित वित्तीय भार.

६.२.१ वेतन बँड व ग्रेड वेतनावर आधारित सुधारित वेतन संरचनेची अंमलबजावणी करण्यासाठी २००६-०७ मध्ये प्रत्यक्ष झालेल्या रुपये १९४६६ कोटी खर्चाऐवजी रुपये २४२०८ कोटी इतका खर्च होणार आहे. म्हणजे २००६-०७ मधील अतिरिक्त खर्च रुपये ४७४२ कोटी इतका आहे.

६.२.२ या व्यतिरिक्त, काही प्रकरणी उच्च ग्रेड वेतनाची तसेच थोड्या प्रमाणावर वेतनसंरचनेत बदलाची शिफारस त्याचप्रमाणे सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेतील प्रस्तावित सुधारित तरतुदींमुळे खालील प्रमाणे अतिरिक्त वार्षिक खर्च अपेक्षित आहे :-

| अ. क्र. | शिफारस | वार्षिक खर्च (रुपये कोटीत) |
|---|---|---|
| १ | पदोन्नतीपूर्वीच्या व पदोन्नतीनंतरच्या ग्रेड वेतनात फरक ठेवण्यासाठी शिक्षकीय पदांच्या ग्रेड वेतनात केलेल्या वाढीमुळे | ३२ |
| २ | रुपये ५५००-९००० व ६५००-१०५०० या विद्यमान वेतनश्रेणींसाठी रुपये ४२००/- ग्रेड वेतनाऐवजी अनुक्रमे रुपये ४३०० व रुपये ४४०० ग्रेड वेतन केल्यामुळे | १२ |

| | | |
|---|---|---|
| ३ | सेवातंर्गत आश्वासित प्रगती योजनेतील सुधारित तरतुदींमुळे | ७७ |
| ४ | काही संवर्गांच्या वेतन संरचनेत किरकोळ बदल केल्यामुळे | ९ |
| ५ | अंशकालीन कर्मचाऱ्यांच्या नियत/एकत्रित वेतनात सुधारणा केल्यामुळे | ७ |
| | एकूण - | १३७ |

**६.२.३** अशा प्रकारे सुधारित वेतन संरचनेच्या अंमलबजावणीमुळे २००६-०७ मधील अतिरिक्त खर्च रुपये ४८७९ कोटी (४७४२ + १३७) इतका होईल. तसेच दिनांक १.१.२००६ ते दिनांक ३१.१२.२००८ या कालावधीतील थकबाकीवर रुपये १३९८१ कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे. सदर थकबाकी पुढील २-३ वर्षांत अदा करण्यात यावी.

**६.२.४** सन २००९ या वर्षासाठी वेतन व महागाई भत्त्यावर रुपये ३११३८ कोटी इतका खर्च अपेक्षित असून, सन २००९-१० या वित्तीय वर्षात सदर अपेक्षित दायित्वाची रक्कम रुपये ३१७६० कोटी इतकी होईल. त्यानंतर यामध्ये वार्षिक ९-१० टक्क्यांनी वाढ अपेक्षित आहे.

## ६.३ सुधारित निवृत्तिवेतनामुळे वित्तीय भार

**६.३.१** दिनांक १.१.२००६ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तिवेतनधारकांच्या मूळ निवृत्तिवेतनात ४० टक्के वाढ सुचविण्यात आल्यामुळे दिनांक १ एप्रिल, २००६ ते दिनांक ३१ मार्च, २००९ या कालावधीतील निवृत्तिवेतनावरील खर्चात रुपये २२४७ कोटी इतकी वाढ होईल. या व्यतिरिक्त उपरोक्त कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना सुधारित दराने मिळणाऱ्या खालील बाबींबर एकूण रुपये १९५५ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

| अ. क्र. | शिफारस | एकूण वार्षिक खर्च (रुपये कोटीत) |
|---|---|---|
| १ | उपदानाची रक्कम रुपये ३.५ लक्ष ऐवजी रुपये ५ लक्ष केल्यामुळे | ८८५ |
| २ | रजा रोखीकरणावरील अतिरिक्त खर्चामुळे | २०६ |
| ३ | निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणामुळे | ८६४ |
| | एकूण - | १ ९५५ |

६.३.२ उपदानाची रक्कम रुपये ३.५० लक्षवरुन रुपये ५ लक्ष करण्याची, निवृत्तिवेतनासाठी अर्हताकारी सेवेचा कालावधी ३३ वरुन २० वर्षे व कामावर असताना मृत्यू पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना वाढीव दराने मिळणाऱ्या कुटुंब निवृत्तिवेतनाचा कालावधी ७ वरुन १० वर्षे करण्याची समितीने शिफारस केली आहे. तिसऱ्या शिफारशीमुळे सध्या अतिरिक्त खर्च अपेक्षित नसला तरी, इतर दोन शिफारशींमुळे दिनांक १ एप्रिल, २००६ ते दिनांक ३१ मार्च, २००९ या कालावधीत अनुक्रमे रुपये ६३ आणि ६ कोटी इतका अतिरिक्त खर्च अपेक्षित आहे.

६.३.३ अशा प्रकारे सुधारित निवृत्तिवेतन तसेच इतर अनुषंगिक सुधारणेंमुळे दिनांक १ एप्रिल, २००६ ते दिनांक ३१ मार्च, २००९ या कालावधीत एकूण रुपये ४२७१ कोटी (२२४७ + १९५५ + ६३ + ६) इतका अतिरिक्त खर्च अपेक्षित आहे. याशिवाय परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजनेसाठी शासनाच्या अतिरिक्त अंशदानामुळे रुपये ८५ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. परिणामी दिनांक १ एप्रिल, २००६ ते दिनांक ३१ मार्च, २००९ या कालावधीत एकूण थकबाकी रुपये ४३५६ कोटी इतकी असेल. दिनांक १ जानेवारी, २००६ पासून दिनांक ३१ डिसेंबर, २००८ या कालावधीसाठी वरील रक्कम थकबाकी म्हणून समजण्यास हरकत नसावी. ही थकबाकीची रक्कम पुढील २-३ वर्षांत अदा करण्यात यावी.

६.३.४ निवृत्तिवेतन आणि इतर अनुषंगिक बाबींवरील खर्चात प्रत्येक वर्षी ७ ते ८ टक्के वाढ अपेक्षित आहे. या आधारावर २००९-१० या वित्तीय वर्षात निवृत्तिवेतन आणि इतर अनुषंगिक बाबींवर रुपये ८२४७ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

***

# प्रकरण ७ - समितीच्या शिफारशींचा गोषवारा

७.१ सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाने शिफारस केलेली वेतन बँड व ग्रेड वेतनावर आधारीत सुधारित वेतन संरचनेची संकल्पना राज्य शासकीय कर्मचाऱ्यांसाठी लागू करण्यात यावी (परिच्छेद क्र.३.१.४).

७.२ राज्य वेतन सुधारणा समिती, १९९७ च्या शिफारशीनुसार दि.१.१.१९९६ पासून लागू करण्यात आलेल्या २३ वेतनश्रेणींसाठी तक्ता क्र.३.१ मध्ये दिल्याप्रमाणे पाच वेतन बँड (-१एस, पीबी-१, पीबी-२, पीबी-३ व पीबी-४) व समुचित ग्रेड वेतन लागू करण्यात यावे (परिच्छेद ३.२.१).

